प.प.श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामिमहाराज-विरचित

श्रीनर्मदालहरी

(अनुवाद - टीपा - समीक्षा)

(मराठी, हिन्दी, गुजराथी अनुवादासहित)

समीक्षक

डॉ. गु. वा. पिंपळापुरे, नागपूर.

श्रीसद्गुरु-वासुदेवानन्दसरस्वती-स्तोत्रम्।

परब्रह्मणैकात्मभावं गतोऽपि।
रतोऽनारतं दत्तपादारविन्दे।।
कलौ मूर्तिमानाश्रमो यस्तुरीयो।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।१।।

न विध्युक्तभिक्षाशनादन्यभोज्यं।
न कौपीनशाटीयुगादन्यवासः।
जिता सर्वथा येन शीतोष्णबाधा।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।२।।

कृतार्थान् विधातुं जनांस्तत्र तत्र।
हिमर्त्तावुवासीत् क्वचित्पुण्यदेशे।
प्रमार्जन् रुजस्तापभाजामजस्रं।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।३।।

परं नैपुणं सर्वशास्त्रेषु यस्य।
कवित्वं विधत्ते सतां मूर्ध्नि कम्पम्।।
अपूर्वा यदीया सदाचारनिष्ठा।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।४।।

नर्मदा लहरी

।. प. श्री. वासुदेवानन्द-सरस्वती-महाराज-विरचित)

समीक्षक : डॉ. गु. वा. पिंपळापुरे, नागपूर

प्रकाशक -
वासुदेव वाङ्मय मंडळ
वे. मू. श्रीकृष्णशास्त्री आर्वीकर,
श्रुतिसदन, संघ कार्यालयाजवळ
महाल, नागपूर ४४० ००२

❑

प्रकाशन तिथि - १०-८-९५
रक्षाबंधन, शके १९१७

❑

प्रथमावृत्ति

❑

सर्व हक्क प्रकाशकाधीन

❑

मुद्रक -
नितीन तापस, श्याम ब्रदर्स,
एस्. टी. स्टँड रोड, गणेशपेठ, नागपूर

❑

मूल्य - रु. ५०/-

प्रस्तावना

प.पू. श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामी महाराजांनी दोन लहरी-काव्ये लिहिली. एक श्रीकृष्णा लहरी व दुसरी श्रीनर्मदा-लहरी. कृष्णा-लहरीची चिन्तनिका कन्यागताच्या पर्वकाळात सुमारे दोन वर्षापूर्वी श्रीवासुदेव-प्रकाशन, पुणे या संस्थेकडून प्रकाशित झाली. तिचे अनौपचारिक विमोचन नागपूरलाहि आयोजित करण्यात आले. त्यावेळी येथील स्वामीभक्तांनी श्रीस्वामींच्या वाङ्मयाचा प्रचार व्हावा या दृष्टीने एक लहानसे मंडळ देखिल स्थापन केले. त्याच मंडळाद्वारा नर्मदा-लहरीच्या प्रकाशनाचा योग येत आहे ही श्रीस्वामींची कृपा होय. श्रीवासुदेव प्रकाशनाचे या उपक्रमाला अनुमोदन तर आहेच; पण आर्थिक साहाय्य देखिल लाभले आहे. मंडळ त्यासाठी श्रीवासुदेवप्रकाशनाचे ऋणी आहे.

कृष्णालहरीवर श्रीस्वामींचे जसे भाष्य उपलब्ध आहे तसे नर्मदालहरीवर नाही. अर्थात कृष्णालहरीवर चिंतनिका लिहितांना भाष्याचा एक मोठा आधार होता. चिंतनिकेत त्याचे काहीसे प्रतिबिंब उमटू शकले. इथे तो सारा विषय पुनरुक्तीच्या व पृष्ठसंख्येच्या भीतीने घेता आला नाही. स्वामींच्या वाचक-भक्तांनी मात्र ती चिन्तनिका इथेहि प्रस्तुत आहे अशा भूमिकेने बघावे. अभय-अमृत असे दोन्ही लहरीत समान असणारे काही महत्त्वाचे शब्द कृष्णालहरीची नर्मदालहरीत अनुवृत्ति असल्याचे सुचवितात हे एक कारण तर कृष्णालहरीत असणारा सारा तात्त्विक आशय मंत्रगर्भ श्रीनर्मदास्तुतीत श्रीस्वामींनी आणून ठेवला हे दुसरे कारण. नर्मदालहरी व नर्मदास्तुति या दोहींचे "भरत-वाक्य" एकच आहे. ते आहे - "जय जय शिवकन्ये नर्मदे शर्मदे त्वम्"

त्यामुळे नर्मदालहरीची चिन्तनिका लिहितांना मंत्रगर्भ - श्रीनर्मदास्तुतीचाहि काहीसा आढावा घ्यावासा वाटला. प्रस्तुत मंत्रगर्भ स्तुतीत श्रीस्वामींनी श्रीनर्मदामाईला काही विशेषणांची जी फुले वाहिली आहेत त्यांचा गंध कृष्णालहरीवरील श्रीस्वामींचे भाष्य वाचल्यावाचून घेता येईल किंवा नाही याची शंका वाटते.

या मंत्रगर्भ स्तुतीत श्रीस्वामी नर्मदामाईला तत्त्वार्थरूपिणी, वाक्यार्थरूपा इत्यादि इत्यादि विशेषणांनी आळवीत आहेत. केवळ पाण्याच्या प्रवाहाला कोणी अशी विशेषणे देणार नाहीत. कृष्णा असो की नर्मदा असो, श्रीस्वामींच्या दृष्टीला तिथे वेदान्तातील महावाक्य [तत् त्वम् असि = ते तू आहेस] अवतरलेले दिसते. अर्थात ही त्यांची दृष्टि समजून घ्यायची म्हणजे कृष्णालहरीवरील भाष्याचा कानोसा घ्यावा लागेल. तात्पर्य, कृष्णालहरी, नर्मदालहरी आणि मन्त्रगर्भ नर्मदास्तुति असा एक घटक मानून अभ्यासकांनी बघावे, ही विनंती करावीशी वाटते.

प्रस्तुत चिन्तनिकेत मंत्रगर्भ नर्मदास्तुतीच्या निमित्ताने श्रीस्वामींच्या साऱ्याच मंत्रगर्भ रचनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. केवळ नर्मदा-लहरीच्या चिंतनिकेत तसे आवश्यक नव्हते. मंत्रगर्भ रचना हा स्वामींचा एक अपूर्व लेखन विशेष म्हणावा लागेल. अशा रचना साकारून वेद-पुराणे-मंत्र इत्यादि सारेच वाङ्मय पुनः नव्याने अवतीर्ण होत आहे असा काहीसा बोध त्यांना श्रोत्यांच्या मनावर बिंबवावयाचा होता.

प.पू. श्रीमच्छंकराचार्य हे श्रीस्वामींना श्रीदत्ताच्या ठायी होते. हे लक्षात घेऊन श्रीशंकराचार्यांचे सुप्रसिद्ध नर्मदाष्टक अर्थासह इथे समाविष्ट केले आहे. प.पू. श्रीरंग अवधूत महाराज हे श्रीस्वामींचे प्रमुख शिष्य. त्यांनीच गुजराथ प्रांतात श्रीदत्तभक्तीची मेढ रोवली. त्यांचे मंजुळ रेवागीत देखिल भाविकांच्या सोयीसाठी इथे जोडले.

नर्मदामाईचा प्रवाह हिंदी व गुजराथ या दोन प्रांतातून जातो. तेथील बांधवांच्या सोयीसाठी हिंदी व गुजराथी अनुवाद दिला. हिंदी अनुवादाची ही वाङ्मय सेवा आपल्या तीर्थरूपापासून श्रीस्वामींच्या प्रेमाचा वसा घेतलेले साहित्यिक श्री वासुदेवराव चोरघडे यांनी करून दिली. गुजराथी अनुवादाचे काम, विनंती करताच, अखिल भारतीय कीर्तीचे संस्कृतज्ञ डॉ. अरुणोदय जानी, बडोदा यांनी केले. नर्मदालहरीतील पौराणिक संदर्भ डॉ. जानी यांनीच आपल्या टिप्पणीतून विशद केले. या टिप्पणींचा अनुवाद डॉ. हर्षिदा दवे यांनी मंडळाच्या विनंतीवरून करून दिला.

पूजनीय श्रीधनागरेमहाराज, वाशीम यांचे नर्मदालहरीतील कांही श्लोकांचा अर्थ करताना उत्तम मार्गदर्शन लाभले. नर्मदामाईच्या प्रवाहाचे व ध्यानाचे चित्र त्यांच्याकडूनच मिळाले. नर्मदेची आरती श्रीस्वामिभक्त श्री रा.ज. डबरी यांनी उपलब्ध करून दिली. ह.भ.प. श्री पांगारकर यांचा मुमुक्षूतील श्रीस्वामींच्या विषयावरील लेख देखिल त्यांच्याकडून मिळाला.

जुन्या पिढीतील थोर संस्कृत कवी व श्रीस्वामींचे अनुगृहीत महामहोपाध्याय श्री बापूजी ताह्मण यांनी श्रीस्वामींची केलेली काव्यमय स्तुति पूजनीय काकाजी जामदार यांनी जुन्या दुर्मिळ पुस्तिकेतून काढून दिली. श्रीस्वामींचे परमभक्त व आदिमजाति सेवक संघ, दिल्ली या संस्थेचे अध्यक्ष श्री. ज. ह. चिंचाळकर यांनी घरी येऊन या कार्यासाठी पहिली देणगी समर्पण केली. त्यांच्यामुळेच प्रकाशन-कार्याला चालना मिळाली असे म्हणण्यात अतिशयोक्ति नाही. मुंबईचे श्री. संजीव ब्रम्हे यांनी पाच सहस्र रूपयांची देणगी मोठ्या प्रेमाने दिली. त्यामुळे मोठी चिंता दूर झाली.

येथील ख्यातनाम मुद्रक श्री तापस यांनी सुबक मुद्रण केले. श्री. दामोदरपंत आर्वीकर व त्यांचे व्यवसाय बंधु श्री. मोडक यांनी मुखपृष्ठ व त्यावरील सारी सजावट अत्यंत कलात्मक रीतीने करून दिली.

ही सर्व धावपळ मंडळाचे तरुण सदस्य वे. मू. कृष्णशास्त्री आर्वीकर यांच्याकडे होती व आहे देखिल.

या सर्वांच्या सहकार्याने नर्मदा-लहरीच्या प्रकाशनाचा योग आला.

श्रीस्वामी महाराजांनी अशीच प्रेरणा व बुद्धि देऊन मंडळाकडून वाङ्मयसेवा घ्यावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना आहे. सर्व स्वामी-भक्तांनी देखिल स्वामींचे वाङ्मय हा प्रसाद मानून त्याचे सेवन करावे व आपल्या इह-परकल्याणाचा मार्ग सुखद करून घ्यावा ही विनंती.

गु. वा. पिंपळापुरे

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा आशीर्वाद.

श्री. प. पू. श्री. वासुदेवानंद- सरस्वती- स्वामि- महाराज यांच्यावर श्रद्धा भक्ति ठेवणाऱ्या नागपुरस्थ मंडळीकडून **श्रीनर्मदालहरी** चिन्तनिका प्रसिद्ध होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. या प्रकाशनासाठी स्थानिक मंडळींचे प्रयत्न, इतरांनी केलेले आर्थिक साहाय्य व श्री. वासुदेव निवासाद्वारा दिलेले प्रोत्साहनात्मक अनुदान यामुळे हे प्रकाशन होऊ शकले.

या प्रयत्नाबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. असेच प्रयत्न उत्तरोतर होत राहावे. श्रीस्वामिमहाराजांच्या वाङ्मयातील सर्व समावेशक व्यापक दृष्टि लोकमानसापुढे येणे हे फार अगत्याचे आहे. ते प्रस्तुत प्रकाशनात साधले गेले असल्याने हा उपक्रम विशेष कौतुकास्पद आहे.

श्री. वासुदेवनिवास या संस्थेचा कार्यारंभ श्री. स्वामिमहाराजांच्या समग्र ग्रंथप्रकाशनाने झाला. या ग्रंथांचा परिशीलनात्मक परिचय होत राहणे व त्यातील मंत्रगर्भतेसारखी अलौकिकता साधकवर्गापुढे येत राहणे निश्चितच स्पृहणीय होय.

डॉ. गु. वा. पिंपळापुरे व त्यांच्या सर्व साहाय्यकांकडून उत्तरोत्तर श्री. स्वामिमहाराजांच्या वाङ्मयाचे कार्य होत राहावे, अशी सर्वान्तर्यामि- धी- प्रेरक भगवान दत्तात्रेयगुरुचरणी प्रार्थना.

कवीश्वरकुलजनुर्दत्तात्रेयशर्मा

श्री नर्मदा लहरी

विषयानुक्रम

श्री. ल. रा. पांगारकर यांचा लेख	
श्री नर्मदा लहरीचा अनुवाद (मराठी, हिंदी व गुजराथी)	१ ते ३२
श्री नर्मदा लहरी - चिन्तनिका	३३ ते ५१
मंत्ररचनेचे प्रवक्ते - श्रीस्वामी	५२ ते ८०
नर्मदाष्टक (श्रीशंकराचार्यविरचित)	८० ते ८३
प. पू. श्रीरंगअवधूतमहाराजविरचित रेवागीत	८४
परिशिष्ट (तळटीपा)	८५ ते ९२
श्रीनर्मदेची आरती	९२

श्रीवासुदेवानंदसरस्वती ऊर्फ टेंब्ये स्वामी

[प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामि महाराजांच्या जीवनकार्याचा हा एक उत्स्फूर्त आढावा. श्री स्वामींच्या समाधीनंतर लागलीच हा आढावा घेत आहेत संत वाङ्मयाचे थोर अभ्यासक मुमुक्षु मासिकाचे सुप्रसिद्ध संपादक श्री. ल. रा. पांगारकर. समकालीनाचे मनोगत म्हणून या लेखाचे महत्त्व विशेष आहे. लेखातील समाधि तिथि मात्र ज्येष्ठ वद्य ३० नसून आषाढ शु. १ ही होय. कारण लेखात दिलेल्या वेळी अमावास्या संपली होती.]

श्रीवासुदेवानंदसरस्वती ऊर्फ टेंब्ये स्वामी यांनी ज्येष्ठ वद्य ३० मंगळवारी रात्री ११॥ वाजतां हे मर्त्य शरीर सोडून अखंड समाधीचा अंगीकार केला. "मला समाधी येथेच (गरूडेश्वरी) द्यावी आता हे शरीर टिकेल असें दिसत नाही." असे उद्गार त्यांचे तोंडून कांही दिवस आधी निघत असल्याचें आम्हांस कळलें होतें.

स्वामींच्या दर्शनाचा लाभ आम्हांला नरसोबाचे वाडीस झाला होता. स्वामींची योग्यता फार मोठी होती. "स्वाध्यायाभ्यसन" रूप वाङ्मय तप स्वामीचे अतिशय झाले होते. स्वामींना योगाची, ज्योतिषाची, वैद्यकीची माहितीही पुष्कळ होती. स्वामींच्या हातून शेकडों लोकांवर परोपकार झाले आहेत. स्वामींनी पुष्कळ जीवांना शारीरिक व मानसिक क्लेशांपासून मुक्त केले आहे. स्वामींचा शिष्यपरिवार फार मोठा असून त्यांच्याविषयी सर्व भरतखंडांत हजारो लोकांची अत्यंत पूज्य बुद्धि आहे. असा महात्मा भरतखंडांत अलीकडच्या काळांत क्वचित झाला असेल. स्वामींना त्यांच्या भक्तमंडळीत **दत्तावतारच** समजतात.

स्वामींचे अनेक चमत्कार ऐकण्यांत येतात. स्वामींनी चमत्कारांनीही कित्येकांचे रोग बरे केले आहेत. योगविद्या, औषधपाणी व चमत्कारांच्या सिद्धि ह्या सर्व स्वामींपाशी

असल्यामुळे त्यांजकडे गेलेला रोगी अकृतकार्य क्वचित परत आला असेल. एका मूळव्याध असलेल्या मनुष्याला एका आसनाच्या द्वारें तीन दिवसात स्वामींनीं व्याधिमुक्त केलें आहे. काशीचे एक प्रख्यात संन्यासी स्वामींच्या दर्शनाची फार दिवस अपेक्षा करीत होते, तर स्वामींनी मोठ्या तांतडीने काशीस त्यांच्या देहपाताच्या पूर्वी ४ तास जाऊन त्यांची भेट घेऊन त्यांना समाधान दिल्याची गोष्ट एका काशीकर पंडिताच्या तोंडून आम्ही गेल्याच आठवड्यांत ऐकली आहे. स्वामीचें वेदाध्ययन बाळपणीच झालें, पण तेव्हांपासून वेदांनी स्वामींचे तोंड कधीच सोडलें नाही. "जरी कोणी करी पुसणें ।तरी होआवें ऐसें बोलणे ।नातरी आवर्तणें ।निगम कीं नाम ॥२२१ ॥ऋग्वेदादि तिन्ही ।प्रतिष्ठिजती वाग्भुवनी ।केली जैसी वदनी ।ब्रह्मशाळा ॥२२२ ॥" (ज्ञानेश्वरी अ. १७) हें बोलणें वासुदेवानंदसरस्वतीस्वामींना पूर्णपणे लागू पडते. त्यांच्यासारखा तपस्वी, विरक्त, शुद्धाचरणी, स्वाध्यायनिरत व आणखी साक्षात्कारी दत्तभक्त असा दिव्य ब्राह्मण ह्या काळी दुसरा आढळणे कठीण आहे. स्वामींचे नेहमी नरसोबाच्या वाडीस जाणे असे व तेथेच त्यांना दत्तदर्शन प्रथम झाले असे म्हणतात. हजारो लोकांनी त्यांच्या दर्शनाचा, उपदेशाचा व भजनपूजनाचा लाभ घेतला आहे. स्वामीमहाराजांसारखा एक महात्मा धर्मप्रसाराचे जेवढे काम करितो तेवढे हजारों वक्त्यांस व लेखकांस मिळूनही करितां येणार नाही. महात्म्याच्या भोवतालचें वातावरणच आधी एवढे पवित्र होत असते की, तेथे गेल्यावर मनुष्याचे नित्याचे दुर्विकार त्याला कांही काळ तरी सोडून जातात. स्वामींची ग्रंथसंपत्तिही विपुल आहे, पण त्यांच्या ग्रंथांपेक्षां त्यांच्या विभूतिमत्त्वाचीच लोकांस बहुतकाळ आठवण राहील. स्वामींचे वैराग्य तीव्र होतें, परदुःख निवारणार्थ झटण्याच्या कामी ते थोडीही कसूर करीत नसत. त्यामुळे त्यांच्या प्रेमळ व उदार स्वभावाचें स्मरण होऊन शेकडों भाविकांच्या डोळ्यांतून त्यांच्या समाधीचे वृत्त ऐकल्यावर शोकाश्रु आल्यावाचून राहाणार नाहीत. परमात्मा अशा महात्म्यांची परंपरा भरतखंडांत अविच्छिन्न ठेवो अशी त्यांच्या चरणी प्रार्थना करून दुःखभाराने जड झालेली ही लेखणी आम्ही खाली ठेवतों.

□ □ □

श्रीनर्मदा-लहरी

[अन्वय व अनुवाद]

नर्मदे हरसंभूते हरलिङ्गार्चनादृते
हरलिङ्गाञ्चिततटे जयाघं नर्मदे हर ॥ १ ॥

* * *

अन्वय - हरसंभूते, हरलिङ्गार्चनादृते, हरलिङ्गाञ्चित -तटे नर्मदे जय ।
नर्मदे अघं हर ।

* * *

श्रीशंकरापासून निर्माण झालेली, श्रीशंकराच्या पिंडीच्या पूजनाने जिच्याविषयी आदर व्यक्त केला जातो व जिचा तीरप्रदेश शिव पिंडींनी सुशोभित आहे अशी ही नर्मदा आहे. हे नर्मदे, तुझा जयजयकार असो.

हे नर्मदे, तू आमचे पाप दूर सार.

* * *

नर्मदा शिवकन्या है। शिवलिङ्गार्चनासे जिसके प्रति आदर व्यक्त किया जाता है ऐसी नर्मदा मैया का तीर शिवलिंगोंसे सुशोभित है। वह हमारे पाप दूर करें।

* * *

શિવના (અંગમાથી) ઉત્પન્ન થએલી ! શિવના લિંગના પૂજનમાં આદરવાળી ! શિવલિંગોથી યુક્ત તરવાળી ! હ નર્મદા.! તારો જય થાવ હે નર્મદા ! તું (મારા) પાપ ને હર.

नमः प्रातर्मातर्गिरिशदुहितर्नर्मद उत ।
क्षपायां रेवे ते नम इतमते मेकलसुते ।
नमो नित्यं सत्यं हि त उदकमत्यन्तकमकं
हरत्याधिं सा त्वमखिलविषहे मेऽर्पय सुखम् ॥ २ ॥

* * *

अन्वय :- गिरिशदुहितः मातः नर्मदे प्रातः नमः।
उत, इतमते, मेकलसुते, रेवे, क्षपायां ते नमः ।
सत्यं ते नित्यं नमः । हि ते उदकम् अत्यन्तकम्
अकं व्याधिं [च] हरति ।
अखिलविषहे, सा त्वम् मे सुखम् अर्पय ।

* * *

शिवकन्या असणाऱ्या आई नर्मदे, प्रातःकाळी तुला वन्दन असो.

तसेच, बुद्धीच्या अतीत असणाऱ्या, मेकलकन्ये रेवे [नर्मदे] रात्रिसमयी तुला वन्दन असो. खरोखरी तुला नित्य वन्दन असो. कारण, तुझे पाणी दुःखाचा व व्याधीचा अत्यन्त विनाश करते.

सर्व विषबाधा दूर करणारी तू आहेस. ती तू मला आनन्द दे !!

* * *

हे शिवकन्या नर्मदा मा ! तुम्हे प्रातःकालीन वन्दना रहे। बुद्धीसे अतीत हे नर्मदा मैय्या तुम्हे संध्यासमयी वन्दना- । तुम्हे नित्य वन्दना। हे मा! आपका पवित्र जल दुःख और व्याधिविनाशक, विषनिर्मित सकलबाधा नष्ट करनेवाला है। मुझे आपकी कृपासे सुख मिले।

* * *

શંકરની પુત્રી હે નર્મદા મૈયા ! તને પ્રાતઃકાલમા નમસ્કાર. હે બુધ્દિશાળી મેકલ પુત્રી રેવા ! તને રાત્રે નમસ્કાર. તને નિત્ય નમસ્કાર. તારુ અત્યંત કમનીય (સુન્દર) જળ ખરેખર સાચેજ આધિ (માનસિક પીડા) દૂર કરે છે. તમામ (પ્રકારના)વિષને હણનારી (માં) તે તુજ મને સુખ આપ.

महेशाङ्गोद्भूता सुरवरनराणामभिमता
युता सिद्धैर्याता प्रसभमिव पाश्चात्यजलधिम् ।
वृता भीमेनैषा हृतभजक-दोषा वरवृषा
सुभूषा सद्वेषा रुचिरवपुषा भात्यतिरुषा ॥ ३ ॥

* * *

अन्वय :- महेशाङ्गोद्भूता, सुर-वर नराणामभिमता, सिद्धैर्युता [नर्मदा]
प्रसभम् इव पाश्चात्यजलधिं याता ।

हृतभजकदोषा, वरवृषा, भीमेन वृता सुभूषा, सद्वेषा, एषा रुचिरवपुषा [युता]
अतिरुषा भाति ।

* * *

श्री शंकराच्या अंगापासून उत्पन्न झालेली, देवश्रेष्ठ व मनुष्य यांना पूज्य असणारी, सिद्धांचे सान्निध्य असणारी ही नर्मदा जणू लगबगीने पश्चिम सागराला मिळाली आहे.

भजकांचे दोष दूर करणारी, धर्मप्रिय असणारी, भीमसेनाने जिला वरले आहे, जिच्या अंगावर अलंकार आहेत, जिने सुन्दर वेष परिधान केला आहे अशी ही शोभनाङ्गी, अधिक रोषाच्या आविर्भावाने शोभून दिसते.

* * *

भगवान शिवके अङ्गसे उत्पन्न हे नर्मदे ! वह देवो तथा मानवोंको अत्यंत पूज्य हैं। सिद्धगणोसे युक्त वह द्रुतगतीसे पश्चिम समुद्र की ओर जाती है। धर्मप्रिय भीमसेनने उसका वरन किया है। वह भक्तोंके दोष दूर करती है। वह शोभनाङ्गी है। सुन्दर वेष और अलंकार धारण करती है। अपने रोषयुक्त आविर्भावसे विशेष शोभायमान प्रतीत होती है।

* * *

શિવના શરીરમાંથી ઉત્પન્ન થયેલી શ્રેષ્ઠદેવોને અને મનુષ્યોનપ્રિય, જાણે કે ઉતાવળ થી પશ્ચિમ સાગર તરફ જતી, ભજન (સેવન) કરનાર (ભકતો) નાદોષો ને હરનારી, શ્રેષ્ઠધર્મવાળી, આ (નર્મદા) ભીમસેનવડે વરાઈ(લગ્ન કરાયેલી) છે સુન્દર આભૂષણોવાળી, સુન્દર વેષવાળી, ગુસ્સા વગરની(દયાળુ) (આ નર્મદા) સુન્દર જળરુપી શરીરવડે શોભી રહી છે.

तटे यस्यास्तत्वा तप उपरिगैर्दुश्चरमरं
वरं ह्यत्रेः पत्नी परममनसूया गतभया ।
स्वपुत्रत्वेनैव त्रिभुवनसमाराध्यमभवं
समापास्मद्दैवं क इह सरितं तां तु न नमेत् ॥ ४ ॥

* * *

अन्वय :- यस्याः तटे उपरिगैः दुश्चरम् तपः अरं तप्त्वा
गतभया अत्रेः पत्नी अनसूया त्रिभुवनसमाराध्यम् अभवम्
अस्मद्दैवं स्वपुत्रत्वेन एव परमं वरं समाप ।
इह कः तां सरितं न नमेत् ।

* * *

जिच्या तीरावर सात्विक पुरुषांना दुःसंपाद्य असणारे तप दीर्घकाळ आचरण करून, भयाला न शिवता अत्रि-पत्नी अनसूयेने त्रिभुवनाला आराधनीय असणाऱ्या व संसाराला दूर सारणाऱ्या अथवा जन्मादि विकाररहित असणाऱ्या आमच्या दैवताला [श्रीदत्तात्रेयाला] पुत्ररूपाने प्राप्त करून श्रेष्ठ वर मिळवून घेतला.

या जगात, त्या नदीला कोण बरे वन्दन करणार नाही?

* * *

नर्मदा की तटपर कठिनतर तपाचरण करके निर्भय हुए अत्रि-पत्नी अनसूयाने त्रिभुवनके आराध्य, भवनाशक हमारे दैवत श्रीदत्तात्रेयको पुत्ररूपसे प्राप्त किया है।इसलोकमे इस सरिता को कौन भावपूर्ण वन्दना नही करेगा ? [श्री दत्तात्रेय अभव याने उत्पत्तिरहित नित्य हैं।]

* * *

જેના કિનારા ઉપર રહેનારા (દેવોથી) પણ દુષ્કર એવુ તપ ખુબ તપી ભયરહિત બનેલા અત્રિના પત્ની અનસૂયાએ ત્રણેય ભુવનો વડે આરાધના કરવા યોગ્ય ભવ (જન્મ) રહિત (અજન્મા) એવા અમારા દેવને (દેવત) (શ્રીદત્ત ભગવાનને) પોતાના પુત્ર તરીકે શ્રેષ્ઠ વરદાન રૂપે મેળવ્યા. આ લોકમાં તે (નર્મદા) નદીને કોણ નમન નહિ કરે ?

प्रयान्ती सिन्धुं या प्रतिहतगतिर्विन्ध्यपदतो
महावेगाऽभङ्गा सकलमलभङ्गा वरभगा ।
नगान्भित्त्वा नैकानपि विविधलोकान् स्वबलतः
पुनातीयं रेवा जगति वरभावाऽह्रतभवा ॥५ ॥

* * *

अन्वय- सिन्धुं प्रयान्ती या विन्ध्यपदतो प्रतिहतगतिः महावेगा अभङ्गा सकलमलभङ्गा, वरभावा अह्रतभवा वरभगा अनेकान् अपि नगान् भित्त्वा जगति इयं रेवा स्वबलतः विविध लोकान् पुनाति ।

* * *

सागराला [पश्चिम] जात असता जिची गति विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशी अवरुद्ध होते, जिला फार वेग आहे, जिला विनाश नाही [किंवा खोल प्रवाह असल्याने जिला मोठे तरङ्ग नाहीत], सर्वांच्या [सर्व] पातकांचा जिच्यामुळे विनाश होतो, जिचे ऐश्वर्य थोर आहे अशी, जिला भक्ति प्रिय आहे, जिच्यापासून शिवाला [कोणालाहि] दूर नेता आले नाही, शिवाशी एकरूप असलेली अशी ही नर्मदा मोठमोठ्या पर्वतांना देखिल भेदून [पुढे जात] या जगात आपल्या सामर्थ्याने अनेक लोकांना पावन करते.

* * *

पश्चिम समुद्र की ओर जाते हुए नर्मदा की गती विन्ध्याचल की तराई मे अवरुद्ध होती है। वह वेगवान, अभंग है और गंभीर होने के कारण बडी लहरोंसे युक्त नही है। सबके सर्व दुरितोंका विनाश करनेवाली यह सरिता श्रेष्ठ भाग्यसे युक्त है। अपने प्रचण्ड वेगसे पर्वतोंका भेदन करती है। उसका ऐश्वर्य अतुलनीय है। सबको पावन करनेवाली भक्तप्रिया नर्मदा शिवस्वरूपसे एकात्म है। उसका सर्व कल्याणकारी स्वरूप अबाधित है।

* * *

વિન્ધ્યના પાત્રમાંથી (નીકલેલી) અત્યંત વેગવાળી ભંગ વગરની બધાના મળને દૂર કરનારી, ઉત્તમ ભાગ્યવાળી (ગતિને અટકાવનાર) (માર્ગમાં આવતા) અનેક પર્વતોને ભેદીને પણ અટકેલી ગતિથી સમુદ્ર તરફ જનારી. ઉત્તમ ભાવવાળી, જન્મને હરનારી જેઆ રેવા (છે) (તે) જગતમાં પોતાની શકિતથી જાતજાતનાં લોકોને પાવન કરે છે.

प्रसिद्धास्ते यस्या जनिरमरकण्ठे ऽमरवृते
मते नाभिः सिद्धेश्वरपुर उतासौ भृगुपुरे ।
परे सिन्धौ लीना जगति मलिनानां सुमतिदा
समुद्धर्त्री भर्त्री निजभजकलोकस्य गतिदा ॥ ६ ॥

* * *

अन्वय :- यस्या जनिः अमरवृते अमरकण्ठे प्रसिद्धा आस्ते । यस्या नाभिः मते सिद्धेश्वरपुरे। उत असौ भृगुपुरे परे सिन्धौ लीना जगति मलिनानां सुमतिदा, समुद्धर्त्री, भर्त्री, निजभजकलोकस्य गतिदा [नर्मदा] अस्ति ।

* * *

जिचा उद्‌गम देवांनी गजबजलेल्या अमरकण्टक स्थळी आहे. जिचे नाभिस्थान मान्य असणाऱ्या सिद्धेश्वरपुरात नेमावर इथे आहे व जी भृगुपुरात भडोच नगराजवळ पश्चिम- सागरात लीन होते. अशी जगातील पापी लोकांना सद्‌बुद्धि देणारी, [सर्वांचा] सर्व तऱ्हेने उद्धार करणारी, सर्वांचे भरणपोषण करणारी, स्वतःच्या भक्तजनांना सद्‌गति देणारी ही नर्मदा आहे.

* * *

जिसका उद्‌गम देवव्याप्त प्रसिद्ध अमरकण्टकमे है, नाभिस्थान सिद्धेश्वर [महेश्वर] में, और भृगुपुरमें जो पश्चिम समुद्रमें लीन होती है, ऐसी नर्मदा सद्‌बुद्धिदात्री, सबका उद्धार तथा भरणपोषण कर अपने भक्तोंको उत्तम गती प्रदान करनेवाली है।

* * *

દેવોથી વીંટળાએલી અમરકંટક પર્વત પર જેનો જન્મ જાણીતો છે, માન્ય સિધ્દેશ્વર પુરમાં જેણી નાભી (મધ્યભાગ)) જાણીતી છે. ભૃગુપુર (ભરૂચ) માં જે પશ્ચિમ સમુદ્રમાં ભળી જાય છે. મલિન(પાપીઓને) સન્મતિ આપનારી તે નર્મદા પોતાના ભકતજનો નો ઉદ્ધાર કરનારી ભરણ પોષણ કરનારી અને (અંતે) મોક્ષ આપણારી છે.

सरस्वत्याः सत्या जलमिह पुनाति त्रिदिनतः ।
स्म कालिन्द्या नद्या अपि च सलिलं सप्तदिनतः ।
महाभङ्गा गङ्गाखिलदुरितभङ्गा सपदि सा
महाभावा रेवा कथमपि हि दृष्ट्यैव सहसा ॥ ७ ॥

* * *

अन्वय :- इह सत्याः सरस्वत्याः जलं त्रिदिनतः पुनाति । कालिन्द्या च अपि जलं सप्तदिनतः पुनाति । सा महाभङ्गा गङ्गा सपदि अखिलदुरितभङ्गा । महाभावा रेवा कथमपि दृष्ट्या एव सहसा पुनाति ।

* * *

या भूलोकात सती सरस्वतीचा प्रवाह जीवाला पवित्र करण्यासाठी तीन दिवस घेतो. यमुना नदीचे पाणी देखील सात दिवसांनी पवित्र करते. महाप्रवाहशाली गङ्गा तत्काल सर्व दुरितांचा नाश करते. महासामर्थ्यशाली नर्मदा मात्र केवळ अवचित पडलेल्या दृष्टिमात्राने एकदम जीवाला पवित्र करते.

* * *

इस भूमी में सरस्वती नदी का जल तीन दिनों में पवित्र करनेवाला होता है ।यमुना का जल भी सात दिनों में पवित्र करता है। उत्तुंग तरंगवाली श्रेष्ठ गङ्गा तत्काल दुरितोंका नाश करती है। (किन्तु) महासामर्थ्यशाली नर्मदा किसी भी कारणसे दृष्टि में आते ही पवित्र करती है।

* * *

સતી સરસ્વતી (નદી) નું જળ આ લોકમાં (સેવા સ્નાન કરનાર મનુષ્યને) ત્રણ દિવસમાં પવિત્ર કરે છે. અને યમુના નદી નુ પાણી પણ સાત દિવસમાં પાવન કરે છે. મોટા મોજાવાળી અને તમામ પાપોને નાશ કરનારી તે ગંગા તરત જ (એકજ વારના સ્નાન થી) પાવન કરે છે. જયારે મોટા પ્રભાવવાળી નર્મદા તો ગમે તે રીતે માત્ર દર્શનથી જ તરત પાવન કરે છે.

स्वभावादासिन्धोरियमचलजा भाति सुलभा
त्रिषु स्थानेष्वेषा हृतमलिनदोषा न सुलभा
नगर्यामोङ्काराभिधपशुपतेरुत्तरगति -
र्युता वौराभिख्येऽपि च भृगुमुनेः क्षेत्र उशति ॥ ८ ॥

* * *

अन्वय :-इयम् अचलजा आ सिन्धोः स्वभावात् सुलभा अस्ति । हृतमलिनदोषा एषा त्रिषु स्थानेषु न सुलभा ओङ्काराभिधपशुपतेः नगर्याम् उत्तरगतिः, वौराभिख्येऽपि क्षेत्रे युता, भृगुमुनेः उशति क्षेत्रे च युता [न सुलभा]।

* * *

अमरकण्टक पर्वतात उगम पावलेली ही नर्मदा सागराला मिळेपर्यन्त निसर्गतः सुगम आहे. पापी लोकांचे दोष जिने हरण केले आहेत अशी ही तीन ठिकाणी मात्र सुगम नाही. [ती तीन क्षेत्रे] - ओंकारेश्वराच्या नगरीत उत्तरदिशेने वाहत असता, वौरा नावाच्या क्षेत्रात मिळाल्यानंतर आणि भृगुमुनीच्या सुंदरशा क्षेत्रात [भडोच] मिळाल्यानंतर -

वरील श्लोकातील ओंकारेश्वर व भडोच ही क्षेत्र स्थाने प्रसिद्धच आहेत. भडोच नगरालाच भृगुकच्छ, भरूच, भृगुक्षेत्र ही दुसरी नांवे आहेत. या श्लोकात उल्लेखिलेले वौरक्षेत्र म्हणजे चांदोद व कर्नाली या गावामध्ये असलेल्या और-नदीचे क्षेत्र. और म्हणजे करवत. पुराच्या वेळी ही नदी करवतीप्रमाणे जमीन चिरून प्रदेश अगदी चिखलमय करून सोडते व पूर ओसरल्यानंतर इथे पाणीच राहत नाही. त्यामुळे स्नान करता येत नाही. त्यादृष्टीने वरील श्लोकातील निर्देश मानावा.

* * *

अमरकण्टक (अचल जा) पर्वतसे निकली हुई नर्मदा समुद्रमें पहुँचते तक स्वभावतः सुलभ है। पातकी लोगोकें, दोषोंका विनाश करनेवाली यह सरिता तीन स्थानों मे (मात्र) सुगम नही। ओंकारेश्वर नगरी में उत्तर दिशामे बहती हुई, बौरा नदी के क्षेत्र मे (चांदोद कर्नाली के समीप) और भृगुमुनी के सुन्दर क्षेत्रमें वह सुलभ नही।

* * *

મેકલ પર્વતમાંથી નીકળેલી આ (નર્મદા) સમુદ્ર સુધી સ્વાભાવિક સુલભ રીતે દેખાય છે. પરંતુ ઉત્તરગતિથી યુકત (નર્મદા) ઓંકારપશુપતિ (ઓંકારેશ્વર) ની નગરીમાં ઓર નામના ક્ષેત્રમાં રેવા અને ઓર (સંગમમાં) અને સુંદર ભૃગુક્ષેત્ર (ભરૂચ) માં (સાગરને મળતી હોવાથી) દુર્લભ છે.

पुनन्त्यन्या मान्या अपि जगति गङ्गादिसरितः
प्रयागादिस्थाने महति न हि सर्वत्र दुरितात् ।
इयं रेवा देवाधिपतिशिवसेव्योभयतटा
तटे यत्र क्वापि स्वकमिह पुनात्याजलनिधेः ॥ ९ ॥

* * *

अन्वय :- जगति मान्या अपि अन्या गङ्गादिसरितः महति प्रयागादिस्थाने पुनन्ति; सर्वत्र हि दुरितात् न [पुनन्ति]। देवाधिपशिवसेव्योभतयटा इयं रेवा आ जल-निधेः यत्र क्वापि तटे इह स्वकं पुनाति ।

* * *

गंगा- प्रभृति दुसऱ्या नद्या जगात मान्य असल्या तरी त्या मोठ्या प्रयागादि स्थळी[च] पापापासून पावन करीत असतात; सर्वत्र करीत नाहीत. देवाधिदेव शंकराने जिच्या दोन्ही तीरावर निवास स्वीकारला अशी ही नर्मदा मात्र सागरापर्यंतच्या विशाल प्रदेशात कुठल्याही तीर प्रदेशात येणाऱ्या आपल्या भाविकाला पवित्र करते.

* * *

मान्यताप्राप्त गंगादी श्रेष्ठ नदियाँ प्रयाग जैसे तीर्थस्थानोमेंही पवित्रता की विशेष महत्ता रखती है।सभी स्थानों पर पापोंसे मुक्त करानेवाली नही है।किन्तु नर्मदा मात्र देवाधिदेव महादेवजीने जिसके उभय तटोंपर निवास किया है, समुद्रमें पहुँचते तक सारे स्थानों में पवित्र करानेका प्रभाव रखती है।

* * *

જગતમાં માન્ય બીજુ ગંગા વગેરે નદીઓ પણ પ્રયાગ વગેરે મોટા સ્થાનોમાં જ (માણસને) પાપમાંથી પવિત્ર કરે છે. (જયારે) દેવોના અધિપતી (મહાદેવ) શિવ જેના (ઉત્તર અને દક્ષિણ) બન્ને તટો સેવે છે. તેની આ રેવા આ લોકમાં (અમરકંટકથી માંડી) સમુદ્ર સુધી જે કોઈ તટો પણ (સ્નાન કરનાર) સ્વભકતને પવિત્ર કરે છે.

त्रिशूलाङ्कान्यच्छान्यगणितविमानानि त उप-
र्युपर्यस्याः कूलं सुविमलमुपादाय सततम् ।
स्थिताः शम्भोर्दूता मृतमिह तु नेतुं शिवपुरं
वरं तेषामुच्चैरहमहमिकाशब्द उदितः ॥ १० ॥

* * *

अन्वय :- अस्याः ते सुविमलं कूलम् उपरि उपरि त्रिशूलाङ्कानि अच्छानि अगणितविमानानि उपादाय मृतं, वरं शिवपुरं नेतुं शम्भोर्दूताः सततम् इह स्थिताः । तेषाम् उच्चैः अहमहमिकाशब्द उदितः ।

* * *

अशा तुझ्या पवित्र तीराच्या उंच भागी, ऊर्ध्वभागी [आकाशात] ज्यावर त्रिशूलाचे चिह्न आहे अशी अगणित धवळ विमाने घेऊन, इथे मरण पावलेल्या जीवाला श्रेष्ठ अशा कैलासाला घेऊन जाण्यासाठी इथे शंकराचे दूत नित्य उभे आहेत.

मी[च] याला घेऊन जाईन; तुला हे काम मी करू देणार नाही अशा तऱ्हेचे शिवदूतामधील मोठमोठ्याने चाललेले अहमहमिकेचे शब्द इथे नेहमीच ऐकू येतात.

* * *

तुम्हारे पवित्र तटों के उर्ध्वभागमें, त्रिशूल चिन्हांकित अगणित धवल विमानों को लेकर, यहाँ मृत्यु पानेवाले लोगों को शिवपुर कैलास में पहुँचाने हेतु, शिवदूत नित्य उपस्थित है। ऐसे जीवोंको तत्परतासे शिवगती देनेके उनके स्पर्धायुक्त प्रयत्नोंके परिणामस्वरूप यहाँ कोलाहल होता रहता है।

* * *

આ (નર્મદા) અત્યંત પવિત્ર તટની ઉપર નભુકમાં ત્રિશુળના ચિહનવાળા, સુન્દર અસંખ્ય વિમાનોને લઈને શિવના તે દુતો આહી (આ તટ ઉપર) મરેલાને ઉત્તમ શિવલોકમાં લઈ જવા માટે હમેશા ઉભા છે. હુ પહેલોહુ પહેલો (એને લઈ ભઉ) એવો તેમનો શબ્દ મોટે થી ઉઠયો.

बहिः शब्दात्तस्मात् प्रविगलितधैर्या यमभटाः
मृतान्नेतुं प्राप्ता अपि सपदि ते वेपितहृदः ।
अधीरा धीरा द्राक् तत उत परावृत्य सजवाः
स्ववासं संजग्मुः खलु तत इतः को नरकभाक् ॥११॥

* * *

अन्वयः- तस्मात् बहिः शब्दात् ते यमभटाः मृतान् नेतुं प्राप्ता अपि द्राक् प्रविगलितधैर्याः [अभवन्] धीरा सपदि वेपितहृदः ते अधीरा तत उत परावृत्य सजवाः स्ववासं संजग्मुःखलु । तत इतः को नरकभाक् ।

* * *

त्या बाहेर चाललेल्या [अहमहमिकेच्या] शब्दाने, ते यमाचे दूत मृत्यु पावलेल्यांना घेऊन जाण्यासाठी आले असले तरी [आता] त्यांचे धैर्य गळाले.

पूर्वी त्यांना धैर्य असले तरी [आता] एकाएकी हृदयाचा थरकाप होऊन ते घाबरून तिथून माघारी फिरून काढता पाय घेऊन धावत आपल्या ठिकाणी खरोखरी निघून गेले [आहेत].

तेव्हापासून इकडे [आता] नरकाचा वाटेकरी कोण राहिला?

* * *

बाहरके इस कोलाहलके कारण मृत जीवोंको ले जानेवाले यमदूत गलितधैर्य हो गये। बहुत धैर्यशाली बनकर आए हुए इन यमदूतोंका हृदय भय से कांप उठा और घबराए हुए वे अपने स्थानोंपर वापीस लौट गए। ऐसी अवस्थामें यहां से नरकमें जानेवाला कौन रहेगा? अर्थात् कोई भी नही ।

* * *

પરંતુ મરેલાઓને લેવા માટે આવેલા તે યમદૂતો તે શબ્દથી તેમનુ ધૈર્ય જતુ રહેતા. એકાએક કંપતા હૃદયવાળા ધીર હોવા છતા અધીરાબની તરત જ તે સ્થાનમાંથી બહાર નીકળી (પાછાફરી) વેગથી (જલ્દી જલ્દી) પોતાના વાસ (યમલોક) માં ખરેખર જતા રહ્યા, ત્યાર પછી (તેથી) આ સ્થાનમાંથી કોણ નરકમાં જશે ?

प्रभावोऽस्या मृत्युंजयदुहितुरेवं हि सरितो
यतोऽतोऽसौ रेवा नृमरणभवान्तास्तु विदिता ।
न तां कः सेवेतानुपदमृतभीतिर्हतमतिः
समानां तापानामपि च दुरितानां प्रशमनीम् ॥ १२ ॥

* * *

अन्वय :- मृत्युञ्जयदुहितुः अस्याः सरितो हि एवं यतः प्रभावः अतः असौ रेवा नृमरणभवान्ता विदिता अस्ति।

अनुपदमृत-भीतिः हतमतिः कः समानाम् अपि तापानां दुरितानां च प्रशमनीं तां न सेवेत ।

* * *

मृत्युंजय शंकराची कन्या असलेल्या या नदीचे हे असे ज्या अर्थी सामर्थ्य आहे त्यामुळे ही नर्मदा मनुष्याचे मरण व संसार यांचा विनाश करणारी म्हणून प्रसिद्ध [झाली] आहे.

मरणाचे भय ज्याच्या नित्य पाठीशी आहे असा कोण नतद्रष्ट पुरुष सर्व दुःखांचा व पापांचा नाश करणाऱ्या तिचा आश्रय घेणार नाही?

* * *

मृत्युंजय शंकर की कन्या यह सरिता अपने सामर्थ्यसे मनुष्योंके मरण तथा सांसारिक बंधनोका विनाश करनेमें प्रसिद्ध है। ऐसा कौन मूढमति होगा जो मृत्यु का भय सदैव साथ रखकर, भय तथा दुःखोंका विनाश करनेवाली इस सरिता का आश्रय नही लेगा?

* * *

જેથી મૃત્યુને જીતનાર (શિવ) પુત્રી આ નદીનો ખરેખર આવો (ઉપર વર્ણાવે તેવો) પ્રભાવ છે. તેથી તે નર્મદા મુનુષ્યના જન્મમરણનો અંત કરનાર તરીકે જાણીતી છે. તમામ તાપો અને તમામ પાપોનો પણ નાશ કરનારી તેને ભયરહિત થયેલો અને જેને (સદ બુધ્દી) મતિ છે. એવો કયો માણસ પગલેને પગલે નહી સેવે?

यदीयाम्बुस्पृष्टः स्पृशति गतियोगेन पवनो
मनोहृद्यं यं तं तमपि स पुनातीति महिमा ।
प्रतीतो यस्याः सा जगति गतिदासावभयदा
सदा सक्तान् युक्तान् किमुत भजतामुद्धरति नो ॥ १३ ॥

* * *

अन्वय :- यदीयाम्बुस्पृष्टः पवनः मनोहृद्यं यं गतियोगेन स्पृशति तं तम् अपि सः पुनाति इति यस्याः महिमा जगति प्रतीतः सा असौ अभयदा गतिदा सदा सक्तान् युक्तान् उद्धरति । भजतां नो उद्धरति किमुत ?

* * *

जिच्या जलाचा स्पर्श झालेला वारा ज्या भाग्यवंताला यदृच्छेने स्पर्श करतो त्या प्रत्येकाला तो [वारा] पवित्र करतो. असा जिचा प्रभाव जगात प्रत्ययाला आला ती ही अभय देणारी व उत्तम गति मिळवून देणारी [नर्मदा] संसारात सदा रमणाऱ्या व योग-मार्गाने जाणाऱ्यांना उद्धरून नेते.

[आपल्या] भक्तांना मग काय, ती उद्धरून नेणार नाही?

उद्धार करताना जी जीवाचा अधिकार वा अनधिकार [संसारासक्ति वा वैराग्य] पाहत नाही ती भक्ताची उपेक्षा करील काय?

* * *

नर्मदा के जलसे स्पर्शित पवन जिस भाग्यवानको यदृच्छासे स्पर्श करता है, वह उसे पवित्र कर देता है।ऐसी प्रभावशाली नर्मदा सबको अभय तथा उत्तम गति प्रदान करती है।योगमार्गसे जानेवाले, तथा संसारी जीवोंका भी जो उद्धार कर देती है, क्या वह अपने भक्तोंका उद्धार नही करेगी?

* * *

જેના જળથી સ્પૃષ્ટ થયેલો પવન ગતિના યોગથી મનને આનન્દ આપનાર જેને જેને અડકેછે. તેને તેને પણ તે (પવન) પવિત્ર કરે છે. આ પ્રમાણે જેનો મહિમાં જગતમાં જાણીતો છે. તે ગતિ (મોક્ષ) આપનારી અને અભય આપનારી પેલી ગંગા તેને સેવનારા ઓમાંના (તેની સાથે) સતત સંગવાળા અને જોડાએલા ઓને નહી ઉધ્દરેશુ ?

यदीयं पानीयं सदमृतमयं चित्सुखमयं
सुपेयं चायुष्यं मतिदमुत वर्चस्यमभयम् ।
यशस्यं चक्षुष्यं विहितविजयं स्वर्ग्यमलयं
सुभव्यं सद्गेयं सकलजगदारोग्यविजयम् ॥ १४ ॥
सुरप्रार्थ्यं पथ्यं स्वयमिह च पूज्यं विजयते
जगन्मान्यं धन्यं मलहृदिह लभ्यं तु नियतेः।
नियोगात्सा रेवा नृभवदवदावार्तिशमनी
मनीषीड्या पायादविरतमपायाद् वरधुनी ॥ १५ ॥

* * *

अन्वय :-यदीयं पानीयं सत् अमृतमयं, चित्सुखमयं, सुपेयं, च आयुष्यम्, मतिदम् उत वर्चस्यम् अभयम्, यशस्यं, चक्षुष्यं, विहितविजयं, स्वर्ग्यम्, अलयम्, सुभव्यं, सद्गेयं, सकल-जगदारोग्यविजयम् [वर्तते]।

[यदीयं पानीयं] सुरप्रार्थ्यं पथ्यम् धन्यम्, इह च पूज्यं विजयते । नियतेः नियोगात् जगन्मान्यं, धन्यं, मलहृत् इह तु यदीयं पानीयं लभ्यम् । नृभवदवदावार्तिशमनी, मनीषीड्या, सा वरधुनी रेवा अपायात् पायात् ।

* * *

जिचे पाणी चांगले, अमृतरूप, चिदानन्दस्वरूप, [गोड] उत्तम पिण्याजोगे आणि आयुष्य देणारे, बुद्धि देणारे व तेज देणारे, अभय देणारे, यश देणारे, दृष्टीला हितावह, विजयाचे आश्वासन देणारे, स्वर्ग मिळवून देणारे, अविनाशी, अत्यंत पुण्यकारक, सज्जनांना गेय असणारे आणि सर्व जगाला आरोग्याचा लाभ करून देणारे आहे.

देवांना [सुद्धा] हवेसे वाटणारे, हितकर, धन्यता देणारे आणि या जगात पूजनीय असणारे जिचे पाणी [प्रवाह] सर्वोत्कृष्ट आहे.

जगात मान्यता पावलेले, धन्यता प्रदान करणारे, पाप विनाश करणारे जिचे पाणी इथे मात्र [सर्व लोकांच्या] भाग्यवशात् उपलब्ध झाले आहे.

मनुष्यमात्राच्या संसार दावानलाचे दुःख दूर करणारी, देवांना स्तुतिपात्र असणारी ती श्रेष्ठ नदी नर्मदा दुःखापासून [विनाशापासून] [आमचे] रक्षण करो.

* * *

नर्मदा का जल अमृतमय, चिदानन्दस्वरूप सुपेय, आयुवृद्धिकारक, बुद्धि, श्रेष्ठता, यश, अभय देनेवाला, तथा दृष्टिदोष दूर करनेमें समर्थ, विजय का आश्वासन देनेवाला, स्वर्गप्राप्तिकारक, अविनाशी, अत्यंत पुण्यकारक सज्जनोंसे स्तुत्य तथा सकल आरोग्यकारक है।

(नर्मदा का जल) देवदेवताओंको प्रिय, हितकर, इस जगत् में पूजनीय, यशप्रद, धन्यता प्रदान करनेवाला तथा पापविनाशक, अत्यंत भाग्यसे यहां सबको प्राप्त हुआ है। मनुष्य मात्र के संसार दुःख दूर करनेवाली और श्रेष्ठ मनीषीयोंको पूजनीय नर्मदा माता संकटोमें हमारी रक्षा करे।

* * *

સત અમૃતમય ચિત અને આનન્દ મય પીવામાટે અત્યંત યોગ્ય, આયુષ્ય વધારનારુ બુધ્દી આપનારુ, તેજ વધારનાર, ભયરહિત કરનારુ, યશ આપનારુ, આખનુ તેજ વધારનારુ, વિજય આપનારુ, સ્વર્ગ આપનારુ, લય (નાશ) ન પામનારુ અત્યંત ભવ્ય સજજનોથી પ્રશંસા કરાતુ સમસ્ત જગતમે આરોગ્ય અને વિજય આપનાર દેવોથી ઈરછાતુ પથ્ય (હિતકારક) અને પોતે જાતે જ પૂજય એવૂ જેનુ પાણી વિજય પામે છે. અને જે જગત વડે માન આપવા યોગ્ય, ધન્ય, મલ (મળ અને પાપ) ને દૂર કરનારુ એવું જેનુ પાણી છે. તે મનુષ્યના સંસાર રૂપી દાવાનળના દુઃખને શાંત કરનારી બુધ્દીમંતોથી વખાણ કરવા યોગ્ય શ્રેષ્ઠ નદી સંકટ(મૃત્યુ) માંથી અમારુ સતત રક્ષણ કરો.

नियम्यात्मानं ये विहितनियमाः सन्तत -
परिक्रमं कुर्वन्त्यस्या अमलजलसेवैकनियमाः ।
सुपूतास्ते धन्या जगति बहुमान्याः परगतिं
व्रजन्त्येवं रेवा जयति खलु शर्वाङ्गजनिता ॥ १६ ॥

* * *

अन्वय :- विहितनियमाः अमलजलसेवैकनियमाः ये आत्मानं नियम्य अस्याः परिक्रमं कुर्वन्ति ते जगति धन्याः बहुमान्याः सुपूताः परगतिं व्रजन्ति।

शर्वाङ्गजनिता रेवा एवं जयति खलु।

* * *

नियमांचे आचरण करून, [जिचे] स्वच्छ पाणी सेवन करणे हाच ज्यांचा एकमात्र नियम आहे असे जे [पुरुष] स्वतःचा निग्रह करून हिची परिक्रमा करतात ते जगात धन्य असून अत्यंत मान्यता पावलेले, अत्यंत पवित्र झालेले, असे पुरुष, श्रेष्ठ गतीला जातात.

शंकराच्या अंगापासून जन्माला आलेली नर्मदा याप्रमाणे खरोखरी विजय शालिनी झाली आहे.

* * *

सारे नियमोंका पालन करते हुए नर्मदाके अमल जल के सेवन का नियम कर जो स्वयं अनुशासन से इसकी परिक्रमा करते है वे धन्य है।वे मान्यता प्राप्त, और अत्यंत पवित्र होकर श्रेष्ठ गति को प्राप्त होते है। भगवान शिवके अङ्गसे निर्मित यह रेवा विजयशालिनी है।

* * *

નિયમોનું પાલન કરનારી નિર્મલ જળનુ (સતત) સેવન જેનો એકમાત્ર નિયમ છે એવો જે (પરિક્રમા કરનારાઓ) પોતાની જતને કાબુમાં રાખીને આ(નદી) ની પરિક્રમા કરે છે. તે સૌ સારીરીતે પવિત્ર ધન્ય અને જગતમાં બહુમાન આપવા યોગ્ય બની ઉત્તમ ગતિ (મોક્ષ) ને પામે છે. તે આ રીતે શંકરના શરીરમાંથી ઉત્પન્ન કરાએલી નર્મદા ખરેખર જય પામે છે.

अये रेवे देवेडितगुणगणे मर्त्यतरणे
क्षणेनापि स्नानात् परमगतिदाभीष्टवरदा ।
त्वमेवातो देवा अपि तव न चेच्छन्ति हि तटं
परित्यक्तुं वक्तुं तव गुणगणान्कः प्रभुरिह ॥ १७ ॥

* * *

अन्वय :- देवेडितगुणगणे, मर्त्यतरणे, अये रेवे, स्नानात् क्षणेन अपि त्वमेव परमगतिदा अभीष्टवरदा [भवसि] ।

अतः देवा अपि तव तटं परित्यक्तुं न च इच्छन्ति ।

इह तव गुणगणान् वक्तुं कः प्रभुः ।

* * *

देवांनी जिच्या गुणगणांची स्तुति केली आहे आणि मनुष्यांना जी नौकेप्रमाणे तारून नेते अशा रेवे, स्नानमात्राने, क्षणात देखील तू पुरुषांना परमगती प्राप्त करून देणारी व इष्ट वर देणारी झाली आहेस.

म्हणून देव देखील तुझे तीर सोडून देण्याचे मनात आणत नाहीत.

या जगात तुझ्या गुणगणांचे वर्णन करण्यासाठी कुणामध्ये सामर्थ्य आहे?

* * *

हे रेवे! देवोने आपके गुणोंकी स्तुति कि है। मनुष्यमात्रों को तो आप नौका समान तारती है। स्नानमात्रसेही इष्ट वरप्रदायक और श्रेष्ठ गती प्रदान करती है। इस जगत में आपका यथार्थ गुणवर्णन करने में कौन समर्थ है।

* * *

દેવો વડે જેના ગુણ ગણોની સ્તુતિ કરાઈ છે. અને જે માણસને (ભવસાગરમાંથી) તારનારી હોડી છે. એવી હે રેવા (તારા જળમાં) (એક) ક્ષણ પણ સ્નાન કરવાથી તુ જ (માત્ર) પરમગતિ આપનારી અને ઈચ્છિત વરદાન આપનારી છે તેથી દેવો પણ ખરેખર તારા તટને છોડવાની ઈચ્છા કરતા નથી (હે નર્મદા) તારા ગુણ ગાણોને કહેવા માટે આ જગતમા કોણ સમર્થ છે ?

यदीये सत्तोये हिमनगसुतागर्भगगणा—
—धिपस्योत्कृत्यारं शिर इह सुरारिः स्वहितकृत् ।
महामायावी प्राक्षिपदपभयोऽतर्क्यमहिमे —
श्वरस्यात्मच्छीर्षाद् गतरुधिरसंस्पर्शवशतः ॥ १८ ॥
ततोऽनन्ता आब्धेः स्मरहरसुतायास्तु सलिलेऽ -
मलेऽनन्ता जाता इह रुधिरभासः खलु शिलाः ।
अभूवन् गाणेशा अखिलमलसंक्षालनपरा
वरा पूज्या विघ्नक्षपणपटवस्तेऽपि वरदाः ॥ १९ ॥

* * *

अन्वय :- स्वहितकृत् महामायावी सुरारिः अपभयः हिम-नग-सुता-गर्भग-गणाधिपस्य शिर अरम् उत्कृत्य इह यदीये सत्तोये प्राक्षिपत् ।

अतर्क्यमहिमेश्वरस्य आत्मच्छीर्षात् गत-रुधिर-संस्पर्श-वशतः ततः स्मरहरसुतायाः तु अमले सलिले आ अब्धेः अनन्ताः रुधिरभासः खलु शिला इह जाताः ।

ते अपि अखिल मल-संक्षालनपराः, वरदाः वरा पूज्या विघ्नक्षपण-पटवः गाणेशा अभूवन् ।

* * *

आपला स्वार्थ पाहणारा, महाकपटी देवशत्रु [जृंभ] निर्भय होऊन [निर्भय होण्यासाठी] आपले मरण भय टाळण्यासाठी हिमालयकन्या असणाऱ्या पार्वतीच्या गर्भात असणाऱ्या गणेशाचे शिर पूर्णपणे तोडून - धडावेगळे करून - इथे जिच्या उत्तम जलात टाकता झाला.

ज्याची अतर्क्य- लीला आहे अशा परमेश्वराच्या [गणेशाच्या]-स्वतःच्या मस्तकापासून, स्रवलेल्या रक्ताचा स्पर्श होऊन नंतर शंकर- कन्या असणाऱ्या नर्मदेच्या स्वच्छ पाण्यात रक्तवर्णाचे अनेक पाषाणखंड खरोखर निर्माण झाले.

सर्व पापाची धुणी करणारे, श्रेष्ठ, पूज्य, विघ्न- विनाश करण्यात पटु असणारे ते [पाषाणखण्ड] देखील वर देणारे गणेश- मूर्तिरूप झाले.

टीप :- पार्वतीच्या उदरात वाढणाऱ्या गर्भापासून आपला विनाश आहे असे कळताच जृंभ दैत्याने त्या गर्भाचे शिर वेगळे करून व त्याचे तुकडे करून नर्मदेच्या पाण्यात फेकून

दिले. त्यापासूनच नार्मद गणेशाची आकृति म्हणून मान्यता पावलेले शिलाखंड निर्माण झाले. हा पौराणिक इतिहास-संदर्भ इथे आधाराला आहे.

* * *

स्वहितपरायण महामायावी, देवताओंका शत्रु जृम्भासुर दैत्य, अपने मरण भय के कारण हिमालय कन्या पार्वती के गर्भस्थ गणेश का शिर तोडने - धड से पृथक कर नर्मदा के उत्तम जलमें डालने उद्युक्त हुआ। जिनका महिमा अतर्क्य है, ऐसे ईश्वर [गणेश] के मस्तक से स्रवित रुधिर-स्पर्श का परिणाम यह हुआ कि नर्मदा मे अनेक पाषाणखंड रक्तवर्णकि हो गये। सर्व मलिनता को दूर करनेवाले पूज्य शिलाखण्ड भी पापनाशक और विघ्नोंका ध्वंस करनेमें तत्पर तथा साक्षात् गणेश मूर्तिरूप हो गये।

* * *

પોતાનુ હિત કરનાર મહા માયાવી (સિન્દૂરાસુર) દૈત્યે જેના સ્વચ્છ પાણીમાં પાર્વતીના ગર્ભમાં રહેલ ગણપતિનુ મસ્તક કાપીને પૂરેપૂરુ ફેંકયૂ અને પોતે ભયરહિત થયો. પરંતુ ઈશ્વરનો મહિમ અકળ છે. કારણ કે ત્યાર પછી તે મસ્તકમાંથી નીકળેલા રુધિરના સ્પર્શને લીધે શિવપુત્રી (નર્મદા) ના આ અમળ જલમા તો છેક સમુદ્ર સુધી જેવી કાંતીવાળી અનન્ત શિઓળા બરેબર ળની તમામ મળ (પાપ) ને ધોઈ નાયનાર તે પથ્થરો પણ વિઘ્ન દૂર કરવામા પ્રવિણ શ્રેષ્ઠ પૂજય અને વરદ ગણેશ (બાણો) થયા.

यदीये पानीये भृशममृतसंस्पर्धिनि जनि -
क्षयान्ते चोङ्कारेश्वरवरपुरात् पूर्वत उत ।
महोत्तुङ्गस्थानात्पतित उपलास्ते पशुपते -
र्भवन्त्याहो बाणाभिध परमलिङ्गानि बहुशः ॥ २० ॥

* * *

अन्वय : -यदीये अमृतस्पर्धिनि जनिक्षयान्ते पानीये --------ओङ्कारेश्वर वरपुरात् पूर्वतः उत महोत्तुङ्गस्थानात् [ये] पतित-उपलाः ते बहुशः पशुपतेः बाणाभिधपरमलिङ्गानि भवन्ति।

* * *

अमृताशी अत्यंत स्पर्धा करणाऱ्या आई नर्मदे, जन्ममृत्यूचा फेरा नाहीसा करणाऱ्या [तुझ्या] पाण्यात [प्रवाहात] जे पाषाणखण्ड ओंकारेश्वराच्या पूर्वेला उंच स्थानाहून येऊन पडतात त्या, श्रीशंकराच्या नाना आकाराच्या पिंडी, बाण म्हणून प्रसिद्ध आहेत. काय हे आश्चर्य !!

* * *

जिसके अमृतस्पर्शी और जननमरण विनाशकारी जलमें, ओंकारेश्वरके पूर्व भागसे, उत्तुंग स्थानसे नर्मदाजीके प्रवाहमें गिरनेवाले पाषाण खंड, विविध आकारोंके शिवलिंगोंमें परिवर्तित हो जाते है। शिव बाण करके प्रसिद्ध हो जाते है।

* * *

અમૃત સાથે અત્યંત સ્પર્ધા કરનાર જન્મ અને મરણનો નાશ કરનાર અને ઓંકારેશ્વર નગરથી પૂર્વમાં ખૂબ ઉચા સ્થાનેથી પડતા જેના જળમાં જે પથ્થરો છે અહો ! બાણનામથી ઓળખાતા તે શિવના શ્રેષ્ઠ લિંગો મોટા પ્રમાણમાં બને છે.

महान्तस्ते बाणा अपि परमसूक्ष्माः कतिपयाः
शुभाः कर्पूराभाः शशधरकलाढ्याः कतिपयाः ।
परे केचिच्चित्रा अपि च निखिलास्तेऽत्र भजनात्
गजारेः सायुज्यं ददत इति रेवाम्बुमहिमा ॥ २१ ॥

* * *

अन्वय :- ते बाणा अपि महान्तः, कतिपयाः परमसूक्ष्माः, शुभाः कर्पूराभाः, कतिपयाः शशधरकलाढ्याः, परे केचिद् अपि चित्राः । अत्र ते निखिलाः भजनात् गजारेः सायुज्यं ददते इति रेवाम्बुमहिमा ।

* * *

ते बाण देखील मोठे तर काही अगदी लहान, शुभकारक, कर्पूराप्रमाणे धवल असणारे तर काही चंद्रकोरीने युक्त असतात. दुसरे काही चित्रविचित्र देखील असतात.

या जगात त्यांची उपासना केली असता, गजासुराचा शत्रु असणाऱ्या शंकराची ते सायुज्य प्राप्ति करून देतात. हा नर्मदा नदीच्या प्रवाहाचा महिमा आहे.

* * *

नर्मदा के प्रवाहमें स्थित यह बाण, कुछ बहुत छोटे, शुभकारक, कर्पूरकांति वाले और कुछ चंद्रकलाओं से युक्त है। कुछ चित्रविचित्र भी है। जिनकी भक्तिभावसे उपासना भक्तोंको, गजासुरके शत्रु शिवजीकी, सायुज्य प्राप्ती करा देते है। नर्मदाजी के जलका यह महिमा है।

* * *

તે બાણો મોટા છેતા કેટલાક ઘણા નાના હોય છે. અને કેટલાક કપૂર જેવા સફેદ અને અન્દ્રકળથી યુકત હોય છે વળી બીજા કટલાક રંગબેરંગી પણ હોય છે. તે બધાય આ જગતમા તેમની સેવા કરવાથી શંકર ભગવાન સાથે સાયૂજય આપે છે આવો છે રેવાના જળનો મહિમા.

एवं प्रभावे जय देवि रेवे
प्रसीद तेऽम्बु सदैव सेवे ।
श्रीनर्मदे देवि नमो नमस्ते
श्रीशर्मदे सोमसुते नमस्ते ॥ २२ ॥

* * *

अन्वय :- एवं प्रभावे देवि रेवे जय। मे प्रसीद। [अहं] ते अम्बु सदा एव सेवे। देवि श्रीनर्मदे ते नमो नमः। श्रीशर्मदे सोमसुते ते नमः।

* * *

अशा तऱ्हेचे सामर्थ्य असणाऱ्या देवी नर्मदे, तुझा जय असो. माझ्यावर प्रसन्न हो. [मी] तुझे पाणी नेहमीच सेवन करतो. देवी श्रीनर्मदे, तुला पुनः पुनः नमस्कार असो. लक्ष्मी व कल्याण प्रदान करणाऱ्या शिवकन्ये तुला नमस्कार असो !!

* * *

ऐसे सामर्थ्यशाली देवी रेवे! मै तुम्हारा जल सदैव सेवन करता हूँ। मुझ पर प्रसन्न हो। देवी नर्मदे तुम्हे पुनः पुनः नमस्कार है। ऐश्वर्य और कल्याणदायिनी हे शिवसुते तुम्हे नित्य नमस्कार।

* * *

આવા પ્રભાવવાળી હે રેવા દેવી । તારો જયથાવ તુ મારા પર પ્રસન્ન થા. તારા જળનુ હુ હમેશા સેવન કરુ છુ હે શ્રી નર્મદા દેવી ૧ તને નમન તને નમન શ્રી અને સુખ આપનારી હે સામ્બ સદાશિઽવની પુત્રી ૧ તને નમસ્કાર

अवतु विगतरोषास्मान् महासिन्धुयोषा
परिहृतनतदोषा या नमोमात्रतोषा ।
जयतु भजकपोषा सा स्रवन्ती विशेषा
निरुपमतमभूषा मालिनी दिव्य-वेषा ॥ २३ ॥

* * *

अन्वय :- या नमोमात्रतोषा परिहृतनतदोषा सा महासिन्धु-योषा विगतरोषा [सती] अस्मान् अवतु । भजकपोषा निरुपमतमभूषा मालिनी दिव्यवेषा सा विशेषा स्रवन्ती जयतु ।

* * *

जी केवळ "नमस्कार असो" असे म्हटल्याने संतोष पावते, प्रणतजनांच्या दोषांचा जिने परिहार केला आहे अशी ती पश्चिमसागराची- महासागराची- पत्नी असणारी नर्मदा राग टाकून देऊन आमचे रक्षण करो.

भक्तजनांचे पोषण करणारी, अत्यंत अमूल्य भूषणे धारण करणारी, पुष्पमाला धारण करणारी, द्रिव्य वेष धारण करणारी ती आगळी नदी [नर्मदा] जय पावो.

* * *

केवल नमस्कार मात्रसे संतुष्ट होनेवाली, शरणागतों के दोषोंका परिहार करने तत्पर, पश्चिम सागर की पत्नी नर्मदा, अवकृपा छोडकर हमारा रक्षण करे। भक्तोंकी पोषण कर्ती, निरुपमेय अलंकार माला तथा दिव्य-वेष धारणकर्ती नर्मदा विजयी हो।

* * *

શેષ વગરની અને મહાસમુદ્રની પત્ની નર્મદા અમારુ રક્ષણ કરો જે નમસ્કાર કરનારના દોષને હરનારી છે. જે નમસ્કાર માત્રથી તુષ્ટ થાય છે. તે સેવન કરનારને સંતોષ આપનારી , અતિશય નિરુપમ ભૂષણોવાલી દિવ્યવેષવાળી માલ્ય ધારણ કરનારી વિશિષ્ટ નદી (નર્મદા) જય પામો.

सन्मानसस्वच्छसुदिव्यनीरा
नीरागयोग्याश्रितरम्यतीरा ।
धीरार्चिता नित्यमखण्डपूरा
सा रातु रेवेष्टमनन्तसारा ॥ २४ ॥

* * *

अन्वय :- सन्मानसस्वच्छसुदिव्यनीरा, नीरागयोग्याश्रितरम्यतीरा, धीरार्चिता, नित्यम् अखण्ड-पूरा अनन्तसारा सा रेवा इष्टं रातु।

* * *

सज्जनांच्या मनाप्रमाणे जिचे जल स्वच्छ असून अत्यंत दिव्य आहे, जिच्या रम्य तीराचा आश्रय वैराग्यसंपन्न योगीजनांनी घेतला आहे, बुद्धिमंत [धीर] लोकांनी जिची पूजा केली आहे- सन्मान केला आहे - जिला नित्य व अखण्ड- पूर- जलौघ असतो, जिचे सामर्थ्य अपार आहे अशी ती नर्मदा [आम्हाला] इष्टप्राप्ति करून देवो !!

* * *

सज्जनोंके मानसतीर्थ समान स्वच्छ तथा दिव्य जल युक्त वैराग्य संपन्न योगीयोंने जिनके तीर का आश्रय लिया है, बुद्धिमानोंद्वारा पूज्य, अखण्ड प्रवाहधारी, अपार सामर्थ्यवान नर्मदा हमे इष्टता प्रदान करे।

* * *

સજ્જનોના મન (અથવા સુંદર માનસ સરોવર) જેવા સ્વચ્છ અને સુદિવ્ય જળવાળી વીતરાગ યોગી ઓથી રમ્ય તીરો ઉપર આશ્રય કરાયેલી (જેના તટ પર રાગરહિત યોગી ઓથી આશ્રય કર્યો છે એવી) ધીર પુરુષોવડે પુજાતી કાયમ અખંડપૂરવાથી અનન્ત શ્રેષ્ઠ વસ્તુવાળી તે રેવા અમને ઈચ્છીત (વસ્તુ) આપો.

स्वभक्तवरदे सुरद्विषदभेद्य-सद्वर्मदे
सुदुर्गतिदकर्मदे हृतगदेऽपि सद्धर्मदे ।
अये नदि न दीनतां व्रजसि कर्हिचिच्छर्मदे
प्रसीद जनकामदे जय नमोऽस्तु ते नर्मदे ॥ २५ ॥

* * *

अन्वय :-अये, स्वभक्त-वरदे, सुरद्विषदभेद्यसद्वर्मदे, सुदुर्गतिदकर्मदे, हृतगदे अपि सद्धर्मदे, नदि, कर्हिचिद् दीनतां न व्रजसि ।शर्मदे, प्रसीद। जनकामदे जय। नर्मदे ते नमः अस्तु।

* * *

हे आपल्या भक्तांना वर देणाऱ्या राक्षसाकडून ज्याला क्षति पोचू शकत नाही असे [देवद्वेष्ट्यांना] अभेद्य असणारे सुंदर कवच देणाऱ्या, अत्यंत वाईट गतीला नेणाऱ्या कर्मांचे खंडन करणाऱ्या, रोग निवारण करणाऱ्या, त्याचप्रमाणे सद्धर्म प्रदान करणाऱ्या, नर्मदे नदी, तू कुठेहि दैन्य धारण करीत नाहीस. [अखण्डपूरा असे नर्मदा माईचे एक विशेषण याच स्तोत्रात आले आहे. नर्मदेच्या दैन्य- विरहित सदा- समृद्ध स्थितीचा त्यावरून कयास करता येतो.]

कल्याण करणाऱ्या नर्मदे प्रसन्न हो. लोकांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या नर्मदे तुझा विजय असो. नर्मदे तुला नमस्कार असो!!

* * *

स्वभक्तोंको वरप्रद, राक्षसोंद्वारा अविनाशी ऐसा अभेद्य कवच देनेवाली, दुर्गति- दायक कर्मोंका खंडन करनेवाली, रोग निवारक, धर्मवृद्धिकारक नर्मदा सर्वत्र दैन्यविरहित है। (अपने जलौघसे सर्वत्र व्याप्त है)

लोगोंकी कामना पूर्तिकारक हे नर्मदे प्रसन्न हो! तुम्हारी जय हो! तुम्हे नमस्कार है।

* * *

પોતાના ભકતને વરદાન આપનારી દેવોને વ્દેષ કરનારા (અસુરો) થી ન ભેદાય એવુ મજબુત કવચ આપનારી ખરાબ દુર્ગતિને છેદે એવા કર્મ આપનારી (કરાવનારી) રોગનો નાશ કરનારી અને ઉત્તમ ધર્મ આપનારી હે નદી ! તુ કપારેચ દીનતા પામથી નથી (તારુ જળ કપારેય સુકાતુ નથી) લોકોની કામનાની પૂર્તી કરનારી ! અમારા પર પ્રસન્ન થા. હે નર્મદા તને નમસ્કાર હજો. તારો જય થાવ.

यन्मूलेऽस्त्यमरेश्वरो विजयते श्रीसिद्धनाथस्तथा
कावेरीपरिवेष्टितो गतिद ओङ्कारोऽपरे चामिताः ।
मध्येऽन्येऽपि च शूलपाणिसहिताः पाश्चात्यभागे स्थिताः
सर्वे ते भजतामभीष्टफलदा वर्वति सा नर्मदा ॥ २६ ॥

* * *

अन्वयः- यन्मूले अमरेश्वरः अस्ति। श्रीसिद्धनाथः विजयते। तथा कावेरी परिवेष्टितः गतिदः ओङ्कारः अस्ति। मध्ये अपरे च अमिताः [भवन्ति] । शूलपाणिसहिताः अन्ये अपि च पाश्र्चात्यभागे स्थिताः। सर्वे ते भजताम् अभीष्टफलदाः।

सा नर्मदा वर्वति ।

* * *

जिच्या उगमस्थळी अमरनाथ आहे. श्रीसिद्धनाथाचा (नाभिस्थळी) विजय आहे. त्याचप्रमाणे कावेरीने वेढलेला उत्तम गती देणारा ओंकारेश्वर आहे. दुसरेही आणखी अनेक देव [शिवमूर्ति] मध्यभागी आहेत. पश्चिमभागी शूलपाणी प्रभृति दुसरे शिव- स्वरूप देव आहेत. ते सारे भक्तांचे वांछित फल पूर्ण करणारे आहेत.

अशी ही [ती] नर्मदा सर्वश्रेष्ठ आहे.

* * *

नर्मदाजी के उद्‌गम स्थान में अमरेश्वर तथा श्री सिद्धनाथ कावेरीसे वेष्टित उत्तम गती दायक ओंकारेश्वर है - और भी अनेक तीर्थस्थान है। मध्यस्थान में शूलपाणिसहित अनेक देवता है। वें भक्तोंको कल्याणकारी और वांछित फल प्रदान करनेवाली है। ऐसी नर्मदा वरप्रद है, श्रेष्ठ है।

* * *

જેના મૂળ (અમરકંટક) માં અમરેશ્વર (મહાદેવ) છે (વચ્ચે નાભિસ્થાનમાં) શ્રી સિધ્દનાથ મહાદેવ છે. કાવેરીથી વીટળાએલી મોક્ષ આપનાર ઓંકારેશ્વર મહાદેવ છે. વળી વચ્ચે બીજા અસંખ્ય મહાદેવો છે પશ્ચિમ દિશાના ભાગમા શુલપાણી (સુરપાણેશ્વર મહાદેવ) સંહિત બીજા પણ મહાદેવો રહેલા છે. તે બધા મહાદેવો ભકતોને ઇચ્છિત ફળ આપનારા છે. આવી તે નર્મદા (મુમુક્ષુઓવડે) વારંવાર પસંદ કરાય છે.

हर परमरये समस्तमघं मम
कुरु गुरुकरुणां समस्तमते मयि ।
खलबलदमने समस्तमनोमलम्
हर दरमरमप्यमर्त्यमतेऽमले ॥ २७ ॥

* * *

अन्वयः- परमरये मम समस्तम् अघं हर। समस्तमते मयि गुरुकरुणां कुरु। खलबलदमने अमर्त्य-मते, अमले, समस्त-मनोमलं हर । अरम् अपि दरं [हर] ।

* * *

अत्यंत वेग असणाऱ्या नर्मदे, माझे सारे पाप दूर सार. सर्वांना मान्य असणाऱ्या नर्मदे, माझ्यावर अत्यंत करुणा कर. दुष्टांचे सामर्थ्य नष्ट करणाऱ्या, दिव्य- ज्ञान असणाऱ्या, स्वच्छ असणाऱ्या नर्मदे सर्वांच्या मनातील पाप दूर सार. [त्याचप्रमाणे त्यांच्या मनातील] अत्यंत भय देखील दूर सार.

* * *

अत्यन्त द्रुतगति धारक नर्मदा, मेरे सब पापोंको दूर करे, मुझपर आत्यंतिक दया करे। दुष्टोंका सामर्थ्य नष्ट करनेवाली, अमर्त्यमति, श्रेष्ठ ज्ञान वाली विशुद्ध स्वरुपिणी देवी नर्मदे, सबका मनोमालिन्य तथा भय दूर करें।

* * *

હે ખૂબ વેગવાળી ! મારા સમસ્ત (વધા) પાપોને દૂર કર. હે સંપૂર્ણ મતિવાળી મારા ઉપર મોટી કૃપા કર. હે દુષ્ટોના બળનો નાશ કરનારી મારા મનના તમામ મળને દુર કર. હે અમર્ત્ય (દૈવી) બુધ્દીવાળી હે નિર્મળ (નર્મદા) મારા ખુબ (મોટા) (મૃત્યુના) ભયને પણ દૂર કર.

यस्य स्मृत्या च सद्यः कलिमलविलयो जायते भावुकानां
यत्स्मृत्या स्मर्तृगामी भवभयहृदुपेत्यात्मदो भावुकानाम् ।
दत्तात्रेयस्य तस्य प्रशमितमनसः सद् वरीवर्ति मातुः
स्थानं यस्यास्तटे सा विजयत उशती नर्मदा शर्मदा नः ॥ २८ ॥

* * *

अन्वय :- यस्य स्मृत्या भावुकानां कलिमलविलयः सद्यः जायते, यत्स्मृत्या स्मर्तृगामी भवभयहृत् भावुकानाम् उपेत्य आत्मदः [भवति] तस्य प्रशमितमनसः दत्तात्रेयस्य मातुः सत् स्थानं यस्याः तटे [वर्तते] सा नः उशती शर्मदा नर्मदा विजयते ।

* * *

ज्यांच्या स्मरणाने श्रद्धाशील जनांच्या पापवासनांचा तत्काळ नाश होतो, ज्यांचे स्मरण केले असता स्मर्तृगामी होऊन व संसार भय नाहीसे करून श्रद्धाळू हृदयात जे स्वतः प्रत्यक्ष प्रगट होतात, त्या मनाला शान्ति प्रदान करणाऱ्या, श्रीदत्तात्रेयांच्या, मातेचे [अनसूयेचे] सुंदर स्थान जिच्या तीरावर आहे अशी ती आमची सुन्दर व कल्याण करणारी नर्मदा विजयशालिनी आहे. [असो.]

* * *

जिनके स्मरण मात्रसे भक्तोंकी पापवासना का तत्काल विनाश होता है, जिनके स्मरण मात्रसे स्मर्तृगामी होकर संसारभय नष्ट कर भक्तोंके हृदयमें प्रविष्ट होनेवाले, उनको मनःशांति देनेवाले भगवान दत्तात्रेय की माता का स्थान जिसके तटपर है ऐसी हमारी कल्याणकारी तथा सुंदर नर्मदा विजयशालिनी हो!

* * *

અને જેના સ્મરણથી ભકતોના કલિમળનો તરત જ વિલય (નાશ) થાય છે. અને જેના સ્મરણથી આત્મદાન કરનાર સ્મરણ કરતામાં ઉપસ્થિત થનાર(દત્ત ભગવાન) હાજર થઈને ભવના ભયને હરે છે. મનને શાન્ત કરનાર તે દત્તાત્રેયની માતા(અનસૂયા)નું સુન્દર સ્થાન જેના તટે આવેલુ છે અમને સુખ આપનારી તે સુન્દર નર્મદા વિજય પામે છે.

कुष्ठाद्यार्तोऽप्यरोगो भवति
सदनसूयाश्रमे यत्तटे यन् -
-मध्ये शुक्लादितीर्थान्यपि झटिति
पुनन्त्युद्धरत्याशु या च ।
प्रेतश्राद्धेन नारायणबलित इतं
दुर्गतिं मुक्तिदां तां
रेवामस्तौदखेदां परमसुहितदां
नर्मदां वासुदेवः ॥ १ ॥

* * *

अन्वय :- यत्तटे सदनसूयाश्रमे कुष्ठाद्यार्तः अपि अरोगः भवति, यन्मध्ये शुक्लादितीर्थानि अपि झटिति पुनन्ति, या च आशु उद्धरति, दुर्गतिम् इतं प्रेतश्राद्धेन नारायण-बलित मुक्तिदां ताम् अखेदां, परम-सुहितदां रेवां नर्मदां वासुदेवः अस्तौत्।

* * *

जिच्या तीरावर साध्वी अनसूयेच्या [पवित्र] आश्रमात कुष्ठादिरोगांनी ग्रस्त झालेला पुरुष देखील रोगमुक्त होतो, जिच्या पात्रातील शुक्लादि अनेक तीर्थे तत्काल पवित्र करतात, आणि जी [सर्वांचा] उद्धार करते, दुर्गतीला प्राप्त झालेल्या पुरुषाला प्रेतश्राद्धविधीने वा नारायण बलिविधानाने जी मुक्ति देते, त्या खेदरहित असणाऱ्या, अत्यंत श्रेष्ठ-कल्याण प्रदान करणाऱ्या रेवा नर्मदेला वासुदेवाने [या स्तोत्रात] स्तविले आहे.

* * *

नर्मदा के तटपर साध्वी अनसूया के पावन आश्रम में कुष्ठादि रोगग्रस्त कुरूप भी रोगमुक्त होता है। उसके पात्र में स्थित शुक्लादि तीर्थ तत्काल पवित्र करते है। वह सबको पापमुक्त कर उनका उद्धार करती है। प्रेतश्राद्ध तथा नारायणबली आदि कर्मोद्वारा मुक्ती प्रदान करती है। ऐसे खेदरहित रेवा का, नर्मदाजी का वासुदेवने स्तोत्रद्वारा स्तवन किया है।

* * *

જેના તટે (આવેલા) સુન્દર અનસૂયાશ્રમમાં કોઢ વગરેથી પીડાતો (રોગી) નીરોગી બને છે જેની વચમા શુકલ (તીર્થ) વગેરે તીર્થો પણ ઝટ દઈને પવિત્ર કરે છે, અને જે દુર્ગતિને પામેલાનો પ્રેતશ્રાધ્દ વ્દારા નારાયણબલિથી એકદમ ઉધ્દાર કરે છે. સુહિત આપનારી ખેદ વગરની ઉત્તમ હિત કરનારી મજાક કરાવનારી તે રેવાની (શ્રી વાસુદેવાનન્દ સરસ્વતી સ્વામી મહારાજ) (આ પ્રમાણે) સ્તુતિ કરી.

भवान्तके ऽभयं देहि तापं मे हर नर्मदे

भवात्मके नयं देहि पापं मे हर नर्मदे ॥ २ ॥

*** * ***

अन्वय :-भवान्तके नर्मदे मे अभयं देहि । तापं हर । भवात्मके नर्मदे मे नयं देहि। पापं हर।

* * *

संसाराचा विनाश करणाऱ्या नर्मदे मला अभय दे. [माझे] दुःख हरण कर. शिवस्वरूप असणाऱ्या नर्मदे मला नीती दे. [माझे] पाप दूर कर.

* * *

संसारमय विनाशक नर्मदे, मुझे अभय दे, शिवस्वरुपिणी नर्मदे मुझे नीति दे, मेरा पाप दूर कर।

* * *

હે ભવનો નાશ કરનારી મને અભય આપ હે નર્મદે મારા સંતાપને હર હે ભવ (શિવ) સ્વરૂપિણી, મને નય (સદ્ગુણ) આપ. હે નર્મદા મારા પાપને હર.

जय जय शिवकन्ये नर्मदे शर्मदे त्वम्
जय जय जनमान्ये धर्मदे ऽ धर्मदे त्वम् ।
जय जय सुवदान्ये धर्मदे कर्मदे त्वं
जय जय भुवि धन्ये भर्मदे वर्मदे त्वम् ॥ ३ ॥

* * *

अन्वय :- शर्मदे शिवकन्ये नर्मदे त्वं जय जय ।
जनमान्ये धर्मदे अधर्मदे त्वं जय जय ।
सुवदान्ये धर्मदे कर्मदे त्वं जय जय ।
धन्ये भर्मदे वर्मदे त्वं भुवि जय जय ।

* * *

कल्याणप्रदान करणाऱ्या शिवकन्ये नर्मदे, तुझा शतशः जयजयकार.

सर्व जगाला वंद्य असणाऱ्या, धर्म प्रदान करणाऱ्या व अधर्माचे खंडन करणाऱ्या [नर्मदे] तुझा शतशः जयजयकार असो.

अत्यंत दानशूर असणाऱ्या, धर्मप्रदान करणाऱ्या व शुभकर्म प्रदान करणाऱ्या [नर्मदे] तुझा शतशः जयजयकार !!

धन्य असणाऱ्या, पोषण करणाऱ्या व संरक्षक कवच देणाऱ्या नर्मदे तुझा शतशः जयजयकार !!

* * *

जय जय शिवकन्ये ------

कल्याणकारी शिवकन्ये नर्मदे तुम्हारी जय हो।

जय जय सुवदान्ये --------

सर्वजगत् मान्य वंद्य धर्म देनेवाली और अधर्मका खंडन करनेवाली नर्मदा तुम्हारी जय हो।

अत्यन्त दानशूर, धर्म प्रदान करनेवाली, शुभकर्म प्रदान करनेवाली नर्मदे, तुम्हारी शतशः जयजयकार !

* * *

શિવકન્યા, સુખ આપનારી હે નર્મદે તારો જય થાવ, જય થાવ જનોથી માન આપવા યોગ્ય ધર્મઆપનારી અને અધર્મનું ખંડન કરનારી (હે નર્મદે ૧) તારો જય થાવ, જય થાવ. અત્યંત ઉદાર ધર્મ આપનાર અને કર્મોનો નાશ કરનાર (હે નર્મદે) તારો જય થાપ જય થાપ. ભુલોકમાં ધન્ય પોષણો આપનારી બખ્તર આપી રક્ષણ કરનારી હે નર્મદા તારો જય થાવ, જય થાવ.

- श्री नर्मदा-लहरी -

चिन्तनिका

प.प. श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामी महाराज यांच्या लेखणीतून श्रीकृष्णा-लहरी व श्रीनर्मदा-लहरी अशी दोन लहरी काव्ये अवतरली आहेत. श्रीमहाराजांनी संन्यासग्रहण केल्यानंतर भारतवर्षाचा बराचसा भाग पायातळी घातला. त्यात नर्मदा नदी व तिचा आसमंत यांचाही समावेश होताच. स्वाभाविकच त्या निमित्ताने श्रीस्वामिमहाराजांच्या प्रतिभेला श्रीनर्मदेचे गुणविशेष आठवून कवितेचा आकार घ्यावासा वाटला तर त्यात नवल नाही. किंबहुना, 'संचारिणी दीपशिखे' प्रमाणे त्या त्या स्थानी जाऊन तेथील आध्यात्मिक व सांस्कृतिक भाव प्रकाशित करण्यासाठी व देवतास्तुतीच्या किंवा नदीस्तुतीच्या रूपाने तो अक्षररूप करण्यासाठीच त्यांची प्रतिभा होती असे दिसते. श्रीस्वामीकडून झालेली ग्रंथरचना देखिल त्याच संचारिणी दीपशिखेच्या प्रकाशाची कडा म्हणता येईल.

नर्मदा माईचा ऋणानुबंध व दोन स्तोत्रांची निर्मिति

श्रीकृष्णामाईचे श्रीस्वामींच्या जीवनात आगळे-वेगळे स्थान होते, हे तर उघडच होते. तिच्याच स्तन्यावर त्यांचे विभूतिमत्त्व परिपुष्ट झाले होते. पूर्वाश्रमापासूनच श्रीनरसिंह-वाडीचा व कृष्णामाईचा त्यांना लळा होता. संन्यास-जीवनातही तो ओसरला नाही हे त्यांच्या चरित्रावरून स्पष्टच दिसते. तेवढे जरी न म्हणता आले तरी तसेच स्थान नर्मदा माईचे देखिल होते. तेवढे जरी म्हटले तरी फारसे चुकेल असे वाटत नाही. कारण, श्रीस्वामिमहाराजांनी 'समाधीच्या' निमित्ताने चिरनिवासासाठी स्थान निवडले ते नर्मदाकाठचे गुजराथमधील गरुडेश्वर. जन्म महाराष्ट्रातील कोकणात माणगावी (निर्मला नदीच्या काठी) तर समाधि गुजराथेत नर्मदा काठी गरुडेश्वर येथे. अवतार-जीवनाच्या या भौगोलिक मर्यादा पाहिल्या की नर्मदेचे स्वामिजीवनातील आगळे स्थान आणखी स्पष्ट करण्याची आवश्यकता राहत नाही. श्रीस्वामिमहाराजांचे कांही चातुर्मास - बढवाणी, चिखलदा व

गरुडेश्वर हे नर्मदाकाठीच झाले आहेत. गरुडेश्वरला चिर-निवासासाठी येण्यापूर्वी देखिल नर्मदेच्या परिसरात श्रीस्वामी अनेक दिवस राहिले आहेत. कृष्णामाईप्रमाणेच नर्मदामाईच्याही वात्सल्याची त्यांना विशेष ओढ होती. अशाच त्यांच्या निवासात नर्मदाकाठच्या "नेमावर" स्थळी नर्मदा लहरी व नर्मदा स्तोत्र अशा दोन रचना श्रीस्वामीकडून घडल्या आहेत. त्यातील नर्मदास्तोत्र केवळ ९ श्लोकांचे (नऊ) असले तरी ते मन्त्रगर्भ आहे हे विशेष. अनुष्टुप् वृत्ताच्या या पहिल्या चरणातील श्लोकात -

पहिल्या व तिसऱ्या चरणातील पहिले अक्षर

"वासुदेवानंदकृत रेवास्तुति"

पहिल्या व तिसऱ्या चरणातील चौथे अक्षर

"नर्मदायै नमः प्रातनर्मदायै नमो निशि,"

दुसऱ्या व चौथ्या चरणातील पहिले अक्षर

"अनसूयात्रिसंभूत दत्तात्रेय दिगम्बर;"

तर

दुसऱ्या व चौथ्या चरणातील चौथे अक्षर

"नमोऽस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि मां विषसर्पतः"

या वाक्यरचनेचा गुंफ साधून देत असते हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

अगोदर मन्त्रगर्भस्तुति की अगोदर नर्मदा-लहरी झाली हे समजण्यास आज काही साधन नाही. पण, लहान स्तोत्र अगोदर असा अगदीच प्राथमिक व स्थूल विचार केला तर मनात येते की एकदा मन्त्रगर्भ नर्मदा-स्तुति झाल्यावर पुनः नर्मदेचे कवन श्रीस्वामींना करावेसे वाटत आहे व ते देखिल लहरी-माध्यमाने हे लक्षणीय आहे. लहरी काव्य हे वेगळ्या तऱ्हेचे गीतिकाव्य होय हे सर्वच मानतात. पण ते नेमकेपण कोणते हे मात्र ठरविणे सोपे नाही. सौन्दर्य-लहरी-गङ्गालहरी व कृष्णालहरी या लहरीकाव्यावरून शिखरिणीवृत्त हे लहरीकाव्याचे विभाजक लक्षण मानण्याकडे कल होतो. पण आचार्य शंकराचार्यांच्या शिवानन्द लहरीत तर शिखरिणीबरोबर इतरहि वृत्तांचा प्रचुर अवलंब आढळतो. परंतु तिथे पराकाष्ठेची भक्त-भगवंताची सलगी आपली प्रत्ययकारिता जाणवून देते. त्यासाठी "मी-तू" चीच "प्रत्यक्ष" भाषा आचार्यांनी निवडली आहे. सौन्दर्य लहरी, गङ्गा-लहरी व कृष्णालहरीमध्ये देखिल तीच रीत दिसते. लहरी काव्यातील अनुबंध म्हणून या तीनहि लहरीत आई-आई म्हणूनच या सर्वांना आळवावेसे वाटत आहे. संख्येचा निकष लावला तर या आळवणीत जगन्नाथ पंडितच (गंगा लहरीत) पुढे जातील असे वाटते. बावन्न श्लोकाच्या या गंगालहरीत थोडेच श्लोक असे निघतील जिथे जगन्नाथ पंडित आई म्हणून हाक मारायला विसरले

आहेत. इतका आईच्या नावाचा 'लाहो' पंडितराजांनी घेतला. आईच्या नावाचे तेवढे नमन सौन्दर्य- लहरीत अथवा कृष्णालहरीत आढळत नसले तरी ते ऐकू मात्र सर्वत्र येते. कारण मोजक्याच ठिकाणी का होईना ती हाक अत्यंत आर्तरवाने किंवा स्निग्धभावाने दिली आहे.

न शम्भोस्तन्मूलं जननि तव ताटङ्कमहिमा । **सौन्दर्य - २८**

भजन्ते वर्णास्ते तव जननि नामावयवताम् । **सौन्दर्य - ३१**

तमीडे संवर्तं जननि महतीं तां च समयाम् " ३९

------ जननि भगिनीवामरसरित् ॥ श्रीकृष्णालहरी- ११

अवापेति ज्ञात्वा जननि पतितस्तेऽद्य पुरतः ।" १५

समस्ताघौघास्ते जननि मयि तिष्ठन्ति सुचिरम् ।" ३२

या त्या आळवणीच्या ओळी आहेत.

या तिघांचाहि शिशुभाव अगदी निर्विवाद आहे.

सौन्दर्यलहरीतील -

दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव यत् सौन्दर्य - ७५

किंवा गंगालहरीतील

शिशुः संप्राप्तस्त्वामहमिह विदध्याः समुचितम् गङ्गा. २४

वा कृष्णालहरीतील

समर्थापि त्वं शिशुवचनवन्मे शृणु मुदा - श्रीकृष्णा. ४

या ओळी पुरेशा बोलक्या आहेत. नर्मदा- लहरीमध्ये ही कोणतीच सामग्री आढळत नाही. एवढेच काय, शिवानन्द लहरी, सौन्दर्य लहरी, गङ्गालहरी किंवा कृष्णालहरी यांत लहरी शब्द जसा क्वचित् का होईना, आपली उपस्थिती लावून जातो तसाही प्रकार इथे आढळत नाही.

वसन्ती मच्चेतो हृदि भुवि शिवानन्द- लहरी

शिवानन्दलहरी २

तनोतु क्षेमं नस्तव वदन- सौन्दर्यलहरी -

सौन्दर्यलहरी - ४४

ययोर्नान्तर्यातस्तव लहरि- लीला कलकलः

गङ्गालहरी ३२

मुदे तस्यापीयं प्रभवति न किं साधुलहरी -

कृष्णालहरी - ५

असे असूनहि श्री स्वामी महाराज प्रस्तुत काव्याला लहरी असेच संबोधत आहेत.

कोणत्या तरी एखाद्या प्रभावी निमित्ताने वा विचाराने असल्या गीतिप्रधान लहरी काव्याची निर्मिति होत असते असे साऱ्या लहरी काव्याकडे पाहिल्यानंतर जाणवते. गङ्गालहरीच्या निर्मितीची पार्श्वभूमि सर्वांनाच माहीत आहे. एक पथभ्रष्ट जीवन जाणीव होताच पश्चात्तापाने पोळून गङ्गेच्या कुशीत विसावू इच्छिते, ही गंगालहरीची जन्मकथा सर्वांना माहीत आहे. शिवानन्दलहरी व सौन्दर्यलहरी यांना तशी पार्श्वभूमि असण्याचे कारणच नव्हते. परंतु चित्तवृत्तीची अनन्यता अशा भौतिक घटनेवाचून येत नाही असे थोडेच आहे? अत्यंत परिणत झालेली चित्तवृत्ति सुद्धा अशीच निमित्तावाचून उत्कट प्रेमाने धाव घेत असल्याचे दृश्य सौन्दर्यलहरी सारख्या काव्यात आपल्याला प्रत्ययाला येते. निमित्ताला एखादी घटना अशा काव्यस्फुरणापूर्वी घडत असेल ते वेगळे. कृष्णालहरीच्या किंवा नर्मदालहरीच्या बाबतीत असेच निमित्त घडल्याचे श्रीस्वामींच्या चरित्रावरून दिसून येते. कृष्णा किंवा नर्मदा यांनीच प्रकट होऊन आपल्या कवनाची स्वामींना गळ घातली. हे निमित्त चित्तवृत्तीला लहरून टाकण्याला पुरेसे होते. त्यामुळेच श्रीस्वामींनी लहरी या नावाची निवड केली असावी. कृष्णालहरीप्रमाणे नर्मदालहरीत मी-तू-पणाची संवाद-रीत आढळत नाही. पण दोहीकडे शिखरिणी वृत्ताचा समानच उपयोग आहे हे तर स्पष्टच आहे.

लहरी काव्य निर्मितीचे कारण

नर्मदामाईचे साक्षात् दर्शन व तिने स्वतःचे कवन करण्याचा श्रीस्वामींना केलेला प्रेमाचा आग्रह या गोष्टीबरोबरच आणखी दोन विचारांनी श्री स्वामींचे मन या नर्मदालहरीत प्रभावित झालेले आहे. लहरी नावाचे अन्वर्थकत्व त्या दोन प्रभावी विचारात सुद्धा दडले असेल. एकतर श्रीस्वामींचे नर्मदामाईशी खास नाते होते. ते उशीरा लक्षात आल्यानंतर मनाची जी काही तगमग व्हावी तशी स्वामींची झाली असेल. नर्मदेच्या काठावर सती अनसूयेचा आश्रम आहे. इथेच अत्रिपत्नी अनसूयेने तपश्चर्या केली. प्रसाद मिळाला तो अपूर्व. श्रीस्वामींच्या शब्दात -

तटे यस्यास्तप्त्वा तप उपरिगैर्दुश्चरमरं
वरं ह्यत्रेः पत्नी परममनसूया गतभया ।
स्वपुत्रत्वेनैव त्रिभुवनसमाराध्यमभवं
समापास्मद्दैवं क इह सरितं तां तु न नमेत् ।

नर्मदा - ३

त्रिभुवनाला वन्द्य असणारे श्रीदत्त, बालरूप घेऊन अनसूयेला वात्सल्याचा प्रसाद देते झाले. वस्तुतः पुत्र हा आई-वडीलांच्या - दोघांच्याहि हृदयाची "संयुक्त गांठ" म्हटला

जातो. इथे मात्र अनसूयेचाच श्रीस्वामीमहाराज विशेष उल्लेख करीत आहेत. अनसूयेचा वात्सल्य-पाठ प्रत्यक्ष पाहणारी नर्मदा. ती आता वात्सल्य रसाची चिरसाक्षिणी नर्मदा आपल्याकडून कवनाची अपेक्षा करीत आहे, ही जाणीव वेगळीच जाण आणणारी होती यात शंका नाही. **कदाचित् ती हाक अनसूयेनेच दिली असेल!!** नर्मदा तटावरील अनसूयेच्या आश्रमाची आठवण नर्मदालहरीच्या समाधीच्या वेळी सुद्धा श्रीस्वामींना आली आहे.

दत्तात्रेयस्य तस्य प्रशमितमनसः सद् वरीवर्ति मातुः

स्थानं यस्यास्तटे सा विजयत उशती नर्मदा शर्मदा नः।

नर्मदा - २७

आरंभाचे ते शब्द -

"अनसूयेला जिच्या तटावर तप करून आमचे अधिदैवत असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांची पुत्र म्हणून प्राप्ति झाली -

आणि आता पुनः तीच घटना आठवून श्रीस्वामींनी नर्मदेचा केलेला जयजयकार बराच काही अधिक आशय सांगून जातो. इथे जयजयकारातील "आमची नर्मदा" - हे शब्द उगाच आले नाहीत. इथे 'नः' - आमची हा शब्द शर्मदा शब्दाशी जोडायचा नाही हे जाणत्यांना वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. तो नर्मदेशी जोडायचा आहे. ती नर्मदा सुद्धा "उशती" आहे. कृष्णालहरीत हा शब्द येतो. तिथे उशती शब्दाचा 'कमनीया" असा अर्थ श्रीस्वामींनी दिला आहे. नर्मदा माईचे जर कोणते पारमार्थिक सौन्दर्य श्रीस्वामींना जाणवले असेल तर ते हे की तिनेच अनसूयेला दिव्य-मातृत्व मिळवून दिले. "ती आमची सुन्दर व कल्याणकारिणी नर्मदा विजय पावो" असा जयजयकार करीत असता श्रीस्वामींच्या मनाला अनसूयेचे मातृत्व आठवावेसे वाटते. **त्यावरून नर्मदेच्या मातृत्वाचीच ही पर्यायोक्ति होती असे म्हणण्याला आता हरकत असू नये.**

लहरी हे नामकरण करीत असता दुसराहि एक विचार श्रीस्वामींच्या मनात प्रबळ असावा. श्रीस्वामीमहाराज पंचायतन पूजेचे समर्थक होते. अनेक आराध्यातील हा एकभाव कृष्णामाईने हरिहराद्वैताच्या रूपाने प्रतिपादिला आहे, हे श्रीस्वामींनी अनेक ठिकाणी नोंदून ठेवले. कृष्णालहरीतील -

हरीशात्मा कृष्णा [५], प्रकृत्यैक्याद् भेदो न हरिहरयोः प्रत्ययवशात् - [२०] इत्यादि स्थळी तर हा विचार येतोच पण इतरत्र देखिल

या हरानन्तमूर्तिः = [श्रीकृष्णापंचक स्तोत्र - १]

कृष्णा विष्णुतनुः साक्षात् - ॥ ६ ॥

महेश्वरस्वरूपा या कृष्णया सङ्गता नदी

सा वेणी सकलाघघ्नी --- ॥ ७ ॥

कृष्णापंचगंगास्तोत्र [६, ७]

हरिहरदूता यत्र प्रेतान्नेतुं निजं निजं लोकम्

कलहायन्तेऽन्योन्यं सा नो हरतूभयात्मिका शोकम् ।

श्रीकृष्णाष्टक - ७

यदात्मनोः प्रत्ययभेदभिन्नमेकप्रकृत्योः प्रथितं स्वरूपम् ।

हरिर्हरौ दर्शयितुं ह्यभिन्नं गतौ द्विनद्यैक्यमियं तु कृष्णा ।

नरसिंहवाटिका वर्णन - ७

इत्यादि ठिकाणी तोच आशय श्री स्वामीमहाराज आळवून आळवून सांगत आहेत. ही पुनरुक्ति किंवा अभ्यासोक्ति काय दर्शविते? श्रीस्वामींच्या जीवनाचे सुद्धा तेच परम उद्दिष्ट होते हा त्याचा अर्थ. त्या पूर्तीसाठी ते नर्मदेकडे बघत असावेत. वेणी शिवस्वरूप व कृष्णा विष्णुस्वरूप या दोहोंच्या संगमाने हरिहराद्वैत साधले आहे हे जसे त्यांना वारंवार सांगावेसे वाटते **त्याचप्रमाणे कृष्णा विष्णुस्वरूप व नर्मदा शिवस्वरूप या दोहोंना देखिल लहरी-काव्याचे आलंबन करून तोच आशय त्यांना प्रतिपादन करायचा असेल.** श्रीस्वामींनी कावेरीची सुद्धा स्तुति केली आहे. काही प्रमाणात शिखरिणी वृत्ताचा उपयोग आहे. त्याचप्रमाणे, वारिलहरी (कावेरीस्तुति- १), व्यधात् सा कावेरी सरिदवतु नः पुण्यलहरी [कावेरीस्तुति- २] असा लहरीशब्दाचा सुद्धा उपयोग आहे. तथापि स्तोत्राचे नाव मात्र कावेरी लहरी नसून कावेरीस्तुति असेच आढळते. तसे पाहिले तर कावेरी ही श्री स्वामींच्या दृष्टीने कृष्णा- माईची बहीण आहे. कावेरीप्रमाणे गोदावरी सुद्धा श्रीकृष्णेची बहीणच होय. ते म्हणतात - वासुदेव- महेशात्म- कृष्णा- वेणी- धुनी- स्वसा । स्वसाराद्या जनोद्धर्त्री पुत्री सह्यस्य गौतमी । श्रीगोदावरी स्तोत्र १[स्वसा कृष्णानद्याः --- कावेरीस्तुति २] तथापि कावेरीची स्तुति लहरी नावाने उल्लेखिली गेली नाही. तो मान नर्मदेच्या वाट्याला आलेला दिसतो. याचाच अर्थ कृष्णा- नर्मदेच्या जोडीच्या रूपाने हरि- हराद्वैताचे तत्त्व श्रीस्वामींना प्रकर्षाने मांडायचे असेल. त्याला अनुसरून 'नर्मदालहरी'ला प्रारंभ करण्यापूर्वी श्रीस्वामीमहाराज अनुष्टुप् वृत्तातं नर्मदेचे मंगलाचरण करीत असता म्हणतात -

नर्मदे हरसंभूते हरलिङ्गार्चनादृते।

हरलिङ्गाञ्चिततटे जयाघं नर्मदे हर।

नर्मदा शिवापासून निर्माण झाली आहे, तिच्या विषयीचा आदर शिवपिण्डीपूजनाने व्यक्त होतो व तिचे तीर शिव-पिण्डींनी [सर्वत्र] सुशोभित झाले आहे, असा त्रिरुच्चार इथे करण्यात आला आहे. नर्मदालहरीत देखिल ठिकठिकाणी नर्मदेचे शिवाशी असणारे नाते श्रीस्वामी महाराज आठवून देत आहेत. महेशाङ्गोद्भूता [२] मृत्युंजयदुहिता [११], शर्वाङ्गजनिता [१५], स्मरहरसुता [१८], सोमसुता [२१], भवात्मका [नर्मदालहरीच्या उपसंहाराचे श्लोक क्र. १, शिवकन्या २]

नर्मदातीरावरील ज्या स्थानांचा श्रीस्वामी महाराज उल्लेख करीत आहेत ती स्थाने देखिल - अमरकंटक, सिद्धेश्वरपुर भृगुपुर [लहरी ५, ७ व २५] किंवा ओंकारेश्वर [७, १९, २५] किंवा शूलपाणि [२५] ही सर्व शिवाचीच स्थाने होत. परंतु ही निवडकच स्थाने झाली. वस्तुतः नर्मदा माईच्या दक्षिण व उत्तर तटावर सर्वत्रच शंकराचा नित्य निवास आहे. "देवाधिपतिशिवसेव्योभयतटा " [८] असे या संबंधात श्रीस्वामींचे शब्द आहेत. आणखी एका गूढार्थक शब्दाची निवड करून हाच अर्थ श्रीस्वामींनी सांगितला आहे. तो शब्द म्हणजे अ-हृतभवा होय. [लहरी- ४] सकृद्दर्शनी इथे विरोध जाणवतो. भव शब्दाचा एक अर्थ संसार असा होतो. जी नर्मदा नदी -

नृ-भव-दावार्ति शमनी [१४]

[पुरुषांच्या संसार दावानलाचे दुःख शमविते] ती आता "अ-हृत-भवा" - जिने संसार हरण केला नाही - अशी कशी असू शकेल? परंतु भव शब्दाचा शंकर असा अर्थ घेतला आणि "अहृत" शब्दाचा देखिल जिच्या पासून शंकर दूर गेले नाहीत किंवा जिच्या पासून शंकराला [कोणालाहि] दूर नेता आले नाही असा अर्थ केला म्हणजे हा आपाततः वाटणारा विरोध दूर होतो. अशा काही रचना श्रीस्वामींच्या साहित्यात आहेत. नर्मदालहरीतच "धर्मदे" व "अधर्मदे" असे विरुद्धार्थी संबोधन नर्मदेला उद्देशून वापरण्यात आले आहे. जी धर्म देणारी आहे तीच अधर्म देणारी सुद्धा कशी राहू शकेल? म्हणून धर्मदा म्हणजे धर्म देणारी तर अधर्मदा म्हणजे अधर्माचे खंडन करणारी असा अर्थ घ्यावा लागतो. दो अवखण्डने या धातूपासून "अधर्मं द्यति = अधर्मदा" असे रूप सिद्ध होत असते. अहृतभवा या शब्दाच्या विषयात देखिल अशी अप्रसिद्ध वाट चोखाळून अर्थ-संगति शोधावी लागते.

याप्रमाणे शिव-स्वरूपाशी पूर्णपणे एकरूप होणारी नर्मदा व नाम व रूप या दोन्ही दृष्टीने [कृष्णालहरी ५०] विष्णु-स्वरूपाशी पूर्णपणे ऐक्य पावलेली कृष्णा यांचे हरिहराद्वैत स्पष्ट करण्यासाठीच कृष्णा-लहरीच्या जोडीला नर्मदा-लहरी अवतरली आहे. हरि-हर शब्दात केवळ प्रत्ययभेदाचे अंतर आहे; प्रकृति तर एकच आहे असे श्रीस्वामी

म्हणतात - [कृष्णा- २०]. कृष्णा- नर्मदेमध्ये प्रत्यय भेदाचे प्रतिनिधित्व दोहोंच्या भिन्न दिशा करीत आहेत. कृष्णा व तिच्या गोदा कावेरी या बहिणी पूर्वसागराला मिळतात तर नर्मदा पश्चिम सागराला मिळते व तेहि वाटेतील अनेक पर्वतांना फोडून -

युता सिद्धैर्याता प्रसभमिव पाश्चात्यजलधिम् । [नर्मदा २]

नगान्भित्त्वानेकानपि ------ [नर्मदा ४]

नर्मदेचे आगळेपण व शिवाशी सारूप्य

दुसरेहि एक भासमान अंतर यातूनच प्रगट होते. पश्चिम सागराला मिळण्यासाठी अनेक पर्वतांना विदारण करण्याचा रोष नर्मदेला दाखवावा लागला. कृष्णा माईच्या जीवनात तसा कोणताच प्रसंग आढळत नाही. श्रीमहाराजांनी तरी तो तसा चित्रित केला नाही. नर्मदा लहरीत मात्र श्री स्वामी म्हणतात -

भाति अतिरुषा [नर्मदा. २]

[अति- रोषाने ती शोभून दिसते]

पुढेहि ते म्हणतात -

अवतु विगतरोषा अस्मान् महासिन्धुयोषा [नर्मदा - २२]

[पश्चिम- सागराची पत्नी असणारी नर्मदा राग टाकून देऊन आमचे रक्षण करो.]

नर्मदेच्या रोषाचे शंकराच्या संहार क्रोधाशी अंश साम्य तर निश्चितच दिसते. पण वाटेतील पर्वतांना विदारण करण्यात प्रगट झालेला हा रोष म्हणावा की तोच आविर्भाव करून नर्मदा- लहरी लिहिण्यासाठी श्रीस्वामींना तिने उद्युक्त केले असे म्हणावे हे नीट स्पष्ट होत नाही. ती "महावेगा" आहे [नर्मदा ४] हे तिच्या रोषाचे द्योतक आहे. पण, रोषाने ती सुंदर दिसते, रोष टाकून तिने आम्हाला जवळ करावे असे जेव्हा श्री स्वामी म्हणतात तेव्हा अशाच आविर्भावात प्रगट झालेल्या नर्मदामाईच्या मूर्तीबद्दल ते बोलत असावे हे अधिक स्वाभाविक दिसते. श्रीदत्त सुद्धा असेच एकदा कोपमुद्रेने प्रगट झाले असता

तव कोपा वन्दू भद्रा ।तव चापा वन्दू रुद्रा।

अशी श्रीस्वामींनी आळवणी केल्याचे प्रसिद्ध आहे.

नर्मदेची जीवन-रेखा

लहरी- गीतीचे विशिष्ट माध्यम निवडण्यात कोणती प्रेरणा कारणीभूत झाली असेल याचा कयास आपण येथवर करून पाहिला. नर्मदेची कोणती वैशिष्ट्ये इथे टिपली आहेत हेहि लक्षात घेतले तर नर्मदेचे एक समग्र चित्र त्याने अनायासेच साकार होईल. तशी तिची काही वैशिष्ट्ये तर अगदी डोळ्यात भरण्या जोगी आहेत. नर्मदेसारखा सरळ रेषेत

प्रवास क्वचितच एखाद दुसऱ्या नदीच्या- तापीसारख्या- वाट्याला येत असेल. तिला आडवळण अथवा वाकडे वळण माहीत नाही. इतकी एकतानता फारच दुर्लभ म्हटली पाहिजे. तिचा हा प्रवास एकाकीच म्हटला पाहिजे. गंगा- गोदा- सिंधु- कृष्णासारख्या नद्या ज्याप्रमाणे इतर अनेक मोठ्या नद्यांना आपल्यात सामावून अगदी थाटात प्रवास करतात तेवढा नर्मदा नदीचा परिवार नाही. नदी व तीहि नर्मदेसारखी म्हटली की तिला भेटणाऱ्या नद्याच राहणार नाहीत हे कसे शक्य आहे? इतर नद्यांच्या तुलनेचा विचार केला तर मात्र ती असंग आहे. या अर्थाने ती एकाकिनी योगिनीच दिसते.

अमरकंटकाजवळ नर्मदेचा उद्‌गम आहे. [नर्मदा २५] शोणनदीचा उद्‌गम तिथून दूर नाही. पण त्याने पूर्व- सागराची वाट धरली. हिने मात्र पश्चिम- सागराची. ही महासिन्धुयोषा [२२] असून कुणाचे काही एक चालू न देता [प्रसभमिव- २] ती आपल्या पतिगृहाकडे अतिशय वेगाने निघाली आहे. [२ व ४]. लौकिक दृष्टीने पश्चिम सागर [पाश्चात्य जलधि- २] हे तिचे मनोनीत गन्तव्यस्थान असले तरी तो "परसिन्धु " आहे. तिथे लीन होण्यासाठीच ती निघाली आहे. [परे सिन्धौ लीना - ५] पर- सिन्धु शब्द अथांग अनुभूतीचा द्योतक आहे. तोच अभ्यास करण्यासाठी तिचा प्रवाह अथांग झाला आहे. श्रीमहाराज इथे "परे" म्हणजे श्रेष्ठ असे म्हणत आहेत. "परस्मिन् " म्हणजे "दुसऱ्या" असे म्हणत नाहीत. "दुसऱ्या" या अर्थाने पर शब्द सर्वनाम होतो तर श्रेष्ठ या अर्थाने तो विशेषण होतो. सर्वनाम म्हणून पर शब्दाचा वापर इथे वृत्तात जुळत नव्हता हे खरे परंतु आगंतुकभावाचा तो निदर्शक असल्याने शृंगारिक भावाकडे तो घेऊन जातो म्हणूनहि तो नको.

नर्मदेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तिचे सुलभ दर्शन. श्रीस्वामी महाराज म्हणतात त्याप्रमाणे ओंकारेश्वर, नेमावर [वौरा] व भृगुमुनीचे क्षेत्र [अडोज] अशी तीन स्थाने वगळली तर ती सर्वत्र सुलभ आहे [७]. नर्मदेची परिक्रमा शक्य होते ती त्यामुळे. शेकडो भाविक शेकडो वर्षापासून नर्मदेची परिक्रमा करण्यासाठी सारखे फिरत असल्याचे दुर्लभ दृश्य आजहि आढळते. नर्मदा परिक्रमेची अविच्छिन्न परंपरा ही नर्मदामाईची लहरती विजयपताका आहे. **नर्मदा परिक्रमा करणाऱ्याचा महत्त्वाचा एकमात्र नियम म्हणजे तिच्या जलाचे प्रत्यही सेवन.** श्रीमहाराजांच्या भाषेत ते पथिक, अमल- जल सेवैक- नियम असतात. [१५]. स्नान- पान- दर्शन हे सारे सेवनाचे प्रकार म्हणावे लागतील.

हे दर्शन कोणाचे असा एक सूक्ष्म प्रश्न इथे निर्माण होतो. भाविकांनी नर्मदेचे घेतलेले दर्शन की; नर्मदा माईची भाविकावर पडलेली दृष्टि !! या दोन्ही पर्यायात परस्पर- विरोध

आहे असे समजण्याचे कारण नाही. तथापि इतर नद्यांशी तुलना करीत असता श्रीस्वामींनी हा प्रश्न विचारात घेतलेला दिसतो. सरस्वतीचे पाणी तीन दिवसात पवित्र करते, यमुनेचे पाणी त्यासाठी सात दिवस घेते तर गङ्गानदी तत्क्षणीच पापमुक्त करते असे सांगून श्रीस्वामी म्हणतात -

महाभावा रेवा कथमपि हि दृष्ट्यैव सहसा [६]

महानुभावा नर्मदा मात्र ओझरते दर्शन झाले तरी एकदम पवित्र करते.

नर्मदा परिक्रमा करणारे स्नान-पानादि प्रकारांनी नर्मदामाईची सेवा करतीलच. परंतु हे भाग्य ज्यांना लाभले नाही त्यांच्यासाठी तिचा दृष्टि-स्पर्श सुद्धा पुरेसा आहे. या श्लोकात येणारा सहसा शब्द कृष्णालहरीत तीन अर्थाने येतो, हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. [कृष्णालहरी ३४]

सहसा शब्दाचे तीन अर्थ

सहसा = अकस्मात्

सहसा = बलेन

स-हसा = हसेन सहिता सहसा प्रेम्णा स्मितमुखी लहरीभाष्य - ३४

हे तिन्ही अर्थ त्याच लेखणीतून प्रस्यन्दित झालेल्या नर्मदा-लहरीत सुद्धा अनायासेच येतील. याचा अर्थ, स्मितमुद्रा प्रगट करून [स-हसा] ही नर्मदा आपले सामर्थ्य प्रगट करून [सहसा-बलेन] काही एक विलंब न लावता आपल्या दृष्टिमात्राने भाविकांना पवित्र करीत असते असा होतो. याच श्लोकातील "महाभावा" हे नर्मदेचे विशेषण "सहसा-बलेन" या अर्थाच्या संबंधात तर फारच अर्थपूर्ण आहे. कारण इथे श्रीस्वामी नर्मदेची गंगेशी तुलना करीत आहेत. गंगा ही **महा-भङ्गा** - महाप्रवाह - शालिनी आहे तर नर्मदा **महा-भावा** सामर्थ्याने थोर आहे. अर्थात ती स्मितदृष्टीतून [स-हसा] आपले सामर्थ्य भाविकावर कृपा करतांना प्रगट करणार हे ओघानेच येणार !

हा सारा संदर्भ लक्षात घेतला तर भाविकावर पडलेली नर्मदेची दृष्टि हाच अर्थ-पर्याय इथे समुचित ठरतो. पण त्यामुळे इतर नद्यांच्या अपेक्षेने हा असा कृपा-लाभ दुर्लभ नाही का ठरणार अशी एक शंका डोकावू लागेल. इतर नद्या भाविकांनी स्नान-पानादि आचरण केले असता कृपा करू लागणार. नर्मदेची कृपा होण्यासाठी मात्र तिची दृष्टि वळणे आवश्यक ही एक प्रकारची जटिलताच नाही कां होणार? अशी शंका येण्याचे कारण नाही. महाभङ्गा गंगा व महाभावा रेवा या "व्यतिरेकी " वर्णनातच वरील शंकेचे उत्तर आहे. गंगा महाभङ्गा असल्याने तिच्या प्रवाहाशी स्नान-पानादिकांनी समरस होण्याची आवश्यकता आहे. नर्मदा

मात्र महाभावा असल्याने ती भाविकांच्या दृष्टीस पडली तरी तेवढ्याने तिच्याहि दृष्टीचा स्पर्श भाविकाला घडून भाविकाचे कल्याण होणार, असे श्रीस्वामींना म्हणायचे आहे. नर्मदा सर्वत्र सुलभ आहे [७] असे श्रीस्वामी नर्मदा-लहरीत म्हणत आहेत. **तिच्या सुलभपणाचा हाहि एक नवा पैलू श्रीस्वामीमहाराज इथे लक्षात आणून देत आहेत.**

तिच्या दृष्टीप्रमाणे तिच्या पाण्याचे सुद्धा आगळे वैशिष्ट्य आहे. तीन चार श्लोकात त्या वैशिष्ट्यांचा एक आलेखच इथे श्रीमहाराज प्रस्तुत करीत आहेत. किंबहुना, बाराव्या श्लोकापासून तर विसाव्या श्लोकापर्यंत आळवणी करून तोच महिमा श्रीमहाराज नर्मदा-लहरीत गात आहेत असे आढळेल. त्यातील पुढील श्लोक विशेषतः उल्लेखनीय वाटतो.

नर्मदेचे भौतिक व अभौतिक स्वरूप

यदीयं पानीयं सदमृतमयं चित्सुखमयं
सुपेयं चायुष्यं मतिदमुत वर्चस्यमभयम् ।
यशस्यं चक्षुष्यं विहित-विजयं स्वर्ग्यमलयं
सुभव्यं सद्गेयं सकल-जगदारोग्य-विजयम् ॥ १३ ॥

पानीयं, गेयं, भव्यं यासारखी कृदन्ते तर आयुष्यं, वर्चस्यं, यशस्यं, चक्षुष्यं, यासारखी तद्धिते यांची गुंफण साधल्याने श्लोकातील अनुप्रासाची मोहकता व लय तर निश्चित वाढलीच आहे पण नर्मदेच्या भौतिक व अभौतिक - रूपांचा जो एक "एकात्म" संगम इथे चित्रित केला आहे ते या श्लोकाचे आगळेपण होय. या श्लोकाचा एक साधा अन्वय तर पूर्वी दिलाच आहे. पण नर्मदामाईच्या भौतिक अभौतिक रूपाचा मागोवा घेताना तो तेवढासा पुरेसा ठरणार नाही. नर्मदेचे पाणी लौकिक पातळीवर तर निश्चितच आगळे आहे कारण ते गोड [सुपेय] आहे. आयुष्य वाढविणारे, नेत्रदृष्टीला गुणकारी असणारे, बुद्धि देणारे, तेज वाढविणारे व कीर्ति देणारे आहे. हे सारे वर्णन लाक्षणिक मानण्याचे कारण नाही. तिच्या पाण्यातील औषध-गुणांचा हा एक प्रत्ययपूत आढावा आहे. नर्मदेचे जल विषहारक आहे हे तर पहिल्याच श्लोकात आले आहे. अलौकिक पातळीवर तेच पाणी स्वर्गलाभ करून देणारे आहे. यादृष्टीने अमृतमय व स्वर्ग्य हे दोन शब्द जवळजवळ ठेवले पाहिजेत. केवळ गोड या अर्थाने अमृत शब्दाचा इथे उपयोग अभिप्रेत नाही. स्वर्गाची आठवण करून देणारे साधन या दृष्टीने नर्मदेचे जल अमृतमय असे श्रीस्वामींना म्हणावयाचे दिसते. त्याचप्रमाणे, चित्सुखमय आणि अ-लय हे शब्द देखिल जोडूनच वाचले पाहिजेत. नर्मदेचे जल अ-लय [अविनाशी] आहे याचे कारण ते चित्सुखमय आहे असा दोहोत

कार्यकारणभाव आहे. **हेच खरे नर्मदामाईचे पारमार्थिक रूप. जो ज्या भूमिकेत असेल तिथे तिथे त्याला वर घेऊन उत्तरोत्तर उत्कर्ष साधून देणे हे नर्मदामाईचे ब्रीद.** लौकिक आकांक्षा धरणाऱ्यांना जसा इथे अवसर आहे तसा अ-लौकिक आकांक्षा बाळगणाऱ्यांना सुद्धा आहे. या अलौकिक आकांक्षा पूर्तीमध्ये सुद्धा तरतमभाव करता येईल. याच श्लोकात स्वर्गाचा उल्लेख आहे. ही अलौकिक आकांक्षेची एक पायरी झाली. नर्मदातीरावर मरण आलेल्यांना शिवदूत कैलासात घेऊन जातात व तेहि अहमहमिकतेने, असे नर्मदालहरीत वर्णन आहे. [लहरी- ९] ही स्वर्गापेक्षा अधिक श्रेष्ठ अवस्था होय. नृमरण- भवान्ता = पुरुषांच्या जन्म- मरण चक्राचा अंत करणारी [११] नृ- भव- दव- दावार्ति- शमनी- पुरुषाच्या संसाररूपी दावानलाचे दुःख शमविणारी [१४] व अभयदा [१४] ही ती विशेषणे, स्वर्गा- सारख्या नश्वर फलांच्याहि पलीकडे असणाऱ्या मोक्ष- फलाचा संकेत करीत आहेत. पुढे नर्मदा लहरीच्या शेवटी मुक्तिदा - मोक्ष देणारी असा स्पष्टच शब्द येतो. [नर्मदा. पुष्पिका- १]. नर्मदेच्या पाण्याला श्रीमहाराज चित्सुखमय कां म्हणतात ते आता अधिक लक्षात येऊ लागते. श्रीकृष्णाष्टकात सुद्धा असाच शब्दप्रयोग श्रीस्वामींनी केला आहे.

"कृष्णावेणी सरिदभयदा सच्चिदानन्द- कन्दा" [श्रीकृष्णाष्टक- १]

[कृष्णावेणी अभय देणारी असून सच्चिदानन्दरूप आहे].

कृष्णामाई असो की नर्मदामाई असो तिच्या दृश्य जलस्वरूपाने अवगुण्ठित असणारे तिचे सच्चिदानन्दमय रूप असते असा त्याचा अर्थ आहे. या रूपाचा ज्यांना साक्षात्कार होतो ते मोक्षाचेच अधिकारी होणार हे वेगळे सांगण्याचे कारण नाही. अभय शब्द सुद्धा असाच गूढार्थक आहे. कृष्णालहरीतील - "तत उपरि यास्येऽभय पदम्" या शब्दावरील [कृष्णालहरी ३३] श्रीस्वामी महाराजांचे भाष्य दृष्टीखालून घालावे म्हणजे अभय- पदाची श्रीस्वामींना अभिप्रेत असणारी व्याप्ति लक्षात येते. तात्पर्य :- **"जो जे वांछील तो ते लाहो" या ब्रीदासाठी नर्मदेचा अवतार आहे, असे श्रीस्वामींना म्हणायचे आहे.**

गाणेश व शैव संप्रदायाशी नाते

नर्मदेच्या जलाचे आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. खास म्हणण्याचे कारण इतर नद्यांना त्या वैशिष्ट्यात मुळीच वाटा सांगता येणार नाही. ते वैशिष्ट्य म्हणजे तिच्या जलात आढळणाऱ्या श्रीगणेशमूर्ति व शिव मूर्ति. यादृष्टीने दोन संप्रदायाच्या वाढीला तिचा निश्चितच हातभार लागला आहे. या गणेशमूर्तीनाच नार्मद गणेश म्हणतात व शिवमूर्तींना बाण हे नाव आहे. नर्मदा- लहरीतील सतरा व अठरा या दोन श्लोकांत नार्मद गणेशाचे तर एकोणीस व वीस या दोन श्लोकात बाणाचे वर्णन आहे. नार्मद गणेशाला काही पौराणिक संदर्भ आहे. पार्वतीच्या उदरवासात असतानाच श्रीगणेशाचे शिर धडापासून वेगळे करून

दैत्याने ते छिन्नविछिन्न करून नर्मदेत फेकले. त्याच या रक्तवर्णाच्या गणेशमूर्ती होत. या अनंत असून [नर्मदा- १८] नर्मदेच्या जलात ती सागराला मिळेपर्यंत [आब्धेः - नर्मदा १८] कुठेहि आढळतात आणि सर्वपापक्षालन करणाऱ्या विघ्न-निवारण करणाऱ्या व वरद गणेशमूर्ति म्हणून त्यांची सर्वत्र प्रसिद्धि आहे. नर्मदेतील बाण सर्वत्र आढळत नाहीत. ओंकारेश्वराच्या साधारण पूर्वेला ते आढळतात. उंच ठिकाणाहून पडलेले हेच खण्ड, बाण म्हणून प्रसिद्ध आहेत. नार्मद मूर्ति पाण्यातच असतात तर बाण वरून पडून नर्मदेच्या पाण्यात आढळतात, अशी दोहोंची दोन भिन्न तऱ्हा आहे. या प्रकाराने नर्मदेचा दोन - गाणेश व शैव - संप्रदायाशी घनिष्ठ संबंध जोडला आहे. भारताच्या प्राचीन सांस्कृतिक परंपरेतील ही निश्चितच लक्षणीय घटना आहे. श्रीमहाराज स्वतः सगुण- मूर्ति- पूजेचे फार मोठे समर्थक होते. संन्यासाश्रमात असून सुद्धा श्रीदत्तमूर्ति घेऊनच ते प्रवास करीत. युवशिक्षेमध्ये त्यांनी आवर्जून [1] श्रीसमर्थ रामदास स्वामींचे उदाहरण देऊन [युव. ८८] सगुणमूर्तिपूजनाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. भक्तीचे आलंबन असणाऱ्या सगुणमूर्तीचे उपलब्धि स्थान म्हणून नर्मदेचे महत्त्व निर्विवाद आहे. बाण- मूर्तीचे सविस्तर वर्णन नर्मदा- लहरीत आढळते. **महान्तस्ते बाणा अपि परमसूक्ष्माः कतिपयाः ॥ शुभ्राः कर्पूराभाः शशधर-कलाढ्याः कतिपयाः ॥ परे केचिच्चित्रा अपि च निखिलास्तेऽत्र भजनात् गजारेः ॥ सायुज्यं ददत इति रेवाम्बु-महिमा ॥ २० ॥**

हा श्लोक इथे उद्धृत केला तो दोन कारणासाठी. नर्मदा- लहरीतील शिखरिणी वृत्तात असणारा हा शेवटचा श्लोक. इथून पुढे वेगवेगळ्या वृत्ताकडे श्रीस्वामी वळले आहेत. वृत्तातच परिवर्तन झाले आहे असे नाही. आतापर्यन्तचा वर्णनाचा ओघ पालटून तो आता प्राधान्याने जय- जय- कारात किंवा प्रार्थना- घोषात परिवर्तित झाला आहे.

एवं प्रभावे जय देवि रेवे --- ॥ २१ ॥

जयतु भजक- पोषा सा स्नवन्ती विशेषा ॥ २२ ॥

सा रातु रेवेष्टमनन्तसारा ॥ २३ ॥

प्रसीद जन- कामदे ॥ २४ ॥

हर परम- रये ॥ २६ ॥

भवान्तकेऽभयं देहि ॥ २ ॥

जय जय शिवकन्ये ॥ ३ ॥

---

१. सगुणेशार्चया रामदासाद्या अधुनातनाः
अत एवाभवञ् शाब्द- पर- ब्रह्म- परायणाः । [युवशिक्षा ८८]

वरील अवतरणावरून ते स्पष्टच दिसते. अशा या सन्धिस्थळी बाणांचे वर्णन आले आहे हे महत्त्वाचे. त्यात श्रीस्वामींनी आवर्जून जर काही सांगून ठेवले असेल तर ते हे.

"हे सारे बाण शंकराची सायुज्य-प्राप्ति करून देतात हा नर्मदाजलाचा महिमा आहे."

सगुणाराधनाचे अंतिम उद्दिष्ट कोणते ते इथे सांगितले आहे आणि हा सारा नर्मदा जलाचा महिमा आहे असे श्रीस्वामी म्हणत आहेत. स्नान-पान, अवगाहन, दर्शन परिक्रमा यासारखे तपाचरण या सर्व माध्यमातून तर ती निज-भजक-लोकांना [५] जवळ करीतच असते परंतु त्यापुढेहि जाऊन आपल्या जलातून सगुण-मूर्तीचा प्रसाद देऊन त्यांच्या उपासनेने सुद्धा आपल्या लोकांना सायुज्य-मुक्ती-पर्यन्त ती घेऊन जाते.

"तटे यत्र क्वापि स्वकमिह पुनात्या जलनिधेः" [८] असे जे श्रीस्वामी महाराज म्हणत आहेत त्याचा हा देखिल गर्भितार्थ असू शकतो.

अशा या नर्मदेचे एक सुन्दर देवता-चित्र रेखाटण्याचाहि प्रयत्न नर्मदालहरीत झाला आहे. कृष्णालहरीत अगदी पहिल्याच श्लोकात तिच्या चतुर्भुज-श्यामल स्वरूपाचे श्रीमहाराज वर्णन करतात. तसे इथे आढळत नसले तरी दुसरा व बावीसावा श्लोक एकत्र करून नर्मदेची आकृति रेखाटता येईल.

नर्मदा माईची सगुण मूर्ति

तिच्या वर्णाचा स्पष्ट उल्लेख नसला तरी ती महेशाच्या अंगापासूनच झाली असल्याने [२] कर्पूरधवला आहे असे मानता येईल. रुचिर-वपुषा भाति [२] या शब्दावरून तिच्या सौंदर्याचे आकलन करता येते. नेटका वेष व सुंदर अलंकार यांची तिला हौस दिसते. सुभूषा व सद्वेषा असे तिचे श्रीस्वामी वर्णन करीत आहेत [२] पुढेहि, निरुपमतमभूषा मालिनी दिव्य-वेषा [२२] अशी नर्मदेची विशेषणे आहेत. निरुपमतमभूषा या शब्दाकडे जरा निरखून पाहिले तर असे दिसते की निरुपम शब्दच मुळात अत्युत्तमत्व दर्शवितो. त्याला पुनः तम-प्रत्यय जोडण्याची तशी आवश्यकता असू नये. पण ती आवश्यकता असते. केव्हा? जेव्हा अनुभवाला येणारा आशय उपलब्ध शब्दांनी गवसत नाही असे वाटते तेव्हा. वेदात देखिल "यज्ञो वै श्रेष्ठ-तमं कर्म" असा प्रयोग आढळतो. अशी ही सहेतुक पुनरुक्ति. नर्मदा-माईने अशाच चर्येत श्रीस्वामींना दर्शन दिले असावे या घटनेची पावती होय. भूषा शब्दाचा भूषणच अर्थ घेतला पाहिजे असे नाही. प्रसाधनाचा अर्थात दिव्य-प्रसाधनाचा त्यात समावेश करता येईल. दिव्य-अंगराग इथे अभिप्रेत दिसतो. "सन्मानस-स्वच्छ-सुदिव्य-नीरा" [२३] असे तिचे स्वरूप आहे. या दिव्य-स्वरूपाला दिव्य-अंगरागाची शोभा

लाभली तर स्वाभाविकच नाही काय? सज्जनांचे मानस किंवा शुद्ध मानस म्हणजे काय हे ज्यांना प्रत्यक्ष बघायचे असेल त्यांच्या साठीच नर्मदा नदीची ही जलमूर्ति आहे. स्वाभाविकच तिच्या तीरावर नीराग [विरक्त] योगिजनांना देखिल विसावा घ्यावासा वाटतो. नीराग योग्याश्रित-रम्य-तीरा-[२३]. तिला प्रत्यक्ष भेटणारा नर्मदेचा भगिनी-परिवार मोठा नसला तरी भक्त-परिवार मात्र फार मोठा आहे. या परिवारात जसे विरक्त योगी आहेत, किंवा सिद्ध आहेत [२] तसे परिक्रमा करणारे पांथिक देखिल आहेत [२५]. एवढा परिवार सांभाळणारी नर्मदा. रोष तिच्या गावी नसावा. पण आहे, हे खरे आहे. नर्मदा लहरीत दोन ठिकाणी हा उल्लेख येतो हे मागे आलेच आहे. कदाचित् "महा-सिन्धु-योषा" - महासागराची पत्नी [२२] असल्याने - राणी म्हणून तिला रोष सोडून राहता येत नसेल. हा रोष तिच्या सौन्दर्यात भर घालतो हे मात्र महत्त्वाचे [२]. श्रीस्वामी म्हणतात,

अये नदि न दीनतां व्रजसि कर्हिचिच्छर्मदे [२४]

[हे कल्याणप्रद नर्मदे तू कुठेहि दैन्य-मुद्रा दाखवीत नाहीस.]

या रोष-चर्येमुळेच तिला हे साधत असेल. एका बाजूने सर्वासाठी सदा मुक्तद्वार राहून दुसऱ्या बाजूने रोष देखिल जोपासून नर्मदेला आपले राणीपद सांभाळायचे असेल. हा रोष तिच्या उत्साहशक्तीचा एक भागच म्हटला पाहिजे. "क्रोधोऽपि निर्मलधियां रमणीय एव" असे म्हणतात - [शुद्धान्तःकरण असणाऱ्यांचा राग सुन्दर असतो.] स्वभक्तांना वरद असणाऱ्या व त्यांना अभेद्यकवच [कृपाकवच] देणाऱ्या नर्मदेचा [२४] हा रोष आहे हेहि यासंबंधात आम्हाला लक्षात ठेवायचे आहे. परमरय [२६] असला म्हणजे काही प्रमाणात रोष आवश्यक राहत असेल.

कारण कोणतेहि असो रोष व कृपा या दोहोंना जवळ करून मृत्युंजयाचा वारसा पुढे चालविणारी ही मृत्युंजय कन्या आहे आणि तिचा हा नित्यावतार भाविकांचे मोठे आशास्थान आहे, यात शंका नाही.

नर्मदामाईची स-गुण-मूर्ति

नर्मदा-लहरीत श्रीस्वामींनी नर्मदामाईच्या गुणांची मालिकाच दिली आहे. तिच्यावरून सुद्धा नर्मदामाईचा संक्षिप्त परिचय होऊ शकेल. यातील काही विशेषणे बाह्य परिचय करून देतात तर काही तिचा अंतरंग-परिचय करून देतात.

गिरिशदुहिता (१), महेशाङ्गोद्भूता (२), शिवकन्या (पुष्पिका), मृत्युंजयदुहिता (११), स्मरहरसुता-हर-संभूता (१८), सर्वाङ्गजनिता (१५), मेकलसुता (१), अचलजा (७),

वरील सारी विशेषणे नर्मदा शिवाच्या अंगापासून जन्माला आली असून ती शिवाची कन्या आहे असे सांगत आहेत. अर्थात पौराणिक संदर्भावर ही विशेषणे आधारलेली आहेत. लौकिकदृष्ट्या ती मेकल [अमरकंटक] पर्वतापासून उगम पावलेली दिसते. म्हणूनच ती शिवकन्या असून मेकल-कन्या सुद्धा आहे.

हावेगा	परमरया	अखण्डपूरा	सन्मानसस्वच्छसुदिव्यनीरा
४	२६	२३	२३
[जिला अतिशय वेग आहे.]		[जिला अखंड पूर असतो]	[सज्जनांच्या मताप्रमाणे जिचे पाणी स्वच्छ व दिव्य आहे.]

या विशेषणांवरून नर्मदा नदीचे बाह्यरूप आपल्याला कळते. एवढेच नव्हे तर आपल्या पापौघांना समर्थपणे पूर्णपणे मिटवून टाकण्याचे तिचे उदण्ड सामर्थ्य आहे हे लक्षात येते. नर्मदेचा अखण्ड जलप्रवाह, सज्जनांच्या शुद्ध मनाला उपमान म्हणून मिरविण्याची तिच्या पाण्याची स्वच्छता व पाण्याचा महावेग यांचा तोच एकमात्र अर्थ आहे.

सुभूषा	निरुपमतमभूषा	दिव्य-वेषा,	सद्वेषा
२	२२	२२	२
सुन्दरभूषणे धारण करणारी	अत्यंत अनुपम अलंकार लेणारी	दिव्यवेष असलेली	सुन्दर वेष असलेली

महासिन्धुयोषा	वृता भीमेन
२२	२
महासागराची पत्नी	भीमसेनाने वरलेली

ही सारी विशेषणे नर्मदेच्या राज-वैभवाची द्योतक आहेत. नर्मदा राजवैभवाची अधिकारिणी आहे, ते दोन अर्थाने. पश्चिम सागरासारख्या महासागराची ती पत्नी आहे हे तर खरेच परंतु ऐतिहासिक कालखंडात भीमसेनाशी सुद्धा तिचा विवाह झाला आहे. दिव्य वेष व दिव्य आभूषणे ती लेते ते त्या दृष्टीने. परंतु एवढाच दिव्यवेषाचा संबंध असावा असे मात्र नाही. भक्तांना सगुणरूपात दर्शन देताना किंवा त्यांच्या ध्यानाचा विषय होताना हेच रूप नर्मदामाई धारण करीत असावी.

देवाधिपतिशिवसेव्योमयतटा	नीरागयोग्याश्रितरम्यतीरा
८	२३
देवाधिदेव शंकर जिच्या दोन्ही तीरावर वास करतात.	विरक्त योगी लोक जिच्या सुंदर तीराचा आश्रय घेतात.

मनीषीड्या	देवेडितगुणगणा
१४	१६
संयमी लोकांच्या स्तुतीला पात्र.	देवांनी जिच्या गुणगणाची स्तुति केली आहे.

ही विशेषणे देव किंवा महापुरुष यांच्या जगात नर्मदामाईचे केवढे महनीय स्थान आहे याबद्दल माहिती देतात. मनीषी शब्दाची व्याप्ति फार मोठी आहे. मनीषी म्हणजे मनावर नियंत्रण ठेवणारा. ईशोपनिषदात हा शब्द येतो. तिथे श्रीशंकराचार्यांनी सर्वज्ञ ईश्वर असा अर्थ दिला आहे. [ईश. ८] तात्पर्य, पोचलेल्या पुरुषांना सुद्धा नर्मदेची स्तुति करावीसी, वाटते व तिच्या तीरावर निवास करावासा वाटतो. तिच्या तीरावर शिव-मंदिरांची दाटी झाली हा त्याचाच परिणाम. त्यामुळे हरलिङ्गार्चनादृता, हरलिङ्गाञ्चिततटा ही दोन्ही विशेषणे वरील विशेषणांच्या रांगेत किंवा जवळ ठेवायला हरकत नाही.

या पुढील जी गुणमालिका आहे ती भक्तांच्या वाट्याला येणाऱ्या नर्मदामाईच्या अनुग्रहाचे द्विविध स्वरूप स्पष्ट करते. द्विविध म्हणजे नकारात्मक व सकारात्मक. पुढील विशेषणे नकारात्मक स्वरूपाची म्हणता येतील.

सकलमलभङ्गा (४), हतमलिन-दोषा (७), हतभजकदोषा (२), परिहृतनत-दोषा (२२), हतगदा (२४), खल-बल-दलना (२६), अखिल-विषहा (१), दुरितानां तापानां प्रशमनी (११), नृभवदवदावार्तिशमनी (१४), नृ-मरण-भवान्ता (११)

ही आणि यासारखी विशेषणे साधकाची पारमार्थिक सिद्धता करून देण्यासाठी नर्मदामाई दोषांचा निचरा कसा करून देते याविषयी वर्णन करणारी आहेत. यातील अखिल-विषहा व खल-बल-दलना या विशेषणाकडे अधिक लक्ष द्यावेसे वाटते. सर्व तऱ्हेचे विष ती दूर सारते असे म्हणत असता विष शब्दाचा केवळ लाक्षणिक अर्थच इथे अभिप्रेत असेल असे नाही. लौकिक-विषावर सुद्धा नर्मदेच्या पाण्याचा "उतार" होत असेल. खल-बल-दलना या विशेषणाचा सुद्धा तसाच विचार व्हायला हवा. खल-बल-दलना म्हणजे दुष्टांच्या सामर्थ्याचा निःपात करणारी. श्रीदत्तगुरूंनी ज्याप्रमाणे चोरांचा निःपात करून आपल्या भक्तांचे रक्षण केले त्याप्रमाणे नर्मदामाई सुद्धा तशाच प्रसंगी धावून येत असते असे श्रीमहाराजांना इथे म्हणायचे आहे. तिच्या रोषाचा नर्मदालहरीत गौरवोल्लेख आहे हे मागे आलेच आहे. असल्या प्रसंगाला धरूनच तो उल्लेख असू शकतो. आर्तभक्ताचे स्पष्टीकरण करीत असता आचार्य म्हणतात -

आर्तः आर्तिपरिगृहीतः तस्कर-व्याघ्र-रोगादिना अभिभूत आपन्नः

गीता शां.भा. ७.१६

आर्त म्हणजे दुःखाने ग्रासलेल्या, चोर- वाघ- रोग इत्यादि भयाने गांजलेला -

ज्याच्या जवळ सर्वंकष सामर्थ्य असते तो प्रेमाप्रमाणे रोषाचा सुद्धा, भक्ताच्या कामासाठी उपयोग करू शकतो.

या विशेषण मालिकेत "नृ- मरण- भवान्ता" हे विशेषण सुद्धा असेच अधिक बारकाईने न्याहाळण्याची गरज आहे. नर्मदामाई मनुष्याच्या मरणाचा व संसाराचा अन्त करते असे ते म्हणतात. मरणाचा अन्त म्हणजे संसाराचा अंत नव्हे काय? ज्या अर्थी दोन शब्द वापरले आहेत त्या अर्थी त्यात काही अंतर असलेच पाहिजे. कठोपनिषद् भाष्यात आचार्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की प्रस्तुत उपनिषदातील ब्रह्मविद्येला "उपनिषद्" म्हणून संबोधणे योग्य म्हणता येईल कारण ती उप+नि +षद् या धातु व उपसर्ग यांच्या मिळून झालेल्या अर्थाला धरून संसाराचा नाश करते; पण इथेच आलेल्या अग्नि- विद्येच्या संबंधात मात्र तसे विधान करता येणार नाही. कारण ती केवळ स्वर्ग मिळवून देते. आचार्य म्हणतात उप- नि +षद् या घटकांचा नाश करणे हा जसा एक अर्थ आहे तसाच ढिले करणे - शिथिलता आणणे हा सुद्धा दुसरा अर्थ आहे. या दुसऱ्या अर्थाने अग्निविद्येला उपनिषद् असे म्हणता येईल. कारण ती संसाराचा नाश करू शकत नसली तरी जन्म- मृत्यूच्या फेऱ्याला काही काळ थोपवून तर धरते ना? [भावार्थ - कठभाष्य - १.१.१] इथेहि तसाच विचार केला पाहिजे. नर्मदा माई मरणाचा अन्त करते याचा अर्थ स्वर्ग प्राप्ति करून देऊन काही काळ संसारचक्र थांबविते. परंतु तीच योग्य अधिकाऱ्याला मोक्ष सुद्धा मिळवून देते. त्यावेळी ती संसाराचा समूळ उच्छेद करते. याच दृष्टीने श्रीमहाराजांनी नर्मदालहरीत श्लोक १३ मध्ये स्वर्ग्य व चित्सुखमय अशी दोन विशेषणे नर्मदेच्या पाण्याला उद्देशून वापरली आहेत. तात्पर्य, अधिकारभेदानुसार नर्मदामाई मरणाचा व संसाराचा अंत घडवून आणते.

पुढील विशेषणे सकारात्मक म्हणता येतील.

समुद्धर्त्री (५), भर्त्री (५), अभयदा (१२), गतिदा (१२), अभीष्टवरदा (१६), नमोमात्रतोषा (२२), मर्त्यतरणिः (१५), स्वभक्तवरदा (२४), जतकामदा (२४), सुदुर्गतिदकर्मदा (२४), धीरार्चिता (२३), मनीषीड्या (१४), देवेडितगुणगणा (१६), नीरागयोग्याश्रितरम्यतीरा (२३), सन्मानसस्वच्छसुदिव्यनीरा (२३) अखण्डपूरा (२३), महावेगा (४), देवाधिपतिशिवसेव्योभयतटा (८), हरलिङ्गाञ्चिततटा, हरलिङ्गार्चनादृता महाभावा (६), वरभावा (४), वरभगा (४), समस्तमता (२६), जनमान्या, सुवदान्या, धन्या, शर्मदा, धर्मदा, कर्मदा, भर्मदा, वर्मदा.

नर्मदा माईची गुण-माला

हरसंभूता (१), महेशाङ्गोद्भूत (२), गिरिश-दुहिता (१), मेकल-सुता (१), अचलजा (७), शर्वाङ्गजनिता (१५), स्मरहरसुता (१८), मृत्युंजयदुहिता (११), वृता भीमेनैषा (२), शिवकन्या महासिन्धुयोषा (२२), सुभूषा (२), सद्वेषा (२), भाति अतिरुषा (२), निरुपमतमभूषा (२२), दिव्यवेषा (२२), महाभावा (६), वरभावा (४), नृ-मरण -भवान्ता (११), अहृतभवा (४), महावेगा (४), सकलमलभङ्गा (४), वरभगा (४), अभङ्गा (४), हृतमलिनदोषा (७), देवाधिपतिशिवसेव्योथयतटा (८), हरलिङ्गार्चनादृता, हरलिङ्गञ्चिततटा, निजभजकलोकस्य गतिदा, (५), सुमतिदा (५), सध्दर्मदा (२४), अखिलविषहा (१), हृतभजकदोषा (२), वरवृषा (११), अभयदा (१२), गतिदा (१२), नृभवदवदावार्तिशमनी (१४), अनन्तसारा (२३), मनीषीडया (१४), देवेडितगुणगणा (१६), मर्त्यतरणिः (१५), अभीष्टवरदा (१६), परिहृतनतदोषा (२२), नमोमात्रतोषा (२२), सन्मानसस्वच्छसुदिव्यतीरा (२३), नीरागयोग्याश्रितरम्यतीरा (२३), धीरार्चिता (२३), जनमान्या, सुवदान्या, धन्या, शर्मदा, धर्मदा, कर्मदा, भर्मदा, वर्मदा, अख ण्डपूरा (२३), हतगदा (२४), सुदुर्गतिदकर्मदा (२४), स्वभक्तवरदा (२४), जनकामदा (२४), खलबलदलना (२६), समस्तमता (२६)

□ □ □

मंत्रगर्भरचनेचे नवे प्रवक्ते श्रीस्वामी

- स्तोत्र-रचना -

प.प. श्रीवासुदेवानन्द-स्वामि-महाराजांनी आद्य शंकराचार्यांच्या पावलावर पाऊल ठेवून सर्वत्र भारतभर परिभ्रमण करून धर्मजागृति केली. धर्मजागृतीचाच एक भाग म्हणून त्या त्या ठिकाणच्या देवता व नद्या यांची स्तोत्रेहि त्यांनी रचली. त्यातहि एक वैशिष्ट्य असे की गंगा-कृष्णा-कावेरी-नर्मदा प्रभृति मोठ-मोठ्या नद्यांच्या स्तोत्राबरोबरच लहान-लहान-पयोष्णी-पिनाकिनी यासारख्या-नद्यांची स्तोत्रे देखिल त्यांनी रचली. या स्तोत्र रचनेत श्रीस्वामींचे आणखी एक आगळेपण दिसते. ते म्हणजे स्तोत्रांची मन्त्र-गर्भता. मन्त्र-गर्भ रचना हाच मुळी श्रीस्वामींचा लेखनविशेष असल्याने तो त्यांच्या ग्रंथ-रचनेत व स्तोत्ररचनेत सहजपणे प्रगट झाला आहे, असे सुद्धा म्हणता येईल. रचना लहान असो की मोठी असो त्यात आपल्या संस्कृतीत पूर्वापार मान्यता पावलेले जे लहान मोठे मंत्र असतील त्यांना गुंफून रचना सादर करणे हा त्यांचा आवडीचा सहज छन्द होता. या संबंधीची एक नोंद श्री स्वामींच्या पत्रव्यवहारात आढळते. ते त्यावेळी शृंगेरी पीठा-धिपति श्री शंकराचार्यांच्या दर्शनाला गेले होते. त्यासंबंधात श्री स्वामी म्हणतात -

श्रीजगद्गुरुंनी उत्तम प्रेम ठेवले व तुम्ही केलेले ग्रंथ बरोबर असतील तर द्या म्हणून मागितले. नाही म्हणताच तोंडी येणारे स्तोत्र द्या असे म्हटल्यावर मंत्रगर्भित स्तोत्र लिहून दिले. आनंदित झाले. प्राकृत माहात्म्य असू द्या पण संस्कृत पाहिजे असे दोन चार वेळा ते बोलले. तरी दत्तपुराण लिहून देणे तरी ते मोठे आहे. गतवर्षीची केलेली दत्तचंपूची टीका पाठवावी ----- त्यांचे करिता ----- कृष्णालहरी पाठवावी.

नेलोर मार्ग. शु. १ शके १८२९

६ |१२ |१९०७

हे मंत्र-गर्भ स्तोत्र कोणते हे समजायला आता मार्ग नाही. परंतु मंत्र-गर्भ रचना हा त्यांचा आवडीचा विशेष होता हे तर स्पष्ट आहे.

वेद-वाङ्मय हे आपले महत्त्वाचे मंत्र-वाङ्मय. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी ब्राह्मणांना मंत्र-विद्येचे माहेर म्हणून जे संबोधिले ते या वेदराशीला अनुलक्षूनच. त्यानंतर क्रम येतो पुराणांचा. त्या पुराण-इतिहास-ग्रंथात महाभारताचा व त्यातील श्रीमद्भगवद्गीतेचा क्रमांक येतो. प्रस्थान-त्रयीत दहा उपनिषदाबरोबर ब्रह्मसूत्रे व त्याबरोबर श्रीमद्भगवद्गीतेचा समावेश असतो हे सर्वांना माहीत आहे. या व्यतिरिक्त लहान-मोठे अनेक मंत्र त्या त्या ठिकाणी व्यवहारात उपयोगात आणले जातात. तंत्र-शास्त्र हाहि वैदिक-संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. वेद-विहित मार्गाला विरुद्ध असलेल्या काही तंत्राचा श्रीस्वामींनी नामोल्लेख करून अधिक्षेप केला असला तरी अविरुद्ध तंत्र-मार्गाला सुद्धा त्यांचा विरोध असेल असे म्हणता येत नाही. उदा. श्रीदत्तमाला मंत्रासारखे जे तंत्रप्रोक्त मंत्र आहेत त्याचा श्रीस्वामींनी अंगीकारच केला आहे. पूर्वापार चालत आलेली ही सारी वैदिक, पौराणिक व तांत्रिक मंत्र-सामग्री जशी श्रीस्वामींना अवगत होती तशी, स्वतः त्यांचा अधिकार मंत्रदृष्ट्या ऋषींचा असल्याने काही नवे मंत्र देखिल त्यांच्या स्मृति-कोशात होते. या सर्व जुन्या नव्या सामग्रीचा उपयोग करून श्रीस्वामींनी ग्रंथरचना किंवा स्तोत्ररचना केली आहे. नर्मदा-लहरीच्या संदर्भात हे मुद्दाम इथे सांगण्याचा उद्देश एवढाच की **ज्या रचनेत वाचकाला किंवा अभ्यासकाला गर्भित मंत्र दिसत नसेल किंवा ओळखता येत नसेल तिथे सुद्धा मंत्र-गर्भता असू शकते हे लक्षात यावे.** या विषयावरील सुंदर उदाहरण म्हणजे श्रीदत्तपुराणात आलेली दोन स्तोत्रे -

श्रीदत्तप्रार्थनाचतुष्क [समस्त दोषशोषणम् .....]

श्रीदत्तापराधक्षमापन स्तोत्र [दत्तात्रेय त्वां नमामि ....]

या दोन्ही स्तोत्रांना -

"निर्विघ्नार्थमेते स्तोत्रे मन्त्रगर्भे सदा पठनीये ।"

[मंत्र-गर्भ असलेली ही दोन स्तोत्रे विघ्न-निवारणासाठी सर्वदा म्हणावी.]

अशी टीप आहे. या स्तोत्ररचनेत मंत्र कोणता हे स्पष्ट दिसत नाही. परंतु मंत्रगर्भ या शब्दावरून तिथे मंत्र असलाच पाहिजे हे उघड आहे. जसा गायक साधे गाणे म्हणू लागला तरी ते तालसुराला धरूनच असते. त्याप्रमाणे श्रीस्वामींचा अधिकार व मंत्र-गर्भ रचनेची त्यांची प्रवृत्ति ही लक्षात घेता **त्यांच्या सारख्यांच्या बिसाट-शब्दांना वेदतुल्य मंत्र-मयता लाभली तर ते आश्चर्यकारक मानता येणार नाही.**

जिथे सुस्पष्टच मंत्र-गर्भता आढळते त्या स्थळांचा जरी विचार केला तरी किती विपुल-प्रमाणात श्रीस्वामींनी मंत्र-विनियोग साधला आहे हे अभ्यासकांच्या लक्षात येईल.

ऋग्वेदाची प्रतिकृति वेदपादस्तुति

श्रीदत्त-पुराणातील वेद-पादस्तुति हे या रचनेचे पहिले उदाहरण. पहिले या दृष्टीने की इतर साहित्यकृतीमध्ये श्रीस्वामीमहाराज ज्याप्रमाणे संकल्पित मंत्राचे एकेक अक्षर संकल्पित कृतीमध्ये विशिष्ट स्थानी ठेवून पुढे जातात तसे इथे घडत नाही तर उलट; वेदातील एक, दोन पदे किंवा पूर्ण चरणच घेऊन ते साहित्यकृति निर्माण करीत आहेत. वेदपादस्तुतीतील हा पहिला श्लोकच बघा.

अग्निमीळे परं देवं । यज्ञस्य त्वां त्र्यधीश्वरम्
स्तोमोऽयमग्रियो ऽग्रस्ते । हृदिस्पृगस्तु शंतमः ॥
वेदपादस्तुति ॥ १ ॥

दत्तपुराण

यातील जवळपास प्रत्येक शब्दच ऋग्वेदसंहितेतून उचलला आहे.

अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् ॥ऋ. १.१.१
अयं ते स्तोमो अग्रियो हृदिस्पृगस्तु शंतमः ॥ऋ. १.१६.७

श्रीदत्तपुराणातील अगदी शेवटचा श्लोक देखिल ऋग्वेदाच्या अन्तिम मंत्राची प्रतिकृति आहे.

समानी वो ऽ स्त्विहाकूतिः समानहृदयानि वः ।
समानमस्तु वो दत्ते मनो नोऽव्यात् त्र्यधीश्वरः । ८.८.६८

पहिल्या ऋङ्मंत्रातील पुरोहित व ऋत्विज् हे दोन शब्द वगळून तर दुसऱ्या मंत्रातील पदाचा काहीसा अनुक्रम बदलून व आवश्यक तेवढेच एक दोन शब्द घालून वेदपादस्तुतीतील पहिला श्लोक साधला गेला आहे. वेदपादस्तुतीतील शेवटचा अडुसष्टावा श्लोक वगळला तर इतर सर्व श्लोकात हेच रचनातंत्र आढळते. अशा रचनेला मंत्रगर्भ रचना असेहि नाव देण्याचे कारण नाही. हे वेदमंत्राचे वेगळे पौराणिक-संहितीकरण आहे असे फार तर म्हणता येईल. "एकदेश-विकृतम् अनन्यवत्" - [वस्तूत अंशतः बदल केला तरी वस्तू तीच राहते.] असा संस्कृतात न्याय आहे. त्यादृष्टीने सारी वेदपादस्तुति ही एक नवी लहानशी श्रीदत्तसंहिताच आहे असे म्हणता येईल. ऋग्वेदाच्या चौसष्ट अध्यायातील प्रतीकात्मक शब्द निवडून केलेले हे नवे चयन आहे. ते चयन सुद्धा एका वेगळ्या दृष्टीने झाले आहे. ऋग्वेद हा हौत्रवेद आहे हे सर्वांना माहीत आहे. हौत्र-वेद याचा अर्थ श्रौत-यज्ञात येणाऱ्या

वेगवेगळ्या देवतांच्या प्रार्थनेसाठी वा आवाहनासाठी असलेल्या स्तुति- रचना. देवताप्रार्थनापर असणाऱ्या या शब्दांना श्रीस्वामीमहाराज आता श्रीदत्ताच्या स्तुति- साठी उपयोगात आणत आहेत. याचा अर्थ या सर्व विविध शब्दांचे विविध संदर्भ सुटून त्यांना आता एकच संदर्भ प्राप्त झाला आहे, तो संदर्भ आहे श्रीदत्ताचा. तो जुना संदर्भ हा नवा, किंवा तो मूळ हा मात्र आगन्तुक अशा कल्पना अनुभूतीच्या तात्त्विक क्षेत्रात अगदीच गैरलागू होत. **अद्वैतवादानुसार एक परमात्माच सत्य असल्याने व तद्व्यतिरिक्त दुसरी वस्तूच नसल्याने विविधता दर्शविणारी सारी नावे वस्तुतः एकाचीच वेगळी नावे** असतात. या न्यायाने अग्नि, इंद्र, वरुण इत्यादि देवतांची सारी नावे श्रीदत्ताचीच नावे होत. हीच श्रीस्वामींची शास्त्रीय- भूमिका असल्याने एवढ्या मोठ्या ऋग्वेदातील [एकूण दशसहस्र मंत्र] काही निवडक शब्द हाताशी घेऊन श्रीस्वामींनी त्यांचा एकान्वय [श्रीदत्तान्वय] करून दाखविला. सारा ऋग्वेद त्यांना मुखोद्‌गत असल्याने हे त्यांना सहज करता आले हे जसे खरे आहे तसे हे सारे वेगळे संदर्भ वेगळे नाहीतच ही त्यांची विशुद्ध भूमिका असल्यानेहि हे घडू शकले. या रीतीचे रचनातंत्र पूर्वी कोणी हाताळले असेल तर माहीत नाही. श्रीमध्वाचार्यांनी ऋग्वेदादिमंत्रांचा सगुण- विष्णुपर अर्थ लावून दाखविला आहे. ती त्यांची निश्चितच एक आगळी भूमिका होती. काही अभ्यासकांना जाणवणारे वेद- पुराणातील द्वैत संपविण्याचा श्रीमध्वाचार्यांचा हा फार मोठा प्रयत्न होता. काण्व संहितेचे भाष्यकार श्रीअनंतभट्ट यांनी सुद्धा

"योऽस्य प्रियः स्यात्तमेतमनुमन्त्रयीत" असा एक श्रुतिसंदेश प्रमाणाला घेऊन काण्वसंहितेतील काही मंत्रांचे सगुण- पर अर्थ करून दाखविले आहेत. वेदपाद- स्तुतीत मात्र श्रीस्वामींचे पाऊल एका नव्या यापूर्वी न चोखाळलेल्या वाटेने पडत आहे. श्रीमध्वाचार्य किंवा श्री अनंतभट्ट यांच्या तंत्रानुसार एक कर्मपर व दुसरा भक्तिपर असे दोन अर्थ एकाच मंत्रांचे होऊ शकतात एवढे आपल्या लक्षात येतें. **आता या नवीन संहितीकरणाने दोन अर्थाचा प्रश्न मनात येत नाही. येतो तो एकच श्रीदत्तरूप अर्थ.**

वैदिक शब्द व वैदिक अर्थ त्याचप्रमाणे पौराणिक शब्द व पौराणिक अर्थ ही जोडी आपल्यां मनात दृढमूल असल्याने शब्द वैदिक व अर्थ मात्र पौराणिक हा प्रकार चटदिशी मनात उतरत नाही हे खरे आहे. श्रीदत्ताच्या वर्णनासाठी पौराणिक- भाषाच वापरली गेली पाहिजे हा मनाचा आग्रह असतो हे देखिल बरोबर आहे. परंतु "वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो -----" सर्व वेदांनी माझेच प्रतिपादन केले आहे. [गीता १५] या विधानाचे कुठे तरी समर्थन यावयास नको काय? त्यासाठीच श्रीस्वामीमहाराजांनी हे नवे तंत्र अवलंबिले व वैदिक शब्द घेऊनहि - त्यातहि सर्वात मोठ्या ऋग्वेदातील काही प्रतीकात्मक शब्द घेऊन

श्रीदत्तासारख्या अवतार विग्रहाचे वर्णन कसे होऊ शकते हे समर्थपणे दाखवून दिले. हा नवाच रचनाप्रकार असल्याने व त्याचा मनाला सराव नसल्याने क्षणभर अवघडल्यासारखे होते हे खरे आहे. परंतु ही नवी न मळलेली वाट चोखाळण्यामागची रचनाकर्त्याची भूमिका लक्षात आल्यानंतर मात्र हा क्षणाचा प्रारंभिक अडसर दूर होऊन नव्या जाणीवेने या प्रकाराकडे अभ्यासक पाहू लागतो. हेमाडपंथी रचनेचे स्वतःचे काही वेगळे सौंदर्य असते हे विसरून कसे चालेल?

एकूण श्रीदत्तपुराणातील वेदपादस्तुति मंत्रगर्भरचनेचे उदाहरण नसून नव्या मंत्रमय-रचनेचे संस्कृतातील पहिले वहिले उदाहरण होय असे म्हणता येईल.

श्रीदत्तमाहात्म्यातील मंत्रगर्भतेचे वैचित्र्य

श्रीस्वामींच्या हातून घडलेली मंत्रगर्भरचना आपल्याला पाहायला मिळते ती श्रीदत्तमाहात्म्यासारख्या प्राकृत ग्रंथात. या ग्रंथाविषयी श्रीस्वामींचे अभिमत असे आहे -

विविध- धर्मान्वित । ज्ञान- भक्ति रस- भरित ।
असे हे श्रीदत्तचरित । मूर्तिमंत ब्रह्म की ॥
ब्रह्म ते अरूप असून । कोणा नये दिसून।
करिता उपनिषदांचे श्रवण । मनन- ध्याने मग कळे ।
मंदा विशेषेकरून । नुपजे औषनिषदज्ञान ।
त्याकरिता हे लेखन । करवी अत्रिनंदन कृपाळू ॥

श्रीदत्त माहात्म्य ५१. १०४ ते १०६

श्रीदत्तमाहात्म्याच्या या पुष्पिकेत श्रीस्वामीमहाराज औपनिषदज्ञानाचा मुद्दामच उल्लेख करीत आहेत. सकृद्दर्शनी या उल्लेखाचे स्वारस्य तेवढे जाणवत नाही. श्रीदत्ताचे चरित्रवर्णन हा या ग्रंथाचा मुख्य वर्ण्य विषय. तिथे उपनिषद्ज्ञानाचा संबंध काय असे साधारण मनाला वाटते. सगुण साकार भगवद् विग्रह हा वेदाचा किंवा उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय कसा होऊ शकेल? असे वाटत असते. कारण वेदात कर्म व उपनिषदात निर्गुण- निराकार तत्त्व या दोहोंचे प्रतिपादन होऊन गेल्यावर पुराणांनी भाविक लोकांसाठी सगुण- साकार भगवंताचा महिमा गायन केला आहे हे वर्गीकरण इतके काही मनात रुजून गेले आहे की उपनिषदांचा, सगुण- साकार परमात्मतत्त्वांशी साक्षात् काही संबंध असेल असे मनात येत नाही. हीच कोंडी श्रीस्वामीमहाराजांना दूर करायची होती. त्यासाठी अनेक तंत्रांचा त्यांनी वापर केला. उपनिषदातील [केनोपनिषद्] उमाख्यान व शिरोळचे भोजन- पात्राख्यान एकाच कुमारशिक्षेत त्यांनी गोवले. उमाख्यानात इंद्रापुढे प्रगट झालेले परब्रह्म, शिरोळच्या ब्राह्मण स्त्रीच्या एकान्तप्रेमाने श्रीदत्तरूपात प्रगट झाले असा एकान्वय

श्रीस्वामींनी मोठ्या कौशल्याने कुमार-शिक्षेत साधून ठेवला. **उपनिषदातील उमाख्यान व कुमार-शिक्षेतील भोजनपात्राख्यान यांच्या या तुल्ययोगितेचा अभ्यासक जर बारकाईने विचार करतील तर त्यांना उपनिषदातील निर्गुण-निराकार-वादाला श्रीस्वामींनी किती कौशल्याने सगुण-साकारतेकडे वळविले आहे हे पाहून आनंद झाल्यावाचून राहणार नाही.** या तंत्राबरोबरच त्यांनी हाताळलेले दुसरे तंत्र श्रीदत्तमाहात्म्यात आपल्या दृष्टीस पडते. इथे त्यांनी उपनिषदातील माण्डूक्य व ईश ही दशोपनिषदातील दोन लहान उपनिषदे व "अतो देवा" हा मंत्र निवडला. त्यातील प्रत्येक अक्षर श्रीदत्तमाहात्म्याच्या शेवट शेवटच्या अध्यायातून [अध्याय ३९ ते ५१] शेवटपर्यंत **तिसऱ्या क्रमाने** ठेवले. श्रीदत्तमाहात्म्याच्या काही जुन्या मुद्रित प्रतीत ते ठळकपणे छापले आहे. त्यामुळे उपनिषदातील सलग मंत्र वाचता येत असे. काही प्रतीत तो इतर शब्दांच्या आकाराचाच मुद्रित केल्याने असा काही प्रकार श्रीदत्तमाहात्म्यात आहे हेहि अभ्यासकांच्या दृष्टीतून सुटून गेले. सुदैवाने श्रीस्वामींचे सहृदय व साक्षेपी भक्त श्री वासुदेवराव चोरघडे यांनी या ग्रंथवैचित्र्याकडे लक्ष वेधल्याने आता झिरीच्या श्री सीताराम संस्थानाने छापलेल्या श्रीदत्तमाहात्म्यात पुनः ती सोय भाविक-वाचकांना उपलब्ध झाली आहे. मंत्रगर्भरचनेचे हे तंत्र किती अवघड आहे व अधिकारी महात्म्यांना ते किती सहजपणे हाताळता येते ते श्रीदत्तमाहात्म्यात बघायला मिळते. एकीकडे श्रीदत्तमाहात्म्यात येणाऱ्या विविध कथा, त्यांचे संविधानक, त्यातील पात्रातील स्वभाववैशिष्ट्ये, कथेचा ओघ या सर्वांचे ओझे लेखणीवर असताना पुनः तिला उपनिषदातील एकेक अक्षराचा वेच करून प्रत्येक ओवीत तिसऱ्या क्रमांकावर ठेवण्याची कामगिरी सोपविणे तसे सोपे नव्हते व नाही. वेदपाद स्तुतीत एक सलग शब्द किंवा एक सलग चरण उचलून ठेवावयाचे होते. त्यापेक्षा ही कामगिरी निश्चित किचकट होती. तिच्या भरीला पडून कथा-वर्णनाचा सारा डोलच मोडून जाण्याचा संभव होता. **श्रीस्वामींच्या आर्ष प्रतिभेने हे आव्हान अतिसमर्थपणे पेलले व मराठी सारस्वतात एक नवा वाङ्मय-बंध निर्माण करून ठेवला.** हे तिसरे अक्षर इतर अक्षरासारखेच समजून वाचतांनाहि कोणताहि विरस तर होत नाहीच उलट इथे दोन उपनिषदे गुंफली गेली आहेत हे मुद्दाम दाखविल्यावाचून लक्षात येत नाही. हेच श्रीस्वामींच्या रचनातंत्राचे अपूर्वत्व होय. संस्कृत भाषेत त्यातहि वैदिक भाषेत अनुस्वार-विसर्गांची होणारी निरंतर आवृत्ति व काही जोडाक्षरे यांचे प्राकृत रचनेत अवधान ठेवून गुंफ साधणे सोपे मुळीच नव्हे. माण्डूक्योपनिषदात ओंकाराच्या चार [साडेतीन] मात्रांचे व त्या अ - उ - म व अर्धमात्रा यांचे व समाधीला धरून चार अवस्थांचे नाते दाखविले आहे. अर्थात हा विषयच गूढ असल्याने त्यासाठी

वापरले जाणारे शब्दहि साध्या व्यवहारातील नसणारच. अशा अप्रसिद्ध शब्दातील घटक अक्षरांना घेऊन प्राकृत रचना उभी करणे हे महद् दिव्य होय. श्रीदत्तमाहात्म्यातील एकोणचाळिसाव्या अध्यायातील या प्रारंभीच्या सात ओव्या पाहिल्या तरी त्यातून झालेली उपनिषदक्षरांची गुंफण आपले लक्ष वेधून घेईल.

जो तू ओतप्रोत जगद्रूपी ।अससी विश्वव्यापी॥
त्वत्कथामृत जो पी ।हो का पापी तरी तो तरे ॥१॥
नाला मिळता नदीसी ।कोण अशुद्ध म्हणे त्यासी।
तसा त्वदधीन हो त्यासी ।अशुची कोण म्हणेल ॥२॥
हे कित्येक न मानितील ।तरी ते स्वार्था मुकतील
आमुचे काय जाईल ।त्यांच्या दोषे ते बुडता ॥३॥
खरे तत्त्व सांगता ।ते न ये ज्याच्या चित्ता।
त्यांचा दोष न ये आप्ता ।त्याची दयाळुता न भंगे ॥४॥
जो तू दयासागर ।उद्धरावया चराचर।
झालासी ऋषिकुमार ।हे उपकार केवढे ॥५॥
प्रत्यक्ष ह्या भूमिवरी ।रूपे दाविसी नानापरी।
हा उपकार आम्हावरी ।तू करिसी दयाळा ॥६॥
आकार जयासी नाही ।तो तू होसी देही।
यापरते अधिक कांही ।दयाळुत्व तेही दिसेना ॥७॥
सर्व मिळे ह्या संसारी ।परी मुक्ती होती दूरी।
ती द्यावया लवकरी ।तू शरीरी आलासी ॥८॥
दुष्टा दंडावयासी ।इष्टा पाळावयासी।
तू जी जी लीला करिसी ।ती आम्हा तारक ॥९॥

श्रीदत्तमाहात्म्य अ. ३९

"ओमित्येतदक्षरमिदं "—माण्डूक्योपनिषदातील ही पहिली नऊ अक्षरे या नऊ ओव्यात गुंफली गेली आहेत. ही नुसती अक्षरेच गुंफण्यासाठी - ओवण्यासाठी - हे ओवीचे माध्यम श्रीस्वामींनी स्वीकारले असेल काय? तसे वाटत मात्र नाही. एक विशिष्ट चमत्कृति या रचना तंत्रानी साधली आहे हे अमान्य करता येत नाही. पण तेवढेच या रचनेचे प्रयोजन नाही. वेदोपनिषदाचा अधिकार शास्त्र-मर्यादेनुसार ज्यांना लाभला नाही त्यांनाहि श्रुतिमातेच्या जवळ आणण्याची ही शास्त्रपूत योजना आहे. ज्याप्रमाणे औषधाची मोठी मात्रा

एकाच वेळी दिलेली ज्यांना चालत नाही त्यांना तीच मात्रा विभागून देतात. तसेच पूर्ण वाक्यरूप वेदमंत्र पठन करण्याचा अधिकार ज्यांना शास्त्र-नियमानुसार लाभला नसेल त्यांनाहि तेच मंत्र अक्षरअक्षर विभागून व ती अक्षरे क्रमाने प्राकृत शब्दांच्या पंक्तीत ठेवून अवगत करून देण्याचा व त्यांना वैदिक धारेत धरून ठेवण्याचा हा मोठा प्रयत्न होता. वेदमार्गाचे रक्षण हे श्रीदत्तावताराचे एक उद्दिष्ट सांगितले जाते. या तऱ्हेची मंत्रगर्भ रचना ही त्या उद्दिष्टाची परिपूर्ति होय. दुसरेहि एक उद्दिष्ट या तऱ्हेच्या रचनेच्या पाठीमागे असावे असे श्रीदत्तमाहात्म्याच्या मागे उल्लेखिलेल्या पुष्पिकेवरून म्हणावेसे वाटते.

सगुणाराधन हा औपनिषदज्ञानाचा सोपान

मंदा विशेषे करून । नुपजे औपनिषदज्ञान
त्याकरिता हे लेखन । करवी अभिनंदन कृपाळू ॥

श्रीदत्तमाहात्म्य ५१.१०६

असे श्रीस्वामी म्हणतात. इथे औपनिषदज्ञानाचा स्पष्ट उल्लेख आहे. माण्डूक्य व ईश या दोन उपनिषदातील अक्षरांची गुंफण पूर्ण झाल्यानंतर ग्रंथाच्या शेवटी येणारा उपनिषदाचा - औपनिषदज्ञानाचा - उल्लेख बरेच काही अधिक सांगून जातो. हे श्रीदत्तचरित मूर्तिमंत परब्रह्म आहे, असे म्हणून लगेच श्रीस्वामी महाराज म्हणतात - ब्रह्म अरूप आहे व कोणाला ते दिसून येत नाही. परंतु उपनिषदांचे श्रवण-मनन-निदिध्यासन केल्यानंतर मात्र ते कळते. हे कळणे सगुण-साकार-रूपाचे असते हा श्रीस्वामींचा प्रत्यय असल्यानेच श्रीदत्तचरित्र मूर्तिमंत परब्रह्म आहे, असा निर्वाळा ते पुष्पिकेत प्रथम देऊन टाकायला विसरत नाहीत. याचा अर्थ सर्वसाधारण वाचक किंवा अभ्यासक समजत असतो त्याप्रमाणे उपनिषदात प्रतिपादन केलेले आत्मतत्त्व निर्गुण-निराकार म्हणजेच काहीतरी शून्याकार तत्त्वासारखे गृहीत-कृत्यासारखे [बिन्दु-संकल्पनेसारखे] तत्त्व नसून, मूर्तिरूपात प्रगटणारे ते तत्त्व आहे, असा होतो. निर्गुण-निराकारवादाची व सगुण-साकारवादाची हीच ती अपूर्व सांधे-जोड होय. माण्डूक्य उपनिषदात ओंकारच्या तीन मात्रांचे वर्णन झाल्यावर ज्या चौथ्या मात्रेचा - प्रपञ्चोपशम, शिव व अद्वैत या शब्दाने उल्लेख येतो तेच "अव्यवहार्य" आत्मतत्त्व म्हणजेच श्रीदत्त होत किंवा ईशोपनिषदात - अकाय [शरीररहित] अव्रण [व्रणरहित] अस्नाविर [स्नावा-शिरा नसलेले] शुद्ध [अविद्या-मलरहित] अपापविद्ध - [धर्माधर्मरहित] इत्यादि शब्दांनी स्थूल-सूक्ष्म-कारण देहाच्या अतीत असलेले जे आत्मतत्त्व प्रतिपादन केले ते श्रीदत्त होत असा बोध श्रीस्वामींना इथे करून द्यायचा आहे. "मंदा नुपजे औपनिषद ज्ञान" असे जेव्हा श्रीस्वामी म्हणतात **तेव्हा अनधिकारी साधकांना**

औपनिषदज्ञानाची सगुणोन्मुखता कळत नाही असे त्यांना म्हणायचे आहे. ती उकल करण्यासाठी हे लेखन आहे हा श्रींचा भाव. म्हणूनच त्यांनी माण्डूक्य-ईश उपनिषदातील अक्षरांची एका बाजूने श्रीदत्तचरित्रात गुंफण करून दुसऱ्या बाजूने सुस्पष्टपणे उपनिषदातील अरूप आत्मतत्त्व व श्रीदत्तचरित्रात वर्णन केलेले श्रीदत्त-स्वरुप एकच होत असा निर्वाळा दिला आहे. वृद्धशिक्षेत श्रीस्वामींनी एकोणपन्नास श्लोकापासून तर अठ्ठावन्न श्लोकांपर्यंत दहा श्लोकात, दशोपनिषदातील प्रतिपादित आत्मतत्त्व म्हणजे श्रीदत्त होत असे स्पष्ट वर्णन केले आहे. इथे मात्र ती प्रत्यक्षवृत्ति सोडून परोक्षवृत्तीने तसेच प्रतिपादन केले. उपनिषद्ग्रंथातून किंवा ब्राह्मणग्रंथातून अनेक ठिकाणी देव परोक्षप्रिय आहेत असे म्हटलेले आढळते. इदन्द्र म्हणायचे असतांना ते मुद्दामच इन्द्र असे म्हणतात असे त्याविषयीचे एक उदाहरण ऐतरेयोपनिषदात दिले आहे. [ऐतरेय १.३]. त्याच परोक्षप्रियतेची वेगळी दिशा धरून अलीकडच्या काळात श्रीस्वामींनी उपनिषदक्षरांची गुंफण प्राकृत काव्यात करून दाखविली. श्रीस्वामींची ही भूमिका लक्षात ठेवून जर उद्धृत केलेल्या श्रीदत्त चरित्रातील वरील ओव्या - "जो तू ओतप्रोत जगद्रूपी"... आपण वाचू लागलो तर उपनिषदातील तथाकथित जटिल निर्गुण आशयच भक्तिप्रेमाने कसा ओथंबलेला आहे हे लक्षात येते. किंबहुना तसा तो ओथंबून टाकण्यासाठीच हे अपूर्व तंत्र श्रीस्वामींनी हाताळले असे म्हणता येईल. पूर्वी सारे वेद प्रणव स्वरूपातच होते. पुढे त्यातून सर्व वेदांचा आविष्कार झाला असा वैदिकांचा सिद्धान्त आहे. सारे वेद याचा अर्थ सारे ज्ञान-भाण्डारच त्यातून आविष्कार पावले असा होतो. तर मग भक्त हृदयाला गहिवरून टाकणारे हे दत्तमाहात्म्यातील [एकूण चाळिस अध्यायातील] विचारच त्या कक्षेतून सुटतील असे समजण्याचे काही कारण नाही. त्यामुळे "ओमित्येतदक्षरमिदं "... हे [सारे विश्व] ओम् या अक्षरस्वरूपाचे आहे - या अर्थाची वरील अक्षरे ओवीरूपात क्रमाने घेऊन **प्राकृतभाषेत भक्ति-प्रेमाचा जो लाघवी व उत्कट विचार श्रीस्वामींनी वरील ओव्यातून मांडला तो सुद्धा ओम् इत्येतदक्षरमिदम् - या अक्षर-संहतीला विसदृश तर नाहीच उलट एकात्मभावाने तिच्याशी तो विनटला आहे असे कां मानू नये?** तात्पर्य, मंत्र-गर्भ रचनेमध्ये केवळ अक्षरगुंफाची चमत्कृति साधण्याची सीमित दृष्टि नाही तर **अर्थाचे बहुभवन साधण्याचा** दृष्टिकोण आहे असे मानण्यास अवसर आहे. त्याकरिता, हे लेखन 'करवी अभिनंदन कृपाळू ।' असे जेव्हा श्रीस्वामी म्हणतात तेव्हा उपनिषदांचा अक्षरराशि - किती व्यापक आशय-विस्तार करू शकतो हे दाखविण्यासाठीच श्रीदत्ताने श्रीस्वामीकरवी प्रभावीपणे रुजू केलेले मंत्र गर्भरचनेचे हे तंत्र आहे असा श्रीस्वामींचा आशय दिसतो.

असा तर्क करायला आणखी एक कारण इथेच आठवते. श्रीदत्तमाहात्म्याच्या या एकोणचाळीस अध्यायाच्या आरंभी ज्या तऱ्हेचे विस्तृत प्रास्ताविक वाचायला मिळते तसे ते इतरत्र या ग्रंथात क्वचितच दिसेल. अलर्काची कथा संपून आयुराजाची कथा या अध्यायापासून सुरू होते. **माण्डूक्योपनिषदातील अक्षराची वीण सुद्धा इथेच सुरू व्हावी हे केवळ यदृच्छा-घटित मानण्याचे कारण नाही.** तसे ते असते तर या प्रास्ताविकाची तेवढी इथेच आवश्यकता नव्हती. ग्रंथारंभी जे प्रास्ताविक यावे ते इथे येत आहे. त्यात सुनिश्चित योजकता आहे. **निर्गुण-निराकारवाद व सगुण-साकार-वाद यांच्या सीमा पुसून टाकण्यासाठी चाललेली ही धडपड आहे.** या प्रास्ताविकातील दहावी व अकरावी ओवी श्रीस्वामींच्या मनोगतावर सुस्पष्ट प्रकाश टाकते. ते म्हणतात -

मानस शुद्ध व्हावया । तुझ्या लीला सोडूनिया ।
आम्ही इतर उपाया । सुगम न मानू ।
जे सर्वं खल्विदं म्हणोन ।असे श्रुतिवचन ।
तेही ये अनुभवून । त्वल्लीलासेवन होताची ।

श्रीदत्त. ३९.१०/११

एकूणचाळिसाव्या अध्यायातील या प्रास्ताविकात श्रीस्वामींनी "सर्वं खल्विदं" [ब्रह्म] या श्रुतिवाक्याचा मुद्दामच उल्लेख केला आहे. या वाक्याला अवान्तर महावाक्य म्हणतात आणि हे वाक्य उघड उघडच "ओमित्येतदक्षरमिदं... " या माण्डूक्याच्या वाक्याशी समानार्थक आहे. ओंकाराच्या उपासकाला जो व्यापक अनुभव येतो तोच "सर्वं खल्विदं---- या वाक्यात प्रतिबिंबित झाला आहे. "ओमित्येतदक्षरं---- हे अनुभूतीचे पूर्वरूप तर "सर्वं खल्विदं..." हे उत्तर रूप असेहि इथे म्हणता येईल. याप्रमाणे माण्डूक्य उपनिषदाची अक्षरे गुंफण्याचे निमित्त करून केवढ्या मोठ्या सखोल आशयाचे अवगाहन करण्याचा श्रीस्वामींचा भाव आहे हे पाहून मन थक्क होते. इथे दाखविलेला हा अनुबन्ध अर्थातच सर्वांना मान्य होईल असे नाही. त्यांनी निदान उपनिषदातील एकेक मंत्राक्षर किती कौशल्याने श्रीस्वामींनी हळुवारपणे घालून हा वाङ्मय जडाव निर्माण केला आहे हे तरी न्याहाळून पाहावे. उदाहरणापुरत्या काही प्रारंभिक ओव्या वर दिल्या आहेतच. परंतु श्रीदत्तमाहात्म्यातील शेवटचे तेरा अध्याय व त्यात आलेली मंत्राक्षरे यांचा स्वतंत्रपणे एक शिल्प म्हणून अभ्यास करणाऱ्यांना देखिल सादर कौतुक वाटल्यावाचून राहणार नाही. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणे "वऱ्हाडिया लेणी लुगडी" वाट्याला येतातच. मोठ्या साहित्यकृतींचे हेच वैशिष्ट्य होय.

अभ्यासकांच्या सोयीसाठी श्रीदत्तमाहात्म्यात गुंफलेल्या मंत्रांचा हा तपशील आहे.

पासून		पर्यंत	
अ. ३९ * ओ. १	ते	अ. ४३ ओ. ९१	माण्डूक्य उपनिषद्
अ. ४३ * ओ. ९२	ते	अ. ४४ ओ. ६३	भद्रं कर्णेभिः मंत्र स्वस्ति न इन्द्रो मंत्र
अ. ४४ ओ. ६४	ते	अ. ५० ओ. ४३	ईशावास्य उपनिषद्
अ. ५० ओ. ४४	ते	अ. ५० ओ. ७५	पूर्णमदः पूर्णमिदं मंत्र
अ. ५० ओ. ७६	ते	अ. ५१ ओ. १४३	अतो - विश्वा मंत्र विष्णोर्यत् परमं पदम् मंत्र

"ओमित्येतदक्षरमिदं... " या उपक्रमाने सुरू होणारा मंत्राक्षरांचा गुंफ "विष्णोर्यत्परमं पदम्" या उपसंहाराने संपतो. या उपक्रमोपसंहारातहि पाहणाऱ्याला योजकता दिसल्यावाचून राहणार नाही. इथेहि निर्गुणवाद-सगुणवाद यांचे एकात्मीकरण पर्यायाने श्रीस्वामीमहाराज सुचवीत आहेत. पण तो विषय वेगळा. केवळ शब्द शिल्पाच्या दृष्टीनेच विचार करायचा झाल्यास किती कलात्मकतेने ग्रंथाचा व मंत्राक्षरगुंफाचा शेवट श्रीस्वामी करीत आहेत ते पाहण्याजोगे आहे.

> कधी पद्मिनी बोलावी भ्रमरा । कधी चंपक फिरवी माघारा ।
> धरूनि ह्या विचारा । एवढा पुरा केला लेख ॥ ११२ ॥
> त्र्यश्वि दंतिक्षिति १८२३ मिते । शालिवाहनशके । कलौ ।
> अभ्राभ्राक्ष ५०० मिते क्षिप्रातटे ग्रन्थोऽयमुद्गतः ॥ ११३ ॥

पद्मिनी कधीतरी भ्रमराला गुंजारव करण्याचे आवाहन करते काय किंवा चांफा गुंजारव करायला आलेल्या भ्रमराला आता बस्स झाले असे कधीतरी म्हणतो काय? पद्मिनी काय किंवा चांफा काय सुगंधाची लयलूट करणे हाच त्याचा नित्य - स्वभावधर्म. गुंजारव करणाऱ्या भ्रमरानेच आता ठरवायचे केव्हा थांबायचे ते !!

ओवीचा हा अर्थ गुणगुणत असता इथे पद्मिनी शब्दातील "प" विष्णुपदातील

प-काराचे प्रतिनिधित्व करीत आहे हे कधीतरी लक्षात येईल काय? शेवटच्या ओवीतील त्रि +अश्वि-दंति-क्षिति ही पदे तर कालनिदर्शनासाठीच आलेली. त्यातील दन्ति [दंति] पदातील "दं" "विष्णुपदम्" शब्दातील अन्तिम अक्षराचा निदर्शक आहे हेहि लक्षात येणे सुतराम् अशक्य.

परंतु भाविकांना मोहरे लावावे, त्यांना भक्ति-प्रेमात न्हाऊन टाकत असताना वेदोपनिषदातील स्वयंभू मंत्राक्षरांचाहि त्यांना संस्कार घडवावा यासाठी अशा गूढ लेखनाची रीत श्रीस्वामींनी अंगीकारिली.

सप्तशती गुरु चरित्रातील मंत्रगर्भता

असाच प्रकार सप्तशती गुरुचरित्रात आढळतो. इथे या ग्रंथात मराठीतील गुरुचरित्रग्रंथाचे सार, सातशे ओव्यात सांगितले असल्याने सप्तशती हे अन्वर्थक नाव श्रीस्वामींनी दिले. श्रीमद्भगवद्गीता सुद्धा सातशे श्लोकांची आहे. तिला सुद्धा सप्तशती म्हणतात. सप्तशतीगुरुचरित्र व श्रीमद्भगवद्गीता यांचा असा संबंध श्रीस्वामींनी या नामकरणाने आठवून दिला आहे. पूर्वी नातवाला आजोबाचे नाव ठेवण्याची प्रथा होती. परंपरा सातत्यरक्षण हा त्या पाठीमागचा उद्देश असे. सप्तशती हे नाव या गुरुचरित्राला देऊन तोच उद्देश श्रीस्वामींना साधायचा आहे. गीतेप्रमाणे गुरुचरित्र हे त्रिकांडात्मक आहे हे त्यांनी इतरत्र दाखविले आहे. एवढेच करून न थांबता श्रीस्वामींनी सप्तशतीतील प्रत्येक ओवीतील तिसरे अक्षर श्रीमद्भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायातून घेतले आहे व त्याची सुरुवात "श्रीभगवानुवाच" या वाक्यापासून केली आहे. सप्तशतीतील या प्राथमिक ओव्या

नमः श्रीदत्तगुरवे हृद्वासो-धौति-कारवे ।
स्वात्मज्योतिः प्रकाशाय सुखायानर्थशान्तये ॥ १ ॥
भूतं भव्यं भवच्चास्माज्जायते येन जीवति ।
लीयते यत्र तद् ब्रह्म श्रीदत्ताख्यं त्र्यधीश्वरम् ॥ २ ॥
भक्ति- गम्यस्य तस्येदं चरितं चित्तशुद्धये ।
संक्षेपेण स्फुटं वक्ति वासुदेवसरस्वती ॥ ३ ॥
ग्रंथी वासुदेव निमित्त । कर्ता करविता दत्त ।
तत्पदी ठेवोनि चित्त । चरित ऐकोत संत हे ॥ ४ ॥
हे मानुनि जे वाचिती । किंवा भक्तीने ऐकती ।
तेची भवाब्धि तरती । उद्धरती निजकुळा ॥ ५ ॥
मना वाचा अगोचर । तो स्वच्छन्दे हो गोचर ।

कलियुगी यतीश्वर । नरसिंह सरस्वती ॥ ६ ॥

त्यांचे चरित्र ऐकून । नामधारकब्राह्मण ।

गाणगापुरी दर्शन । घ्यावे म्हणून पातला ॥ ७ ॥

वेद-उपनिषद यांच्या इतकेच श्रीमद्‌भगवद्‌गीतेला महत्त्व आहे हे मागे आपण पाहिले. ते ओळखूनच सप्तशतीगुरुचरित्रात गीतेचा पंधरावा अध्याय गुंफून ठेवण्याचे श्रीस्वामींनी ठरविले असावे. त्यातहि प्रतीक म्हणून पंधराव्या अध्यायाची निवड करण्यात सहेतुकता आहे. भगवान् आचार्य श्रीशंकर पंधराव्या अध्यायाच्या शेवटी म्हणतात-

सर्वो हि गीताशास्त्रार्थोऽस्मिन्नध्याये समासेनोक्तः न केवलं गीताशास्त्रार्थ एव, किंतु सर्वश्च वेदार्थः इह परिसमाप्तः। 'यस्तं वेद स वेदवित् [गी. १५.१] वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः [गी. १५.१५] इति चोक्तम् । [गीता. भाष्य १५.२०]

गीताशास्त्रातील सारा आशय या अध्यायात संक्षेपाने सांगितला आहे. गीताशास्त्रातीलच आशय नव्हे तर वेदातील सारे मन्तव्य इथे सांगून झाले आहे. गीतेत याच अध्यायात म्हटलेहि आहे.

जो त्याला जाणतो तो वेदवेत्ता म्हणला जातो. [१५.१]

सर्व वेदांचा मीच एक प्रतिपाद्य आहे. [गी. १५.१५]

या आचार्य वचनावरून पंधराव्या अध्यायाची महती स्पष्ट होते. अठरावा अध्याय सुद्धा गीताशास्त्राचा संक्षेप होय असे आचार्य म्हणतात. [गीता. भा. १८.१] यावरून आचार्यांच्या दृष्टीने पंधरावा व अठरावा अध्याय महत्त्वाचे होत हे उघड आहे. आणखीहि वेगळ्या दृष्टीने पंधराव्याचे आगळेपण जाणवते. गीतेतील अठरा अध्यायापैकी एक पहिला अध्याय सोडला तर इतर अध्यायांचा आरंभ एकतर अर्जुनाच्या प्रश्नाने किंवा भगवंताच्या निवेदनाने सुरू होतो. हे निवेदन पूर्वी आलेल्या आशयातील काही नव्या अंशाचे निरूपण करणारे असते. पूर्वीच्याच आशयाची पूरक माहिती द्यायची असली तर भगवान् कृष्ण अशा ठिकाणी अर्जुनाच्या प्रश्नाची वाट बघत नाहीत. स्वतःच पुढे सांगायला सुरुवात करतात. इथे पंधराव्या अध्यायात तसेच झाले आहे. अर्जुनाचा नवा प्रश्न नव्हता परंतु श्रीकृष्णाला स्वतः सांगावेसे वाटत आहे. आचार्य म्हणतात -

----- अर्जुनेनापृष्टोऽपि आत्मनस्तत्त्वं विवक्षुरुवाच । (गीता भा. १५.१)

[अर्जुनाने न विचारता देखिल स्वतःचे स्वरूप सांगण्याच्या दृष्टीने भगवान् म्हणतात.]

इथे "आत्मनः तत्त्वम्" हा शब्द फार महत्त्वाचा दिसतो. आत्मतत्त्व हा सामासिक शब्द न वापरता मुद्दाम दोन्ही शब्द इथे वेगळे ठेवले आहेत. त्याचा अर्थ आत्मा कोण व

त्याचे स्वरूप काय या दोन्ही अंगांचा इथे प्रामुख्याने विचार आहे, असा होतो. म्हणूनच या अध्यायातील एकूण वीस श्लोकापैकी आठ श्लोकात उत्तम-पुरुषी रचना करून किंवा त्याला संवादीरचना करून आत्मतत्त्वाचे वर्णन केले आहे.

यद् गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम । १५.६
ममैवांशो जीवलोके --- १५.७
तत्तेजो विद्धि मामकम् १५.१२
गामाविश्यच भूतानि धारयाम्यहमोजसा
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः १५.१३
अहं वैश्वानरो ----- पचाम्यन्नं चतुर्विधम् १५.१४
सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो १५.१५
यस्मात् क्षरमतीतो ऽहम् --- १५.१८
यो मामेवमसंमूढो १५.१९

या सर्व श्लोकात मी, माझे, मला, माझ्याविषयीचे असेच उल्लेख आहेत. भगवत् तत्त्वाचा उल्लेख करताना असा "मी" वर भर गीतेत मधून मधून आढळतो तसाच इथे झाला आहे.

आठाव्यतिरिक्त श्लोकातील तिऱ्हाईती वर्णन सुद्धा याच "मी"च्या सुरासी सूर मिळवीत असल्याने पंधराव्या अध्यायाचा एकूण घाटच वेगळा होऊन गेला. या अध्यायाला पुरुषोत्तम योग म्हणतात ते त्यामुळे. इथे सतराव्या व अठराव्या श्लोकात पुरुषोत्तमाचे - भगवंताचे वर्णन आहे. उत्तम पुरुष की पुरुषोत्तम ? पण इथेहि एक गूढ किंवा चमत्कृति घडून गेली आहे. वस्तुतः सतराव्या अध्यायात क्षर व अक्षर याहून वेगळ्या उत्कृष्ट पुरुषाचे - भगवंताचे वर्णन येते. परंतु परमात्मा उत्तम-पुरुष असून सुद्धा प्रसिद्धीला आला तो उत्तम-पुरुष म्हणून नव्हे तर पुरुषोत्तम म्हणून. हे कोणामुळे घडले? आचार्य म्हणतात -

पुरुषोत्तम इत्येवं मां भक्तजना विदुः ।
कवयः काव्यादिषु च इदं नाम निबध्नन्ति ।

गी. भा. १५.१८

[भक्तलोक मला पुरुषोत्तम असे ओळखतात. आणि कवि लोक काव्यादिप्रकारात हे गुंफत असतात.]

भक्त व कवि यांच्यामुळे उत्तम व पुरुष या शब्दांनी आपला क्रम बदलला व विग्रह वाक्याऐवजी सामासिक शब्द अस्तित्वात आला. हे जसे त्यामागील कारण तसे हे सारे

वर्णन संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीने "उत्तम-पुरुष" - स्वरूपाच्या रचनेत आले आहे हेहि तेवढेच खरे. उत्तम-पुरुषाचा पुरुषोत्तम होण्यात फार काही बिघडले असे नव्हे. परंतु उत्तम पुरुष म्हणण्यात क्षर व अक्षर [सर्व विश्व व त्याची बीजरूप मायाशक्ति] याहून पुरुष हा वेगळा आहे असा भाव [अत्यन्त-विलक्षणः गी. भा. १५.१७] होता, आता तो जाऊन अतीत-भावाला प्राधान्य आले. या अतीतपणामुळे उत्कृष्टता वा ऊर्ध्वतमता [उत्कृष्टतमः ऊर्ध्वतमो वा गी.भा. १५.१८] या अंगाला महत्त्व येऊन "पुरुषोत्तम" हा समास तरी होऊ शकला. पुरुषोत्तम म्हणजे पुरुषेषु वा पुरुषाणाम् उत्तमः असा षष्ठी किंवा सप्तमी तत्पुरुष होऊ शकतो. वेगळा हा अर्थ घेताच षष्ठी व सप्तमी विभक्ति व्याकरणदृष्ट्या समर्पक होत नाहीत. तिथे पञ्चमी विभक्ति करावी लागली असती व त्या अर्थाने तो समास कितपत जुळला असता ही शंका आहे. हा सर्व बारकावा काढण्यात उद्देश एवढाच **की उत्तम म्हणताना पूर्वी जरी परमात्म्याला वेगळे करण्याची व्यतिरेक दृष्टि होती तरी ती जाऊन तिच्या स्थानी अन्वयाची दृष्टि हळूच आणण्याची ही भक्तजनांची भूमिका आहे हे आचार्यांना दाखवावयाचे आहे. तात्पर्य, उत्तम पुरुष हा व्यतिरेक अनुभव तर पुरुषोत्तम हा अन्वयानुभव** होय. अर्थात् व्यतिरेकावर आधारलेला अन्वयानुभव पूर्वी जर व्यतिरेकात्मक अनुभव नसेल म्हणजे क्षराक्षराहून तो वेगळा आहे असे पूर्णपणे आकलन झाले नसेल तर; परमात्म्याची क्षराक्षरात राहून-व्यापून - असणारी उत्कृष्टता लक्षात येणार नाही. तो वेगळा म्हणजे वेगळ्या देशकालात राहणारा असा अर्थ अभिप्रेत नसून क्षराक्षरातच काठोकाठ राहणारा पण क्षराक्षराच्या आभासी स्वरूपाने ओळखता न येणारा असा अर्थ, व्यतिरेक अनुभव नसेल तर, येणारच नाही. व्यतिरेक व अन्वय यांचे असे जवळचे नाते आहे. नाण्याच्या दोन बाजू एकमेकाचे स्थान घेऊ शकत नाहीत. परंतु एकावाचून दुसरीला राहता येत नाही हेहि तेवढेच खरे. म्हणून **प्रथम उत्तम पुरुष व नंतर पुरुषोत्तम हाच क्रम महत्त्वाचा समजला पाहिजे.**

दृश्यासि घेता नच घेववे जे ।
दृश्यात राहे अविकारी ते जे ॥

असे श्रीस्वामींनी एका स्तोत्रात श्रीगुरुस्वरूपाचे वर्णन करताना म्हटले आहे. परमात्मा - श्रीगुरु - क्षराक्षराहून वेगळा असून तो क्षराक्षरातील उत्तम पुरुष म्हणून कां मानता येतो, हे त्यावरून स्पष्ट होते.

पंधराव्या अध्यायाचे हे महत्त्व लक्षात घेऊनच श्री स्वामींनी श्रीगुरुचरित्रवर्णनात त्याचा गूढ अक्षरसंचार करून ठेवला.

श्रीदत्तमाहात्म्यात निर्गुण-सगुणाचें ऐक्य दाखविण्याची दृष्टि ठेवून उपनिषदातील अक्षरांची वीण विणली. इथे **गीतोक्त पुरुषोत्तम म्हणजेच श्रीगुरू होत असा भाव पंधराव्या अध्यायाची गुंफण साधून श्रीस्वामींना व्यक्त करायचा आहे.** दत्तसंप्रदाय हा भागवत-संप्रदाय

होय, असे श्रीस्वामींनी एका पत्रात स्पष्ट उल्लेखिले आहे. त्याची इथे आठवण होते. पार्श्वभूमीत सिंहाचे चित्र रेखाटून एखादी पुरुषाकृति काढली म्हणजे न सांगता पुरुष-सिंहाची प्रतिमा मनात साकारते तसे श्रीगुरुचरित्र वर्णन करीत असता पुरुषोत्तमयोगाचा पंधरावा अध्याय देखिल या शैलीने आठवत राहिला म्हणजे दोहोंचा एकभाव मनात बिंबायला कितीसा वेळ लागेल? मूळ गुरुचरित्रातील चाळीसाव्या अध्यायातील कानडी स्तोत्र प्रसिद्ध आहे. त्याचा श्रीस्वामींनी केलेला सप्तशतीगुरुचरित्रातील सरळ मराठी अनुवाद व त्यात गुंफलेली पंधराव्या अध्यायातील "वेदान्त-कृद् वेदविदेव चा [हं]" ही अक्षरे बरोबर वाचून पाहावी म्हणजे दोन प्रवाह एकमेकात खेळवितांना श्रीस्वामींच्या सहज प्रतिभेने दाखविलेली अपूर्वता मनात अधिक भरते. याप्रमाणे सर्वच गीताक्षरांचा सप्तशती चरित्रातील वर्णनाशी असणारा किंवा जाणवणारा अनुबंध अभ्यासकांनी शोधून पाहण्याची आवश्यकता आहे. अक्षर गुंफ करीत असता श्रीस्वामी किती साक्षेपाने अवधान ठेवीत हे सप्तशतीगुरुचरित्राच्या शेवटच्या ओवीवरून लक्षात येईल. इथे गुरुचरित्राला आरती जोडून [जय तत्त्वज्ञान निदान ----- इत्यादि] ग्रंथाचा शेवट केला आहे. शेवट असा -

तार तत्सत् ब्रह्मार्पण ।असो संपूर्णाचरण ।
दृढ धरू तव चरण ।न मला त्वदन्य शरण ॥

गीतेच्या पंधराव्या अध्यायात येणारा शेवटचा चरण आहे -

"कृतकृत्यश्च भारत"

परंतु गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी "ॐ तत्सदिति" असे म्हणून त्या त्या अध्यायाचा नाव वगैरेचा तपशील येतो. श्रीस्वामींची सूक्ष्म दृष्टि ही की "भारत" या पदातील त हे अक्षर अन्तिम मानून चालणार नाही. ॐ तत्सद् हाच खरा पंधराव्या अध्यायाचा अन्तिम घटक मानायला हवा. म्हणून श्रीमहाराजांनी "तार तत्सद्" असा शेवट केला. यातील तिसरे "त" अक्षर ज्याप्रमाणे भारत या पदातील 'त' काराचे प्रतिनिधित्व करते त्याप्रमाणे ते, तत्सद् मधील तकाराचे देखिल प्रतिनिधित्व करते. अर्थात ते तिसरे येण्यासाठी ॐ चा पर्यायवाचक तार शब्द श्रीस्वामींनी ठेवला. श्रीस्वामींची अशी ही अद्‌भुत मंत्र-प्रतिभा ठायी ठायी प्रगट झाली आहे.

माघ-मास माहात्म्यातील मंत्रगर्भता

सप्तशती गुरुचरित्रानंतर महत्त्वाचा मंत्रगर्भ ग्रंथ म्हणजे माघमास माहात्म्य होय. याच्या एकूण तीनशे त्रेचाळीस ओव्या आहेत. यात प्रत्येक ओवीतील पहिले अक्षर वाचले

तर श्रीदत्तमालामंत्र वाचून होतो. श्रीदत्तमाहात्म्य व सप्तशतीगुरुचरित्र या ग्रंथात मंत्राक्षर तिस्या क्रमांकावर येते. येथे मात्र पहिल्या क्रमांकावर. उपनिषदे व गीता या दोन ग्रंथांना प्रतिनिधित्व दिल्यावर श्रीस्वामींची दृष्टि आता तंत्रात्मक असणाऱ्या श्रीदत्तमाला मंत्राकडे वळली आहे. माघमास माहात्म्यात तिलोत्तमा अप्सरा, श्रीकुण्डल- विकुण्डल हे बंधु आणि काञ्चन- मालिनी इ. काही कथा आल्या असल्या तरी प्राधान्याने श्रीदत्त व सहस्रार्जुन यांचा तो संवाद असून त्यात उपदेशावर भर आहे. उपदेशाच्या निमित्ताने वैदिक- समाजाचे एक समग्र सांस्कृतिक जीवन रेखाटलेले इथे पाहायला मिळते. मूर्तिपूजेपासून तर ज्ञानोत्तर भक्तिपर्यन्त जीवनाचे सारे थर इथे आहेत. श्रीदत्तमालामंत्राचा आशय पुष्कळ अंशी कामनिक असला तरी माघमास माहात्म्यात अनायासेच त्याचे सर्वंकष उपदेशात पर्यवसान साधले गेले आहे. याविषयी माघमास माहात्म्याच्या प्रस्तावनेत सविस्तर चर्चा झाली असल्याने इथे त्याची पुनरावृत्ति करीत नाही. हा मंत्र श्रीदत्तपुराणात [तृतीय अष्टक अ. १ श्लोक ५० ते ५७.५] आला असून तो पुढील प्रमाणे आहे -

ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय स्मरणमात्रसंतुष्टाय महामाया
निवारणाय महाज्ञानप्रदाय चिदानन्दात्मने बालोन्मत्तपिशाच —
वेषाय महायोगिने अवधूताय अनसूयानन्दवर्धनाय
अत्रिपुत्राय ॐ भवबन्धविमोचनाय आं असाध्यसाधनाय
ह्रीं सर्वविभूतिदाय क्रौं असाध्याकर्षणाय ऐं
वाक् प्रदाय क्लीं जगत्त्रयवशीकरणाय सौः सर्वमनःक्षोभणाय
श्रीं महासंपत्प्रदाय ग्लौं भूमण्डलाधिपत्यप्रदाय द्रां
चिरंजीविने वषट् वशीकुरु वशीकुरु वौषट् आकर्षय
आकर्षय हुं, विद्वेषय विद्वेषय फट् उच्चाटय उच्चाटय
ठः ठः स्तम्भय स्तम्भय खें खें मारय मारय
नमः संपन्नय संपन्नय स्वाहा पोषय पोषय परमन्त्र-
परयन्त्र- परतन्त्राणि छिन्धि छिन्धि ग्रहान् निवारय
निवारय, व्याधीन् विनाशय विनाशय, दुःखं हर हर,
दारिद्र्यं विद्रावय विद्रावय, देहं पोषय पोषय, चित्तं
तोषय तोषय सर्वमन्त्रस्वरूपाय सर्वयन्त्रस्वरूपाय
सर्वतन्त्रस्वरूपाय सर्वपल्लवस्वरूपाय ॐ नमो महासिद्धाय स्वाहा ।

हा मंत्र फार मोठा व जपादि अनुष्ठानाच्या दृष्टीने सामान्य साधकाच्या आवाक्याच्या

बाहेर आहे. श्रीस्वामींनी तो मात्र माघमाहात्म्यात गुंफून सर्वच साधकाची मोठी सोय करून ठेवली ही त्यांची मोठी कृपाच होय. यात अनेक बीजमंत्रांचा समावेश असल्याने तेही साधारण साधकासाठी सुलभ होऊन गेले आहेत. बीजमंत्र सुद्धा किती सहजपणे गुंफता येतात ते माघमासमाहात्म्यात पाहायला मिळते. ही दोन उदाहरणे पाहा.

"क्रौं" - क्रौंचादि द्वीपे असती ॥माघ मा. १०३ ॥

"ऐं" - ऐंद्रीपासूनी अष्ट दिशा ॥माघ मा. १११ ॥

या व्यतिरिक्त "वौषट्" वषट्, स्वाहा इत्यादि अप्रसिद्ध शब्द सुद्धा ग्रंथाचा ओघ न मोडता कसे गुंफून झाले आहेत ते अभ्यासकाना इथे कळेल.

परंतु यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे रचनाचमत्कृति हे या कृतींच्या मागील प्रयोजन नसून लहान-मोठ्या सर्व साधकांना बरोबर घेऊन चालण्याची कणव हेच येथिल महत्त्वाचे प्रयोजन होय.

श्रीदत्तलीलाब्धिसारातील मंत्रगर्भता

श्रीदत्तलीलाब्धिसार या ग्रंथात मंत्ररचनेचे आणखी एक वेगळेच तंत्र आढळते. इथे ॐ · कार गुंफला आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या एकूण ओव्या एक सहस्र असून त्या दहा लहरीत प्रत्येकी शंभर ओव्या याप्रमाणे विभागल्या आहेत. या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एकूण अक्षरे मोजून ठेवली असून ती संख्या २८००० [अठ्ठावीस सहस्र]इतकी दिली आहे. श्रीदत्तपुराणाची सुद्धा अक्षरे श्रीमहाराजांनी टिपून ठेवली असून ती संख्या एक लक्ष बारा सहस्र इतकी होते.

[सद्वादशसहस्राढ्यलक्षा ११२००० क्षरात्मकं त्विदम्]

श्रोतुर्वक्तुर्दत्तलोकप्रदं तारं पुराणकम् ॥

श्रीदत्तपुराण - शेवट.

अक्षरसंख्या टिपून ठेवण्यात उघडच प्रस्तुत ग्रंथाची श्रुतितुल्यता श्रीमहाराजांना दर्शवावयाची आहे. आपल्याकडे वेदांची अक्षरसंख्या अबाधितपणे टिकून ठेवण्यासाठीच पदक्रम-माला वगैरे विकृतींचे साक्षेपी पठन आतापर्यंत होत आले आहे.

श्रीदत्तलीलामृताब्धिसारात श्रीदत्तपुराण किंवा श्रीदत्तमाहात्म्य यातील कथा संक्षेपाने आल्या आहेत. त्यातील शेवटची ओवी ही -

सानुस्वार जो ओवी या ।एक सहस्र ओविया ।

तया मध्येची ओंवीया ।ॐ · कारात्मा ॥

श्रीदत्त लीला १०.१००

या ओवीचा तेवढा स्पष्ट अर्थ न कळला तरी यात ओंकार गोवला आहे हे काहीसे पुसट कळते. मुद्रित पुस्तकात त्याची त्रोटक सूचना आढळते हे वाचकावर उपकारच होत. ॐ काराची गुंफण करतांना श्रीस्वामींचे विशिष्ट धोरण दिसते. पहिल्या लहरीच्या पहिल्या ओवीत सुस्पष्टपणे ॐ काराचा उल्लेख आढळतो. जसे -

ॐ - कार ज्याचा वाचक ।जगद्धेतू धीप्रेरक ।
तोचि देव सच्चित्सुख ।एक दत्त ॥

श्रीदत्त. - १.१

पुढे दुसऱ्या लहरीपासून मात्र प्रत्येक लहरीत पहिल्या ओवीचे अक्षर अनुक्रमे अ, उ, म असे घेऊन पुनः व्युत्क्रमाने म, उ, अ असे घेण्यात आले आहे. याप्रमाणे ओंकाराची पुढीलप्रमाणे वीण झाली आहे.

[१] - ॐ	[२] अ	[३] उ	[४] म
	[५] म	[६] उ	[७] अ
	[८] अ	[९] उ	[१०] म

याप्रमाणे इथे ॐ काराच्या अक्षरांची क्रमाने दोनदा [२, ३, ४,][८, ९, १०] व व्युत्क्रमाने एकदा [५, ६, ७] आवृत्ति होते. पूर्ण ॐ काराचे पठन पहिल्या लहरीत पहिल्या ओळीत होते हे वर आलेच आहे. असा गुंफ साधण्यात श्रीस्वामींचा काय उद्देश असेल ते तेच जाणोत. परंतु वर उद्धृत केलेल्या शेवटच्या ओवीवरून [सानुस्वार...] श्रीदत्त ॐ कार स्वरूप असल्याने या सहस्र ओव्यात ओंकार विणण्यात आला असे श्रीमहाराजांचे मत दिसते. ओवीच्या पहिल्या चरणात ओवी या ही अक्षरे तर तिसऱ्या चरणात ओंवीया अशी अक्षरे आहेत. त्यावरून असे श्रीस्वामींना सुचवावेसे वाटते की आपण इथे ओंकार विणला आहे.

ओंकाराच्या साऱ्या मात्रा व त्याही क्रमाने व व्युत्क्रमाने घेण्यातहि काही प्रयोजन निश्चित असावे. अकार - उकार- मकार या मात्रांचा जाग्रत्- स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांशी घनिष्ठ म्हणजे एकात्म संबंध आहे असे माण्डूक्योपनिषदात सांगितले आहे. "पादा मात्रा मात्राश्च पादाः" हे मांडूक्योपनिषदातील गूढवचन विश्वातील या तीन अवस्था - जागृति वगैरे- व अकारादि मात्रा यांच्यात काहीच अंतर नाही हे दर्शविते. जाणते लोकच त्या विधानाचा खरा खोल अर्थ जाणोत. परंतु एवढे तर स्पष्ट दिसते की या तीन अवस्थांतून मनुष्यमात्राचा प्रवास प्रत्यही चाललेला असतो. ही एक प्रकारची दैनिक सृष्टि- प्रक्रियाच होय. तिच्या क्रम- व्युत्क्रमाकडे जर जाणीवपूर्वक लक्ष दिले तर अनायासेच बुद्धि स्थूलाकडून

- सूक्ष्माकडे व सूक्ष्माकडून स्थूलाकडे वळू लागते. शारीरभाष्यात विपर्ययाधिकरण नावाचे एक स्वतंत्र अधिकरण असून त्यात ज्या क्रमाने सृष्टि उत्पन्न होते त्याच्या उलट क्रमाने जगाचा विलय होतो असे दाखविले आहे. [शारी. भाष्य. २. ३. १४] तीच दृष्टि घेऊन श्रीमहाराजांनी इथे ओंकाराचा क्रम व व्युत्क्रम दर्शविला आहे. परमात्मा श्रीदत्त अर्थातच या सर्व अवस्थांच्या पलीकडे आहे. त्यालाच मांडूक्यात चतुर्थ व अमात्र असे म्हटले. श्रीदत्तलीलामृताब्धिसारातील शेवटच्या ओवीत "सानुस्वार जो ओवीया" असा उल्लेख येतो तो त्या अन्तिम वस्तुसत्तेचा बोध करून देण्यासाठीच आहे असे दिसते. यावर माझ्यासारख्या अनधिकाऱ्याने अधिक लिहिणे योग्य नव्हे. या श्रीदत्तलीलामृताब्धिसारात फलश्रुति म्हणून ज्या अधिकच्या [एक सहस्राहून वेगळ्या] दहा ओव्या श्रीमहाराजांनी दिल्या आहेत त्यात प्रथमच अशी ओवी येते -

अनधिकारां स्त्री शूद्रा । ॐ - कारी भाविका भद्रा ।
दुष्ट मानी की भक्त्यार्द्रा । हा धर्मांशु ॥ श्रीदत्तलीला फलश्रुति ॥ १ ॥

या ओवीचाहि नीट अर्थ लागत नसला तरी एवढे उघड दिसते की ओंकाराचा अधिकार नसलेल्या स्त्रीशूद्रांना या रीतीने [श्रीदत्तलीलामृताब्धि ग्रंथ पठनाने] ओंकाराच्या उपासनेमध्ये प्रवेश मिळेल व त्यांचे कल्याण होईल. "ओंकारी भाविका भद्रा" या चरणाचा हा अर्थ दिसतो. साधक दुष्ट असो की मानी असो त्याच्या ठिकाणी जर भक्तीचा ओलावा असेल तर त्याच्यासाठी हा ग्रंथ म्हणजे धर्माचा किरण किंवा धर्माचा सूक्ष्मतंतु होय. त्याच्या आधाराने त्यालाहि या ओंकार गुंफून ठेवलेल्या ग्रंथाच्या भरवश्यावर महत्पदाला जाता येईल. "काळावरी मारी पाद लीलेनेची" असे आत्मविश्वासपूर्वक उद्‌गार श्रीमहाराजांनी इथे काढले आहेत. श्रीस्वामींच्या संपूर्ण ग्रंथात इतकी दीर्घ फलश्रुति कुठेही आढळत नाही व एवढा जोरकस उद्‌गारहि कुठे दिसत नाही. ह्या ग्रंथात गुंफल्या गेलेल्या ओंकाराचाहि हा प्रभाव श्रीस्वामींना साधकांच्या कानावर घालायचाच होता असे दिसते.

या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य की यात शेवटच्या लहरीत एकाहत्तर ओवीपासून पुढे पहिल्या ओवीतील पहिले अक्षर घेता - "वासुदेवानंदसरस्वतीमुखे मालवदेशी हा निजलीलासिंधू गुरु वदले" हे वाक्य सिद्ध होते तर तिसऱ्या ओवीतील पहिले अक्षर घेता - "श्रीक्षेत्रामध्ये गोविंदयतीश्वरप्रसादाने अवधूतपदी ज्याचे मन रमले" हे वाक्य सिद्ध होते.

पुढे फलश्रुतीच्या ओव्यांतहि ओवीचे पहिलें अक्षर म्हणजे "अठराशे एकुणवीस शकि " हे वाक्य तर तिसऱ्या ओवीतील पहिले अक्षर म्हणजे "दुष्कालदवतापशान्तये " हे

वाक्य येते. चौथ्या ओवीतील पहिले अक्षर म्हणजे- "हा लीलामृतसिंधू निबंध" - हे वाक्य तर चौथ्या ओवीतील शेवटचे अक्षर म्हणजे - "शुचीमासी शीत [सित] पक्षि होय" - हे वाक्य येते. हा सर्व तपशील इथे देण्याचा उद्देश एवढाच की ओंकारात ओवलेला जो हा ग्रंथ एका बाजूने अनधिकाऱ्यांना सुद्धा महत्पदाला घेऊन जातो [ठसवी जो बोध । खेद न राखी नुरवी भेद ॥][फलश्रुति- २] तोच ऐहिक दृष्टीने दुष्काळाचा वणवा सुद्धा शांत करू शकला ही साक्ष श्रीस्वामींनी नोंदून ठेवली आहे हे सर्वांच्या लक्षात यावे.

येथवर श्रीस्वामींच्या मोठ्या ग्रंथात गुंफलेल्या मंत्रांचा आपण आढावा घेतला. श्रीमहाराजांनी रचलेल्या लहान- मोठ्या स्तोत्रांतील मंत्रांचा आलेख देखिल श्रद्धाशील अभ्यासकांसाठी पुढे देत आहे -

मंत्र अथवा नाममुद्रा	स्तोत्र नाव	चरण	अक्षर	स्तोत्रवृत्त	एकूण श्लोक संख्या
वासुदेवानन्दसरस्वतीकृत	श्रीविनायकस्तोत्र	१/३	पहिले	अनु.	१२
दत्तात्रेयाय विद्महे अवधूताय धीमहि । तन्नो दत्तः प्रचोदयात्		१/३	पाचवे	"	"
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात्		२/४	पहिले	"	"
तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात्		२/४	चौथे	"	"
गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत	समंत्रक गणपति स्तोत्र	१/३	तिसरे	"	१२
आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम्	"	२/४	तिसरे	"	१२
वासुदेवानन्दसरस्वतीकृत श्रीरुद्र- स्तुति	मृत्युंजयमंत्र गर्भित स्तुति	१/३	पहिले	अनु.	१२
ॐ त्रियम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।	"	१/३	तिसरे	"	"

उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।	"	२/४	तिसरे	"	"
विश्वेशं माधवं ढुण्ढि दण्डपाणिं च/भैरवम् ।	विश्वेश्वरादि स्तुति	१/३	चौथे	"	८
वन्दे काशीं गुहां गङ्गां भवानीं मणिकर्णिकाम् ।	"	२/४	तिसरे	"	८
ॐ नमः शिवाय ।	श्रीनागनाथस्तोत्र	१/३	पहिले	इन्द्रवज्रा	३
ॐ नमस्ते अस्तु भगवन् विश्वेश्वराय महादेवाय त्रियम्बकाय त्रिपुरुषाय त्रिपुरान्तकाय त्रिकाग्निकालाय कालाग्निरुद्राय नीलकण्ठाय सर्वेश्वराय सदाशिवाय श्रीमहादेवाय नमः।	श्रीशंकरस्तोत्र	१,२,३,४	पहिले	उपजाति	श्लो. १८
शिव चिदम्बर	श्रीचिदम्बर दीक्षित	१	"	उपजाति	श्लोक ३
श्रीराम जयराम जय जय राम	श्रीरामचन्द्र	१/३	"	उपजाति	श्लो. ८
ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय [मंत्र सहा व सात श्लोकापर्यंत]	"	२/४	"	"	"
ॐ नमो भगवत आञ्जनेयाय महाबलाय स्वाहा	श्रीमारुतिस्तोत्र	१/३	"	अनु.	श्लो. ९
श्रीभगवदवधूतपदकमलभ्रमर वासुदेवानन्दसरस्वती भिक्षुकृतस्तव	श्रीअन्नपूर्णा	१/३	"	अनु.	श्लो. १६
दत्तात्रेयो हरिः कृष्ण उन्मत्तानन्ददायकः मुनिर्दिगम्बरो बालः पिशाचो ज्ञानसागरः।		१/३	चौथे	"	"

ऐं ह्रीं श्रीं क्लीं नमो भगवति माहेश्वरि					
अन्नपूर्णे ममाभिलषितमन्नं					
देहि देहि स्वाहा		२/४	पहिले	"	"
अन्नपूर्णे सदापूर्णे					
शंकरप्राणवल्लभे ज्ञानवैराग्यसिध्यर्थं					
भिक्षां देहि च पार्वति ।		२/४	चौथे	अनु.	श्लो. १६
गङ्गा गङ्गेति यो ब्रूयाद्	गङ्गास्तोत्र	१/३	पहिले	अनु.	श्लोक ८
योजनानां शतैरपि					
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स					
गच्छति		"	२/४	"	"
दत्तात्रेयो हरिः कृष्ण					
उन्मत्तानन्द दायकः		"	१/३	तिसरे	"
मुनिर्दिगम्बरो बालः					
पिशाचो ज्ञानसागरः।			२/४	चौथे	"
वासुदेवानन्दसरस्वती					
विरचित समन्त्रक	सरस्वती				
सरस्वती स्तोत्र	नदी स्तोत्र	१/३	पहिले	उपजाति	श्लोक १२
वासुदेवानन्द	मन्त्रगर्भ				
सरस्वतीरेवास्तुति	श्री नर्मदास्तोत्र	१/३	पहिले	अनु.	श्लोक ९
				[मन्त्रगुंफ ८ श्लोकापर्यंत]	
नर्मदायै नमः प्रातर्नर्मदायै					
नमो निशि	"	१/३	चौथे	"	
नमोऽस्तु नर्मदे तुभ्यं					
त्राहि मां विषसर्पतः		२/४	"	"	
अनसूयात्रिसंभूत					
दत्तात्रेय दिगम्बर		२/४	पहिले	"	
वेत्रवतीस्तुति	श्रीवेत्रवतीस्तुति	१/३	"	अनु.	
गुरुदेव दत्त	"	२/४	पहिले		श्लो. ३

अयोध्या मथुरा माया	नृसिंहवाटिकान्वित				
काशी कांची अवन्तिका	सप्तपुरी स्तोत्र	१/३	पहिले	अनु.	श्लो. ९
पुरी द्वारवती चैव					
सप्तैता मोक्षदायकाः	"	२/४	दुसरे		

श्रीस्वामींच्या नांवावर आज उपलब्ध असलेल्या स्तोत्रसंग्रहातील गुंफलेल्या मंत्रांचा हा आलेख आहे. श्रीमहाराजांचा यतिजीवनातील साधारणपणे चोवीस वर्षांचा अखण्ड संचाराचा कालावधि लक्षात घेतला तर अशा अनेक रचना असू शकतात. त्या सर्वांची नोंद झालीच असेल असे निश्चयाने म्हणवत नाही. पण उपलब्ध स्तोत्रात गुंफलेल्या मंत्राकडे एक दृष्टि टाकली तरी केवढे वैचित्र्य आढळून येते. यात गणानां त्वा, त्रियम्बकं यजामहे, यासारखे श्रुत्युक्त आवाहन मंत्र, दत्तात्रेयाय विद्महे, एकदन्ताय विद्महे, तत्पुरुषाय विद्महे यासारखे— श्रीदत्त-गणपती-महादेव या देवांचे प्रसिद्ध गायत्रीमन्त्र, दत्तात्रेयो हरिः कृष्ण यासारखे श्रीदत्तात्रेयाचे ध्यानमंत्र, ॐ नमस्ते अस्तु भगवन् विश्वेश्वराय, ऐं, ऱ्हीं, श्रीं, क्लीं यासारखे महामंत्र, नर्मदायै नमः प्रातः, विश्वेशं माधवं ढुण्ढि, अयोध्या- मथुरा यासारखे नित्यपठनातील स्मारक श्लोक, ॐ नमः शिवाय यासारखा लहानसा षडक्षरी सिद्ध मंत्र, श्रीराम जय राम जय जय राम यासारखा महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला वरद मंत्र, गुरुदेव दत्त, शिव चिदम्बर हे सुलभ नाम-मंत्र त्या त्या स्तोत्रात आपली उपस्थिति लावत आहेत हे दिसून येते. मंत्र गुंफण्याचा श्रीस्वामींचा अधिकार अभूतपूर्व होता हे या तालिकेवरून कुणाच्याहि सहज लक्षात येईल. एका विनायक स्तोत्राचे उदाहरण पुढे ठेवले तरी ही गोष्ट मनात भरते. **एकाच स्तोत्रात विनायक, दत्त व महादेव यांचे गायत्रीमंत्र व तेहि रचनाकाराच्या नाममुद्रेसह ओवून दाखविणे हे काम कल्पनाशक्तीच्या बाहेरचे आहे.** कारण इथे देवतेच्या गुणवर्णनाला जराही क्षति न पोचू देता हे सारे करायचे असते. काही स्तोत्रात तर श्रीमहाराजांनी देवतेचे समग्र जीवन-चित्रण आपल्यापुढे प्रभावीपणे सादर केले आहे. या संदर्भात दोन स्तोत्रांकडे दोन दृष्टीने अंगुलि-निर्देश करावासा वाटतो. एक मारुतिस्तोत्र व दुसरे समन्त्रक श्रीनर्मदास्तोत्र. श्रीमारुतिस्तोत्रातील हे पुढील चार श्लोक.

ॐ नमो वायुपुत्राय भीमरूपाय धीमते ।
नमस्ते रामदूताय कामरूपाय श्रीमते ॥ १ ॥
मोहशोक-विनाशाय सीता शोक-विनाशिने ।
भग्नाशोकवनायास्तु दग्धलङ्काय वाग्मिने ॥ २ ॥

गतिनिर्जितवाताय लक्ष्मणप्राणदाय च ।
वनौकसां वरिष्ठाय वशिने वनवासिने ॥ ३ ॥
तत्त्वज्ञानसुधासिन्धुनिमग्नाय महीयसे ।
आञ्जनेयाय शूराय सुग्रीवसचिवाय ते ॥ ४ ॥

श्रीमारुतिस्तोत्रातील या पहिल्या चार श्लोकात श्रीस्वामींनी रामायणातील मारुतिरायाची समग्र प्रतिमाच अचूकपणे टिपली आहे असे दिसेल. यातील चतुर्थी-विभक्तीतील प्रत्येक विशेषण मारुतिरायाच्या एकेक वैशिष्ट्याचे चित्रण करीत आहे. **वायुपुत्र** व **आञ्जनेय** हे त्यांचा कुलवृत्तान्त सांगतात. **भीमरूप, कामरूप, वशी, शूर, गतिनिर्जितवात, धीमत्, श्रीमत्, वाग्मी** हे त्यांचे स्वरूप वैशिष्ट्य व गुणवैशिष्ट्य यांचा निर्देश करीत आहेत. **सुग्रीवसचिव, रामदूत, सीताशोक-विनाशी, दग्धलङ्क, भग्नाशोकवन** व **लक्ष्मणप्राणद** हे त्यांच्या रामायणातील कामगिरीचा परिचय करून देत आहेत. **वनौकस्-वरिष्ठ** [अरण्य हे ज्यांचे स्थान आहे अशा प्राण्यामध्ये वरिष्ठ] हे विशेषण व **वनवासी** हे विशेषण तसे समानार्थक दिसते खरे व त्यातून मारुतिरायांच्या निवासस्थानाचाच केवळ बोध होतो असे वाटते. परंतु थोडा विचार करता त्यात श्रीस्वामींना अधिक काही सुचवावयाचे असावे असा एक विचार मनात येतो. कारण एकदा "वनौकस्-वरिष्ठ" म्हणून माहिती दिल्यानंतर पुनः वनवासी शब्द त्याच अर्थाने वापरण्यात फारसे स्वारस्य नाही. त्या अर्थाने तो श्रीस्वामींनी वापरलेला देखिल नाही. तो शब्द वेगळ्या कार्य-कारण भावाचा द्योतक म्हणून श्रीस्वामींना हवा आहे. श्रीमारुतिराय हे तत्त्वज्ञान महा-सिन्धु-निमग्न - आत्मतत्त्वज्ञानाच्या महासागरात पूर्णपणे अवगाहन करणारे आहेत असे, "वनवासिने" हे विशेषण सांगून झाले की, वशिने [जितेन्द्रिय] वनवासिने ही दोन विशेषणे [संस्कृत-व्याकरणाच्या दृष्टीने ही दोन्ही इन् प्रत्ययान्त विशेषणे आहेत म्हणून त्यांची जोडी देखिल इथे चांगली शोभून दिसते] मारुतिरायाच्या तत्त्वज्ञानसागरातील अवगाहनाचे मर्म सांगत आहेत. **जितेन्द्रियता व वनवास शब्दाने सुचविली जाणारी एकान्तप्रियता असल्यावाचून आत्मानन्दाच्या सागराच्या तळाशी पोचता येत नाही, हे सुचविण्यासाठीच ही दोन विशेषणे श्रीस्वामींनी अगदी योग्य स्थळी इथे घालून ठेवली आहेत.** "वनवासिने" हे विशेषण याप्रमाणे स्थळ-निदर्शक विशेषण [वनौकस्-वरिष्ठ या विशेषणासारखे] नसून ते मारुतिरायांच्या ब्रह्म ज्ञान-पारंगततेचे रहस्य सांगणारे विशेषण आहे. मारुतिरायांचे हेच अंतरंगस्वरूप होय. त्यामुळे ते महीयस्-अधिक मोठे आहेत. वशिने-वनवासिने, तत्त्वज्ञानमहासिन्धुनिमग्नाय महीयसे क्रमाने येणारी ही

मारुति स्तोत्रातील विशेषणे मारुतिरायाच्या अंतरंग जीवनातील चढता आलेख दर्शवितात. **एकीकडे मंत्राक्षराची वीण करीत असता दुसरीकडे सखोल आशयाची मांडणी सुद्धा तितक्याच सहजतेने श्रीस्वामींची लेखणी कशी करीत असते ते या उदाहरणाने स्पष्ट व्हावे.** मंत्र गुंफनाच्या विषयात सुद्धा प्रस्तुत मारुतिस्तोत्रात एक आगळेपण साधले गेले आहे. श्रीज्ञानेश्वरीचा आरंभ ज्याप्रमाणे "ॐ नमो" या पदसमुच्चयाने होतो तसे इथे झाले आहे. तसे ॐ न मो ही अक्षरे नेहमीच्या तंत्रानुसार प्रत्येक श्लोकाच्या आरंभी पहिले अक्षर म्हणून येतात. परंतु त्यावर समाधान न मानता सुस्पष्टपणे वरील अक्षरे पहिल्याच श्लोकात पहिल्या चरणात घातली आहेत. तंतु जसे उभे व आडवे अशा दोन्ही तऱ्हेने विणावेत तसा हा प्रकार.

ॐ नमो वायु . . .

मोहशोक

मन्त्रगर्भ नर्मदास्तुती व तात्त्विक आशयाची घडण

मन्त्रगर्भ नर्मदास्तुतीचा देखिल या दृष्टीने अभ्यास करता येण्यासारखा आहे. "वासुदेवानन्दसरस्वतीकृतरेवास्तुति" "नर्मदायै नमः प्रातर्नर्मदायै नमो निशि । नमोस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि मां विषसर्पत ।" "अनसूयात्रिसंभूत दत्तात्रेय दिगम्बर ।" इतकी वाक्ये यात [आठ अनुष्टुभ् - श्लोकात] गुंफली आहेत हे मागे दिले आहे. इथे या स्तोत्रात आलेल्या काही भावगर्भ विशेषणांचाच तेवढा विचार करायचा आहे. **उद्देश हा की ही विशेषणमालिका जोडून जर नर्मदामाईचे नर्मदा-लहरीतील व्यक्तिचित्र न्याहाळले तर ते अधिक सर्वांगपूर्ण होईल. नर्मदा-लहरीतील व नर्मदा स्तुतीतील शेवटचा श्लोक एकच ठेवण्यात श्रीस्वामींचा तोच भाव असावा.** हाच तो पुढील श्लोक -

जय जय शिवकन्ये नर्मदे शर्मदे त्वम् ।
जय जय जनमान्ये धर्मदेऽधर्मदे त्वम् ।
जय जय सुवदान्ये धर्मदे कर्मदे त्वम् ।
जय जय भुवि धन्ये भर्मदे वर्मदे त्वम् ।

नर्मदा स्तोत्र ९

नर्मदा लहरी - पुष्पिका ३

त्रिधा-कर्म-विशुद्धये- (३) **कायिक-वाचिक-मानसिक दोष दूर सारणारी त्रेधा धर्माङ्ग मूर्तये,** (६) श्रुति- स्मृति- पुराणोक्त धर्माची प्रत्यक्ष मूर्ति **तपोदायै, तपः सिद्ध्यै,** (६) तप देणारी (घडविणारी) तपाचे फल देणारी **यज्ञाङ्ग्यै,** (६) **वासनामोक्षदक्षायै,** (७) **यज्ञांग**

असणारी, वासनेतून सुटका करून देण्यास तत्पर, **दयादमस्थैर्यकर्त्र्यै**, (३) दया- दम या गुणांना दृढमूल करणारी **तितिक्षुशिवसंधात्र्यै**, ८) तितिक्षासंपन्न लोकांचे कल्याण संपादणारी **षड्द्विषद्धृते**, (७) षडरिपूंचे हरण करणारी.

साधकांना अंतिम उद्दिष्टाप्रत घेऊन जाण्यासाठी नर्मदामाई किती कष्ट घेण्यासाठी तत्पर आहे याचा सुंदर आलेख वरील विशेषणांनी चितारला आहे. नर्मदा श्रुति- स्मृति- पुराणोक्त सर्व धर्मांची प्रत्यक्ष मूर्ति असल्याने या सर्व अनुष्ठानाचे फळ नर्मदेच्या सेवनाने मिळते. त्यामुळे कायिक- वाचिक- मानसिक दोषांपासून ती साधकाची मुक्तता करते. तपाचे फळ देणारी व तपानुष्ठान घडविणारी ती आहे. रेवातीरे तपः कुर्यात् हे वचन प्रसिद्ध आहे. २ त्याचा परिणाम म्हणून दया दम वगैरे सद्गुणांना स्थैर्य लाभते. काम- क्रोध- लोभ- मोह- मद- मत्सर या षडरिपूंना नर्मदामाई उखडून फेकते. तितिक्षूला कल्याण मिळवून देते. याचा अर्थ तितिक्षेचा तिच्या सान्निध्यात अभ्यास होतो हा आहे. श्री शंकराचार्यांनी ऐतरेयोपनिषदात मोक्षतीराचे वर्णन करीत असता तेथिल ज्ञानाची नाव सत्य- ऋजुता- दान- दया- अहिंसा- शम- दम- धृति या आत्मगुणरूपी पाथेयाने पूर्ण असते, असे म्हटले आहे. **सत्यार्जवदान - दयाऽहिंसा- शम- दम- धृत्यात्मगुणपाथेयपूर्णज्ञानोडुपे** - [ऐत. शां. भा. १ - २ - १] त्या सर्व आत्मगुणाचा संचय नर्मदेच्या सेवेने हाती येतो. हे सारे आत्मगुण [दया- दम शब्दाने सर्वच आत्मगुणांचा बोध व्हायला प्रत्यवाय असू नये.] ही नर्मदा माईनी साधकांना दिलेली देणगी होय.

नर्मदामाईच्या गळ्यातील गुणमालिकेचा हा दुसरा उजवा सर -

सूक्ष्म वस्तु - दृशे	[२]	सूक्ष्म वस्तु पाहण्याचे सामर्थ्य देणारी
सत्यसंप्राप्तिकारिण्यै	[४]	सत्याची प्राप्ति करून देणारी
पुंमोहसंहृते	[१]	मनुष्याचा मोह घालविणारी
वाक्यार्थायै	[२]	महावाक्याचा साक्षात् अर्थरूप असणारी
तत्त्वरूपिण्यै	[४]	परमार्थवस्तु स्वरूप असणारी
चेतःसमाधये	[८]	अन्तःकरणाचा विलयस्थान असणारी
रम्यायै	[४]	सुन्दर असणारी
दिव्यायै	[७]	दिव्य रूप असणारी
रत्यै	[८]	आत्म- प्रेमरूप असणारी
नन्दायै	[३]	आनन्द- स्वरूप असणारी.

आत्मगुणांचे संपादन नर्मदामाईंच्या कृपेने पूर्ण झाले की तिच्या गुणांचा हा दुसरा आविष्कार प्रत्ययाला येतो. ती सूक्ष्मवस्तूचे दर्शन- सामर्थ्य देते. सत्याची प्राप्ति करून देते.

सत्यदर्शनाने पुरुषाच्या मनातील मोह [आजवरच्या असत्य- दर्शनाने उद्‌भवलेला मोह] दूर होतो. नर्मदामाई सत्याचे दर्शन करून देते याचा अर्थ सत्य हे काही वेगळे वास्तव आहे असा नसून नर्मदामाईचे अन्तःस्वरूप हेच परम सत्य होय. म्हणूनच श्रीस्वामी तिला तत्त्वरूपिणी व वाक्यार्थरूप म्हणतात. ॐ ', तत् व सत् असा परब्रह्माचा तीन तऱ्हेने निर्देश होत असतो असे श्रीमद्‌भगवद्‌गीतेत म्हटले आहे. त्याला धरून तत्+त्व म्हणजे ब्रह्मस्वरूप असा अर्थ निघतो. नर्मदामाई तत्त्वरूप आहे याचा अर्थ ती परब्रह्मरूप आहे असा होतो. वाक्य म्हणजे महावाक्य. महावाक्यामधील [**प्रज्ञानं ब्रह्म, अयमात्मा ब्रह्म, तत्त्वमसि** व **अहं ब्रह्मास्मि** ही चार महावाक्ये] "तत् त्वम् असि" - ते तू आहेस - ते ब्रह्म तू आहेस - हे महावाक्य इथे प्रामुख्याने अभिप्रेत आहे. या महावाक्यात साधक जरी अल्पज्ञ व अल्पशक्ति असला व सर्वज्ञ सर्वशक्ति परमेश्वराहून तो वेगळा वाटत असला तरी तो परमेश्वराशी अखण्ड एकरूप असतो, त्या दोहोत फूट पाडणारी अल्पज्ञ व सर्वज्ञ ही विशेषणेच आगन्तुक होत, असे प्रतिपादित केलेले असते. नर्मदामाई तत्त्वरूप आहे **या विधानाचे आता दोन अर्थ करता येतात. ती परब्रह्मरूप हा एक अर्थ व ती वाक्यार्थरूप म्हणजे "तत्त्वमसि" या महावाक्याचा साक्षात् अर्थ आहे हा दुसरा अर्थ.** हे दोन अर्थ वेगळे मानण्याचे कारण नाही. एकात वस्तूचा निर्देश अभिप्रेत आहे तर दुसऱ्यात आपले त्या वस्तूशी एकतेचे अनुभवाला येणारे नाते अभिप्रेत असते. इतर वाक्यात व तत्त्वमसि महावाक्यात हेच अंतर आहे. इतर वाक्यात वस्तूचा तिऱ्हाइती उल्लेख असतो. तो तिऱ्हाइती भाव तत्त्वमसि महावाक्यात नाहीसा होतो. नर्मदा माई परब्रह्मरूप आहे एवढे सामान्य तिऱ्हाइती ज्ञान आता समाप्त होऊन माझे तिच्याशी ऐक्याचे नाते आहे असा साक्षात्कार तत्त्वमसि महावाक्याने होतो. एकदा तिऱ्हाइती भाव संपला की **वस्तूचे ज्ञान हे वस्तूचे ज्ञान म्हणून उरत नाही ते वस्तूचे प्रेम म्हणून प्रत्ययाला येते.** म्हणूनच तिथे मनाची समाधी- विलय होऊ लागते. त्या प्रत्ययाचे स्वरूप श्रीस्वामींनी **रम्य, रति, दिव्य** व **नन्द** या चार विशेषणांनी दर्शविले आहे. नर्मदामाईचे स्वरूप रम्य- रमणीय असले तरी कोणत्याहि पार्थिव सौदर्याशी त्याची तुलना करता येत नाही हे दाखविण्यासाठी दिव्य शब्द आला आहे. ती रतिरूप आहे याचा देखिल अर्थ तोच आहे. रति व क्रीडा या दोहोत अंतर सांगताना आचार्य म्हणतात क्रीडा बाह्यसाधनापेक्षा । रतिस्तु साधन- निरपेक्षा बाह्य विषयप्रीतिमात्रमिति विशेषः।

[मुण्डक.शां.भा. ३-१-४]

क्रीडा ही बाह्य उपकरणांना धरून होत असते. रतीमध्ये त्याची अपेक्षा नसते. त्याविषयी सामान्य प्रेमभाव असतो. क्रीडा रतीमधील हे अंतर लक्षात घेऊन येथिल रति

शब्दाचा अर्थ लक्षात घ्यायचा आहे. नर्मदामाई रति-रूप आहे याचा अर्थ ती निखळ आत्मप्रेमरूप आहे. तिथे कोणताहि बाह्यभाव नाही व त्याची अपेक्षा नाही. परंतु प्रेम करण्यासाठी किमान आवश्यक असलेला बाह्यभावाचा आभास असू शकतो. अशा आभासी बाह्यभावाने जिच्याविषयी आत्म-प्रेम अनुभवास येते अशी ती शुद्ध रति-रूप, शुद्ध प्रेम रूप आहे. तिलाच श्रीस्वामींनी "नन्दा" म्हणजे आनन्दा-अर्थात आनन्दस्वरूप म्हटले आहे. शब्दाचे रूप संक्षिप्त करण्याची प्रवृत्ति प्रादेशिक भाषामध्येच असते असे नाही. संस्कृतातहि ती आहे हे आचार्यांनी सत्यभामा - "भामा" या शब्दाच्या उदाहरणाने दाखविले आहे. येथील नन्द शब्ददेखिल तसेच आनन्द शब्दाचे संक्षिप्त रूप होय. **नर्मदामाई या प्रमाणे प्रेमरूप व आनन्दरूप आहे.**

नर्मदास्तुतीमध्ये नर्मदेची चाळीसावर विशेषणे केवळ आठ श्लोकात श्रीस्वामींनी घातली आहेत. त्यातील साधारणपणे निम्म्या विशेषणांचाच वर्गीकरण करून इथे विचार केला. इतर विशेषणे यापैकी कोणत्यातरी एका वर्गात घालून अभ्यासकांना विचार करता येईल.

याप्रमाणे मंत्रगर्भ नर्मदास्तुतीत चित्रित केलेले नर्मदामाईचे रूप पाहूनच पुढे नर्मदालहरी भाविकाने वाचायला हातात घ्यावी. संस्कृतात कधी कधी एका श्लोकात अन्वय पूर्ण होत नाही. त्यासाठी दोन तीन किंवा पाच श्लोकापर्यंत पोचावे लागते. इथे सुद्धा तसेच काहीसे मानावे. नर्मदामाईची समग्र-मूर्ति नर्मदा-स्तुति व नर्मदालहरी या दोन काव्यांमिळून साकारते असेच श्रीस्वामींना अभिप्रेत दिसते. "जय जय शिव कन्ये" हा जयजयकार दोन्ही स्तोत्रात एकच ठेवण्यात याहून दुसरी कोणती भूमिका असू शकेल?

- नर्मदाष्टक -

[नर्मदालहरी व नर्मदा स्तुति या प.प. श्री वासुदेवानन्द-सरस्वतीकृत स्तोत्राबरोबरच श्रीमच्छंकराचार्य-विरचित नर्मदाष्टक सुद्धा इथे जोडण्यात येत आहे. आचार्यांच्या सर्वच स्तोत्राप्रमाणे प्रस्तुत नर्मदाष्टक सुद्धा भाविकांच्या जगात अत्यंत प्रसिद्ध आहे.

स्तोत्राचा अर्थ म.म. श्री पांडुरंगशास्त्री गोस्वामी यांनी दिलेल्या अनुवादाच्या आधाराने पण संक्षेपाने दिलेला इथे आढळेल.]

श्रीशंकराचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती महाराजांना श्रीदत्ताच्या ठायी होते हे

तं वासुदेवदण्ड्यहमत्रिजमिव वन्दे

[त्या श्रीशंकराचार्यांना श्रीदत्ताप्रमाणे मी वन्दन करीत आहे.]

[श्रीशंकराचार्यांची श्रीटेंब्येस्वामिकृत आरती]

या उद्गारावरून कळून येईल. नर्मदा-लहरी व नर्मदास्तुति बरोबर नर्मदाष्टक जोडण्यात येत आहे ते त्यादृष्टीने.

श्रीशंकराचार्य-विरचित नर्मदाष्टक

सबिन्दु-सिन्धु-सुस्खलत्तरङ्गभङ्गरञ्जितं ।
द्विषत्सु पापजात-जातकारि-वारिसंयुतम् ।
कृतान्तदूत-कालभूत-भीतिहारि वर्मदे ।
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ १ ॥

हे देवि नर्मदे, अभयरूपी कवच पुरविणाऱ्या, कारंज्याप्रमाणे ज्याच्यातून तुषार उडत आहेत अशा, सागराकडे जाताना धबधब्यांचे वळण घेतल्याने उसळणाऱ्या असंख्य तरंगांनी सुशोभित, शत्रूप्रमाणे छळणारी जी अनेक पापे त्यांचा समूळ उच्छेद करणाऱ्या पाण्याने युक्त, आणि यमदूताप्रमाणे भय निर्माण करणाऱ्या भूत-प्रेत पिशाचादिकांचे भय निवारण करणारे, जे तुझे चरण कमल, त्याला मी वन्दन करतो.

* * *

त्वदम्बुलीन दीन-मीन-दिव्य संप्रदायकं ।
कलौ मलौघभारहारि सर्वतीर्थनायकम् ।
सुमत्स्य-कच्छ-नक्र-चक्र-चक्रवाकशर्मदे ।
त्वदीय पादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ २ ॥

देवि नर्मदे, आपल्या (तुझ्या) प्रवाहात विसावणाऱ्या अत्यंत दयनीय माश्यांना स्वर्गीय सुख मिळवून देणारे, या कलियुगात पापांच्या लोंढ्यांचा भार हरण करणारे सर्वतीर्थात श्रेष्ठ असणारे असे जे तुझे चरणकमल त्याला; तुझ्या प्रवाहातील मत्स्य, कासव, मगर इत्यादींचे समुदाय तसेच चक्रवाकासारखे पक्षी यांना सुख देणाऱ्या नर्मदे, मी वन्दन करतो.

* * *

महागभीर-नीर-पूर-पात-धूत-भूतलं ।
नमत्समस्तपातकारि दारितापदाचलम् ।
जगल्लये महाभये मृकण्डु-सूनु-हर्म्यदे ।
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ३ ॥

आपल्या अत्यंत खोल असणाऱ्या प्रवाह-पूराने सर्व भूतल पावन करणारे, वन्दनशील भक्तांच्या सर्व पातकांचे निखंदन करणारे, सर्व आपत्तींचे डोंगर फोडून काढणारे, जे तुझे

चरणकमल त्याला, महाभयंकर प्रलयाच्या प्रसंगी मार्कंडेय ऋषीला निवास देणाऱ्या नर्मदे, मी वन्दन करतो.

* * *

गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा ।
मृकण्डु- सूनु- शौनकासुरारि सेवितं सदा ।
पुनर्भवाब्धिजन्मजं भवाब्धिदुःखवर्मदे ।
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ४ ॥

मार्कण्डेय, शौनक व सारे देवगण यांनी नित्य ज्याचा आश्रय घेतला असा तुझा प्रवाह जेव्हा दृष्टीस पडला तेव्हाच भवसागरात पुनः जन्म घेण्याची भीती उरली नाही. भवसागराच्या दुःखापासून मुक्त करणारे कवच पुरविणाऱ्या नर्मदे, तुझ्या चरणकमलाला वन्दन करतो.

* * *

अलक्ष- लक्ष- किन्नरामरासुरादिपूजितं।
सुलक्ष- नीर- तीर- धीर- पक्षि- लक्ष कूजितम् ।
वसिष्ठ- शिष्ट- पिप्पलादि- कर्दमादि- शर्मदे।
त्वदीय- पाद- पङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ५ ॥

अदृश्यपणे वावरणाऱ्या लक्षावधि किन्नर- देव व दैत्य- राक्षस आदि जीवांनी आदरिलेले, सुन्दर प्रवाहाने मंडित असणाऱ्या तुझ्या तीरावर स्वैरपणे विहार करणाऱ्या पक्ष्यांच्या कलरवाने निनादलेले, असे जे तुझे चरणकमल त्याला वसिष्ठ, आणि ज्ञानी तपस्वी म्हणून मान्यता पावलेल्या पिप्पल प्रभृति व कर्दम- प्रभृति ऋषींना आनंद देणाऱ्या देवि नर्मदे मी वन्दन करीत आहे.

* * *

सनत्कुमार- नाचिकेत- कश्यपादिषट्पदै -
धृतं स्वकीयमानसेषु नारदादिषट्पदैः ।
रवीन्दु- रन्तिदेव- देवराज- कर्म- शर्मदे
त्वदीय- पाद- पङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ६ ॥

सनक- सनन्दन, सनातन व सनत्कुमार, तसेच नाचिकेत - कश्यप आदि ऋषि त्याचप्रमाणे देवर्षि नारदासारखे थोर अधिकारी यांनी भुंग्याच्या ओढीने ज्याला आपल्या

मनात साठविले असे जे तुझे चरणकमल त्याला सूर्य- चन्द्र- रन्तिदेव व इन्द्र यांना त्यांच्या तपाचरणाने सुख देणाऱ्या देवि नर्मदे, मी वन्दन करीत आहे.

* * *

अलक्ष- लक्ष- लक्ष- पाप- लक्ष- सार- सायुधं ।
ततस्तु जीवजन्तु - तन्तु- भुक्ति- मुक्ति दायकम् ।
विरिञ्चि- विष्णु- शंकर- स्वकीय- धाम- वर्मदे ।
त्वदीय- पाद- पङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ७ ॥

कळून न येणाऱ्या अगणित पापाचे निरसन करण्यासाठी वज्रायुध धारण करणारे, [नर्मदा देवीच्या पदकमलावर वज्र- अङ्कुश इत्यादि दिव्य चिन्हे आहेत] व त्यामुळे असंख्य जीवांना [जीव- परंपरांना] भोग- मोक्ष देणारे, जे तुझे चरण- कमल त्याला, ब्रह्मदेव- विष्णु- शंकर यांची धामे [ब्रह्मलोक, वैकुण्ठ व कैलास] तसेच स्वतःचे सच्चिदानंद धाम समर्पण करून भक्तांना सर्व संरक्षक कवच पुरविणाऱ्या देवि नर्मदे, मी वन्दन करीत आहे.

* * *

अहो मृतं स्वनं श्रुतं महेश- केशजातटे ।
किरात- सूत- वाडवेषु पण्डिते शठे नटे ।
दुरन्त- पाप- ताप- हारि सर्वजन्तु- शर्मदे ।
त्वदीय- पाद- पङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ८ ॥

किती भाग्यशाली हे मरण की श्रीशंकराच्या केसापासून निर्माण झालेल्या नर्मदेच्या तीरावर प्रवाहाचा मञ्जुळ ध्वनि ऐकत असता हे प्राप्त व्हावे !! भिल्ल जातीचा, संकर जातीचा अथवा ब्राह्मण जातीचा, पंडित असणारा, नट असणारा लुच्चा असणारा जीव असला तरी त्याचे दुर्धर पाप आणि दुःख हरण करणारे जे तुझे चरणकमल त्याला, सर्व प्राण्यांना कल्याणप्रदान करणाऱ्या देवि नर्मदे मी वन्दन करीत आहे.

* * *

इदं तु नर्मदाष्टकं त्रिकालमेव ये सदा ।
पठन्ति ते निरन्तरं न यान्ति दुर्गतिं कदा ।
सुलभ्य देव- दुर्लभं महेश- धाम गौरवं ।
पुनर्भवा नरा न वै विलोकयन्ति रौरवम् ॥ ९ ॥

हे नर्मदाष्टक जे नेमाने त्रिकाळी निरन्तर वाचतात ते केव्हाहि दुर्गतीला प्राप्त होत नाहीत. देवांना दुर्लभ असणारे कैलास- निवासाचे गौरव त्यांना प्राप्त झाल्याने पुनः संसारात पडून रौरव नरक असे पुरुष पाहत नाहीत.

श्रीरंग -अवधूत- महाराज कृत रेवा-गीत

[श्रीरंग- अवधूत- महाराज हे श्रीवासुदेवानन्द सरस्वती- स्वामि महाराजांचे परमशिष्य. गुजराथ प्रांतात आज जो श्रीदत्त- भक्तीचा प्रचार- प्रसार दिसतो तो श्रीरंग- महाराजांचा महिमा- श्री टेंब्ये स्वामिमहाराजांनी गुजराथ राज्यात रुजविलेल्या श्रीदत्तभक्तीच्या अंकुराचा श्रीरंग- महाराजांनी विशाल- वृक्ष करून दाखविला.

नर्मदा- लहरी व नर्मदास्तुति या दोन रचनांसमवेत रेवागीत जोडण्यात एक औचित्य जाणवेल. एका बाजूने श्री टेंब्ये स्वामिमहाराजांचे परमगुरू श्रीशंकराचार्य यांनी रचलेले नर्मदाष्टक तर दुसऱ्या बाजूने श्री टेंब्ये स्वामिमहाराजांचे शिष्य श्रीरंग- महाराज यांनी रचलेले रेवा- गीत या दोहोमध्ये मध्य- मण्यासारखी असलेली नर्मदा- लहरी व नर्मदास्तुति ही दोन स्तोत्रे भाविकांना आवडतील अशी अपेक्षा आहे.]

* * *

रेवा - गीतम्

गायति रेवा रवमधुरम् ॥ ध्रु. ॥
हर हर ॐ ॐ हर हर ॐ ॐ
हर हर ॐ ॐ हर हर ॐ ॐ
सायं प्रातः प्रातः सायं हर हर ॐ ॐ सततमिति ।
॥ गायति ॥ १ ॥

मेकलजाता मनसि विधाता,
रौति कलं किमपीह चिरम् ।
त्वमहमहं त्वं त्वमहमहं त्वं,
त्वमहमहं त्वं त्वमहमिति ॥
॥ गायति ॥ २ ॥

तडिदुज्ज्वलजलमुखतः स्तौति -
नीरङ्गं नानारङ्गम् ।
ब्रह्माहं त्वं ब्रह्मैवेदं जलशीकरवदभिन्नमिति ।
॥ गायति ॥ ३ ॥

□ □ □

परिशिष्ट

डॉ. अरुणोदय जानी, बडोदा

मूळ गुजराथीवरून अनुवाद

अनुवादिका - डॉ. हर्षिदा दवे, नागपूर

[श्लोक क्र. १] या श्लोकाला मङ्गलाचरण मानून 'स्तोत्रादिसंग्रहात' (श्री वासुदेवानन्द सरस्वती ग्रंथमाला पुष्प- २) क्रमाङ्क दिला नाही. नारेश्वर येथून प्रकाशित झालेल्या 'श्रीनर्मदाष्टपदी'त मात्र या श्लोकाला प्रथम क्रमाङ्क दिला आहे.

या श्लोकाचा आधार -

नर्मदायै नमः प्रातर्नर्मदायै नमो निशि ।
नमोऽस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि मां शरणागतम् ॥
चौथ्या चरणातील पाठभेद - "त्राहि मां भवसागरात् ।"

[श्लोक क्र. २] या श्लोकात नर्मदेचा भीमसेनाशी झालेल्या विवाहाचा निर्देश केला आहे. नर्मदा पुराणात अध्याय ८८ मध्ये ही कथा थोडक्यात सांगितली आहे. ती पुढील प्रमाणे :-

एकदा कैलास पर्वतावर इन्द्र इत्यादि दिक्‌पाल भगवान शंकराच्या पूजा- अर्चनेसाठी गोळा झाले. नद्या अप्सरा देखील तेथे जमल्या. त्यावेळी भगवान् शंकराच्या उजव्या बाजूला उभ्या असलेल्या सुंदर नर्मदेला पाहून अग्नी कामातुर झाला. त्याने तिच्यावर वाईट दृष्टि टाकली. भगवान शंकराने ते पाहिले. त्यांनी अग्नीला शाप दिला 'तू स्वर्गात राहण्यास पात्र नाहीस म्हणून तू मनुष्य योनीत जा.'

शापवाणी ऐकून अग्नी गयावया करू लागला. तेव्हा शिव म्हणाले, 'तू परीक्षित

राजाचा पुत्र भीमसेन याच्या रूपाने जन्मशील आणि तू या नर्मदेशी विवाह करशील. एका पुत्राच्या जन्मानंतर तू पुनः शापमुक्त होशील, आणि स्वर्गात परत येशील.'

याच भीमसेनाने नर्मदेशी लग्न करून नर्मदेच्या काठावर भीमेश्वर महादेवाची स्थापना केली. (श्लोक - ८१-१०५). नर्मदेला झालेल्या मुलाने गगनप्रिय दैत्याला मारून देवांना सुखी केले.

[श्लोक क्र. ३] रेवा सागर संगमापासून ९४ मैलावर एरंडी-नर्मदा या संगमावर अनसूयातीर्थ आहे. माता अनसूयेच्या तपश्चर्येकरिता पाहा - वायु पुराण - रेवाखण्ड अध्याय - १२०-२२.

[श्लोक क्र. ४] नर्मदेचे उगम स्थान अमरकण्टक यालाच मेकल पर्वत असेही म्हणतात. विन्ध्य आणि सातपुडा पर्वतांच्या रांगा जेथून विभाजित होतात त्याच पर्वताला मेकल असे नांव दिल्या गेले आहे. (मेकल म्हणजे विभाजित होणे). वस्तुतः याचे प्राचीन नांव ऋक्ष पर्वत असे होते. रामायणकालात हा पर्वत 'ऋषभ' या नावाने ओळखल्या जात असे. महाभारतात यालाच 'वंशगुल्म' म्हटले आहे. कालिदासाने आपल्या मेघदूतात या पर्वताचा उल्लेख आम्रकूट म्हणून केला आहे. यालाच आज आपण अमरकण्टक या नावाने ओळखतो.

[श्लोक क्र. ५] अमरकण्टक येथे देवांच्या निवासाबद्दलचा उल्लेख कूर्मपुराणात (ब्राह्मीसंहिता - अध्याय ३८) आहे.

सिद्धक्षेत्रं परं तात पर्वतोऽमरकण्टकः ।
सर्वदेवाश्रितो यस्माद् ऋषिभिः परिसेवितः ॥

पद्मपुराणात (आदि खण्ड - अध्याय १५, १४-८० श्लोक) अमरकण्टकाचे माहात्म्य वर्णिले आहे. त्यानुसार या पर्वतावर कोट्यवधी देवांचा तसेच अनेक ऋषिमुनींचा वास होता-

अमरा नाम देवास्ते पर्वतेऽमरकण्टके ।
कोटिश ऋषिमुख्यास्ते तपस्तप्यन्ति सुव्रताः ॥ १५-८० श्लोक

मायानन्दचैतन्यलिखित नर्मदा पंचांगात (पुणे १९१९) अमरकण्टक कुण्ड आणि त्याच्या आजूबाजुला असलेल्या १८ देवळांची माहिती दिली आहे.

(पाहा. तीर्थकुण्ड पृ. २२४-४३०)

या श्लोकात नर्मदेची उत्पत्ती, मध्य आणि अन्त (लय) या स्थानांचा निर्देश केला आहे.

नर्मदेच्या नाभी (मध्यभाग) मंडळात सिद्धनाथ महादेवाचे देऊळ आहे. या देवळाची

स्थापना सनकादिकांनी केली. स्कन्दपुराणात ही कथा आहे. इथे शिवलिंगावर लघुरुद्र केला असता त्या शिवलिंगातून किंकिणी नाद ऐकू येतो. नर्मदा-पंचांगाची रचना इथेच झाली. ही जागा नेमावरहून जवळच आहे. नर्मदा पुराणातील अध्याय २२ मध्ये याचे वर्णन आले आहे. धावडी कुण्डापासून ही जागा ४० मैलावर आहे.

[श्लोक क्र. ६] या श्लोकात गङ्गा यमुना सरस्वतीपेक्षाही नर्मदेचा प्रभाव मोठा आहे असे सांगितले आहे. कूर्म, मत्स्य आणि पद्म पुराण यांच्या आधारे या श्लोकाची रचना झाली असल्याचे आढळते.

त्रिभिः सारस्वतं पुण्यं सप्ताहेन तु यामुनम्।
सद्यः पुनाति गाङ्गेयं दर्शनादेव नर्मदा ॥

कूर्म पुराण २-४०-८, मत्स्य १८६-११, पद्म-आदि स्वर्ग खण्ड - १३-६-७० अशी लोकमान्यता देखील आहे की - 'गङ्गा स्नाने, यमुना पाने, नर्मदा दर्शने, तापी स्मरणे।

[श्लोक क्र. ७] या श्लोकाच्या पहिल्या ओळीत नारेश्वरापासून प्रकट झालेल्या श्री नर्मदाष्टपदी पुस्तिकेतील भाति-पाठ (अस्ति ऐवजी) स्वीकारला आहे. तिसऱ्या चरणातील 'उत्तरगतिर्युता' ऐवजी 'उत्तरगतियुता' असे समस्त पद सुचविले आहे. 'उत्तरगतिः युता' हा पाठ जर स्वीकारला तर ओराभिरण्ये (ओर नद्या) युता, ओर नावाच्या क्षेत्रात, ओर नदीशी जोडलेली असा अर्थ घ्यावा लागेल.

या श्लोकाला आधारभूत असलेला सुप्रसिद्ध श्लोक हा होय -

सर्वत्र सुलभा रेवा त्रिषु स्थानेषु दुर्लभा ।
ओङ्कारेऽथ भृगुक्षेत्रे तथा रेवोरिसङ्गमे ॥

(स्कंद रेवाखंड, अ. ८५)

प्रस्तुत श्लोकातील सुलभा दुर्लभा या शब्दांचा अर्थ सकृत्दर्शनी ओलांडण्यास सोपी आणि ओलांडण्यास कठीण असा आढळतो. परंतु हा अर्थ इथे अपेक्षित नाही.

ओंकारेश्वर येथे कावेरी संगम, ओंकारेश्वर आणि अमलेश्वर ही ज्योतिर्लिंगे, असल्या कारणाने करनाली जवळ ओरसंगम; आणि सोमनाथतीर्थ आणि भरूच जवळ सागरसंगम असल्यामुळे ही तीनही स्थाने स्नानदानादिकांसाठी उत्तम मानली जातात. कोट्यवधि पुण्य करणाऱ्यालाच इथे स्नानदानादी करण्याची संधी लाभते. त्यामुळे ह्या तीन स्थानांवर नर्मदा दुर्लभ असल्याचे मानले जाते.

यात नर्मदा-ओर संगमाचे माहात्म्य फार मोठे आहे. कारण इथेच सरस्वती देखील अदृश्य स्वरूपात जाऊन मिळते, म्हणूनच या संगमाला दक्षिण प्रयाग असे म्हणतात. प्रयाग

येथील त्रिवेणी संगम विष्णुप्रयाग या नावाने ओळखला जातो आणि ओर संगमावरील त्रिवेणी संगम रुद्रप्रयाग म्हणून ओळखला जातो.

स्कंदपुराणातील उपरोक्त श्लोकातील पद हे 'रेवोरिसङ्गमे' असल्यामुळे नदीचे नांव ऊरि आहे. तिलकवाडा पासून तीन मैलावर चूडेश्वर येथे ऊरि नदी नर्मदेला येऊन मिळते म्हणून त्या स्थानाला रेवोरिसंगम म्हटले आहे. नर्मदानन्द (साधकनी स्वानुभवकथा किंवा माझे नर्मदा परिक्रमा, खण्ड १ पृष्ठ १६) यात ओर आणि ऊरि एकच आहेत असे मानले आहे. स्वामी महाराजांनी 'ओराभिरण्ये' असा प्रयोग केला असल्यामुळे त्यांना ओरसंगमच अभिप्रेत आहे असे वाटते.

[श्लोक क्र. ८] या श्लोकाला आधार असलेला श्लोक -

पुण्या कनखले गङ्गा कुरुक्षेत्रे सरस्वती ।
ग्रामे वा यदि वाऽरण्ये पुण्या सर्वत्र नर्मदा ॥

मत्स्य पुराण १८६-१०, पद्मपुराण, आदिखण्ड - १३-५, कूर्म पुराण - २-४७-७.

[श्लोक क्र. ११] या श्लोकात 'मृत्युञ्जय' पदच अभिप्रेत आहे. जो पिता मृत्युञ्जय आहे त्याची कन्या देखिल इतरांसाठी मृत्युञ्जय कां बरं होणार नाही?

नारेश्वराच्या आवृत्तीत भवान्ता ऽतिविदिता पाठ अहे. यात अस्ति अध्याहार गृहीत धरावा लागेल.

ऋता = गता भीतिः यस्य सः । असा समास आहे.

हतमति : - हन् धातूचा हिंसा आणि गति असे दोन अर्थ होत असल्यामुळे हता - नष्टा (दुष्टा) मतिः यस्य सः । आणि हता - प्रज्ञा (सद्) मतिः येन सः । असा दोन प्रकारचा करून

१) ज्याची दुष्ट बुद्धि नष्ट झाली आहे, आणि

२) ज्याला सद्‌बुद्धि प्राप्त झाली आहे असा; असे दोन अर्थ ग्रहण करता येतील.

सम हा शब्द सर्व पदाचा पर्यायी असल्यामुळे समेषाम् ऐवजी समानाम् असा आर्ष प्रयोग इथे केला गेला आहे.

[श्लोक क्र. १३-१४] या दोन श्लोकांमध्ये नर्मदेच्या जलाची तेवीस विशेषणांच्या माध्यमातून स्तुति केली आहे. जल हे नर्मदा देवीचे आधिभौतिक रूप आहे. सत्, चित् आणि सुख (आनंद) या तीन विशेषणांनी नर्मदेचे सगुणब्रह्म स्वरूप सांगितले असून स्वरूप लक्षणाद्वारे तिचे आध्यात्मिक रूप सुचविले आहे.

अलयम् या विशेषणातून नर्मदेचे जल कधीच नासत नाही असे स्वामी महाराजांनी सूचविले आहे. याला आधार-

समुद्राः सरितः सर्वाः कल्पे कल्पे क्षयं गताः ।
सप्तकल्पक्षये क्षीणे न मृता तेन नर्मदा ॥

(वायु पुराण - रेवा - ७)

नर्मदा शब्दाची व्युत्पत्ति दर्शवितांना वायुपुराणकर्ता म्हणतो - समुद्र आणि सर्व नद्या प्रत्येक कल्पात नष्ट होतात (सुकून जातात). सात कल्पांचा नाश झाल्यावरही नर्मदा न मृता (नष्ट झाली नाही) म्हणूनच तिला नर्मदा म्हणतात.

अपायात् पायात् ही शब्दावली स्वामी महाराजांना अत्यंत प्रिय आहे. मन्त्रगर्भ स्तोत्रांमध्ये ती अचूकपणे आढळले.

[श्लोक क्र. १५] या श्लोकात परिक्रमा करणाऱ्यांनी पालन करण्यायोग्य अनेक नियमांचा उल्लेख आहे.

शर्वाङ्गजनिता - नर्मदेची उत्पत्ती भगवान शंकराच्या देहातून झाली असल्यामुळे तिचे नांव 'रुद्रदेहोद्भवा' असेही होय.

शिवदेहसमुत्पन्ना रेवा उत्पथगामिनी ।
घर्मद्रवेति विख्याता पापं मे हर नर्मदे ॥

कूर्म पुराण ब्राह्मी संहिता II अध्याय ३६. यात नर्मदेला रुद्रदेहोद्भवा म्हटले आहे. मत्स्यपुराण १८५ मध्ये तिचा शिवाच्या तेजांशातून उद्भव झाल्याचे वर्णन आहे. अत्यंत तेजामुळे घाम फुटल्याने त्यातून ती उत्पन्न झाल्यामुळे तिला 'घर्मद्रवा' असेही म्हटले आहे.

नर्मदा सरितां श्रेष्ठा रुद्रदेहाद् विनिःसृता ।
तारयेत् सर्वभूतानि स्थावराणि चराणि च ॥

मत्स्य - १८०-७, कूर्म II ४०-५, ५.अध्याय आदि - १७-१३.

[श्लोक क्र. १७-१८] या श्लोकाचा रचनाअन्वय पाहता शिथिल वाटतो. यदीये या पदाला सापेक्ष अशा तदीये पदाचा अभाव जाणवतो. १८ व्या श्लोकातील दुसऱ्या चरणात शिलाः हा स्त्रीलिंगी शब्द आहे. पण चौथ्या चरणात या पदाकरिता 'ते' या पुल्लिंगी सर्वनामाच्या रूपाचा प्रयोग केला आहे. स्वामी महाराजांच्या मनात चतुर्थ चरणाच्या रचनाप्रसंगी 'बाण' सारखा पुल्लिंगी शब्द उद्भवला असावा. असे वाटते. सिन्दुरासुराची कथा गणेशपुराणाच्या उत्तरार्धात अध्याय १२७ ते १३७ मध्ये दिली आहे. तसेच मुद्गल पुराणातील खंड ४, अध्याय ४४-४७ यात ही आढळते. गणेशपुराणात (अध्याय १३२) बालस्वरूपात

प्रकट झालेल्या गणेशाला दैत्याने नर्मदेत ज्या ठिकाणी फेकले ते स्थान गणेशकुण्ड या नावाने प्रसिद्ध झाले. तसेच त्याच्या रक्ताने लाल बनलेले दगड नार्मद गणेश या नावाने प्रसिद्ध झाले अशी कथा आली आहे.

स्वामी महाराजांनी मुद्‌गल पुराणातील कथेचे अनुसरण केले आहे ते कसे हे पहा-

पार्वतीच्या वरदानामुळे गर्भस्थ गणेशाच्या मस्तकाचे राक्षसाने हरण केले, आणि

दैत्येन तच्छिरस्त्यक्तं नर्मदायां प्रजापते ।
तत्र कुण्डं समुत्पन्नं गणेशमहिमान्वितम् ॥
तत्र या दृषदो रक्ता नर्मदायां समास्थिताः ।
यत्र यत्र गणेशास्ते बभूवुः सर्वसिध्दिदाः ॥

मुद्‌गल पुराण - ४-४७, ५०-५१

[श्लोक क्र. १९] हे वर्णन घावडीकुण्डाचे होय. ओंकारेश्वराहून पूर्वेकडे चोवीस अलताराहून सीता वाटिकेकडून घावडी कुण्ड येथे जाता येते. येथे नर्मदेचा प्रचंड प्रवाह आहे. हा जलप्रवाह जवळजवळ ५० फुटावरून कोसळत आहे. या गतिमान प्रवाहातून वाहत येणारे लहान मोठे दगड परस्पर घर्षणाने २० व्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे चमकदार अशा वेगवेगळ्या गोलाकृति लिंगांचा आकार धारण करतात. यांनाच बाण असे म्हणतात. घावडीकुण्डातून लोक या बाणांना पूजेकरिता नेतात. दुसऱ्याकरिता नेण्याच्या इच्छेने काढलेल्या त्या बाणांना भिल्लरूपात प्रकट झालेला शिव स्वामी महाराजांकडून कुण्डात परत फेकायला लावतो. [पहा श्रीगुरूलीलामृत अध्याय १२८, ४०-४६,] नर्मदेचे नाभिस्थान अशा सिद्धनाथ महादेवाहून देखील घावडीकुण्डाला जाता येते. ही जागा नर्मदेचे योनिस्थान मानले आहे.

[श्लोक क्र. २१] श्लोक क्र. १ पासून २० पर्यन्तच्या सर्व श्लोकांची रचना शिखरिणी वृत्तात आढळते आणि २१ व्या श्लोकाची रचना उपजाति वृत्तात आहे. हे छन्द परिवर्तन त्यांनी केलेली वन्दना सुचवित आहे. वस्तुतः स्वामी महाराजांनी हे स्तोत्र इथेच संपविले असावे. आणि २२ ते २७ तसेच त्यानंतरचे ३ श्लोक मागून जोडल्या गेले असावे. हे त्यांच्या वृत्त इत्यादी रचना प्रकारावरून जाणवते.

[श्लोक क्र. २२] या श्लोकात नर्मदेच्या जलाची अधिष्ठात्री देवी नर्मदा हिचे सुंदर स्त्रीच्या स्वरूपात सगुण वर्णन केले आहे. हे देवी नर्मदेचे आधिदैविक स्वरूप होय.

या श्लोकाचे वृत्त मालिनी होय. हे सुद्धा 'मालिनी ' या पदाचा प्रत्यक्ष प्रयोग करून

दर्शविले आहे. त्यामुळे या श्लोकात मुद्रालंकार साधला आहे. तसेच येथे 'रोषा, योषा, दोषा, तोषा इत्यादी पदांच्या आधारे यमक अलंकार देखील योजिला आहे. नारेश्वर येथील प्रतीत 'संस्रवन्तीविशेषा ' असा पाठ आहे.

[श्लोक क्र. २३] या श्लोकात देखील यमक अलंकार आढळतो. पहिल्या पदाच्या शेवटी 'नीरा' याबरोबर द्वितीय पदाच्या 'नीराग' यातील 'नीरा' या पदात साधलेला यमक संदष्ट यमक होय. [तसेच पूर्ण पदात यमकामुळे खण्ड पडत असल्यामुळे येथे पतत्प्रकर्ष नावाचा दोष देखील दाखविता येतो.]

या श्लोकाचे वृत्त वसंततिलका होय. तसेच रातु यात रा दाने (२ प.प.) धातु होय.

[श्लोक क्र. २५] या श्लोकाचे वृत्त शार्दूलविक्रीडित होय. यात नर्मदेच्या काठावर असलेल्या सुप्रसिद्ध महादेवाचा महिमा वर्णिला आहे. वर्वर्ति - वृतु (वरणे) ४ आ वृत्यते, धातूचे यङ् लुगन्त (पौन : पुन्यवाचक) रूप होय.

[श्लोक क्र. २६] या श्लोकात स्वामी महाराजांनी अपराजिता नावाच्या अनतिप्रसिद्ध वृत्ताचा वापर केला आहे. १४ अक्षरांच्या या वृत्तात ७-७ असे दोन भाग एकूण अक्षर संख्या विभाजित होते. पूर्वार्धात पहिले ६ अक्षर लघु आणि ७ वे गुरु आहे. उत्तरार्धात पहिले, तिसरे, चौथे, सहावे आणि सातवे अशी पांच अक्षरे लघु आहेत. तसेच दुसरे आणि पाचवे अक्षर गुरु आहे. या वृत्ताचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या प्रत्येक अर्ध चरणातून चतुर्दल फुलाची आकृती तयार होते. पूर्ण श्लोकात एकूण आठ चतुर्दल पुष्पे तयार होतात. त्यांचा हा हार बनविला आहे. या प्रकारच्या रचनाप्रकाराला हारबन्ध अशी संज्ञा देता येईल. चित्रकाव्याचा एक नमुना म्हणून हा हारबन्ध इथे दर्शविला आहे.

अपराजिता वृत्ताचे लक्षण पुढीलप्रमाणे होय

न न र स लघु गैः सारैरपराजिता ।

(न न र आणि सगण, नंतर एक लघु आणि एक गुरु तसेच ७, ७ अक्षरांवर यति, या प्रमाणे अपराजिता वृत्त बनते.)

[श्लोक क्र. २७] या श्लोकाचे वृत्त स्रग्धरा आहे. स्वामी महाराजांनी मूळ २१ श्लोकांची रचना करून नंतर उर्वरित श्लोक जोडून एकूण २७ श्लोकांची ही नक्षत्रमाला देवी नर्मदेला अर्पण करून हे स्तोत्र पूर्ण केले. त्यामुळे त्या नंतरच्या २ श्लोकांना क्रमाङ्क दिलेले नाहीत. मी स्वतः या श्लोकांना २८, २९, ३० असे सलग क्रमांक दिले आहेत.

[श्लोक क्र. २८] या श्लोकाचे वृत्त सुद्धा स्रग्धरा आहे. या श्लोकांच्या सुरुवातीस कंसात (अलङ्कारः) असे पद दिले आहे. ते पद २७ व्या श्लोकाच्या शेवटचे पद समजावे.

२७ श्लोकांनी तयार झालेला हा नक्षत्रमाला नामक अलङ्कार स्वामी महाराजांनी देवी नर्मदेला वाहिला, हा अर्थ यातून अभिसूचित होतो.

[श्लोक क्र. २९] या श्लोकात गोमूत्रिकाबन्ध आहे. पहिल्या ओळीतील एका अक्षराशी दुसऱ्या ओळीतील दोन अक्षरे जोडली जातात. तसेच द्वितीय ओळीतील एका अक्षराशी पहिल्या ओळीतील दोन अक्षरे जोडली जातात. या प्रमाणे तिरप्या क्रमांनी अक्षरं वाचली तर श्लोकाचा क्रम सहजपणे जुळून येतो.

[श्लोक क्र. ३०] येथे मालिनी वृत्त आहे. तसेच यमक हा शब्दालंकारही आहे. जय-जय या शब्दांद्वारे स्तोत्राच्या शेवटी मङ्गल सुचविले आहे.

□ □ □

आरती नर्मदेची

जय जय नर्मदे ईश्वरि मेकलसंजाते ।
नीराजयामि नाशित-तापत्रय-जाते ॥ धृ ॥
वारित-संसृतिभीते सुरवर- मुनिगीते ।
सुखदे पावनकीर्ते शंकरतनुजाते ॥
देवापगाधितीर्थे दत्तात्रेयपुमर्थे ।
वाचामगम्यकीर्ते जलमयसन्मूर्ते ॥ १ ॥
नन्दनवनसमतीरे स्वादुसुधानीरे ।
दर्शितभवपरतीरे दमितान्तकसारे ॥
सकलक्षेमाधारे वृतपारावारे ।
रक्षास्माननतिघोरे मग्नान् संसारे ॥ २ ॥
स्वयशःपावितजीवे मामुद्धर रेवे ।
तीरं ते खलु सेवे त्वयि निश्चितभावे ॥
कृतदुष्कृतदवदावे त्वत्पदराजीवे ।
तारक इह मेति जवे भक्त्या ते सेवे ॥ ३ ॥

व्रतान्यन्वतिष्ठत् यथावद् यतेर्यो।
स्थितो यः कदाचित् समाधिं विधाय।
स्फुटाऽभूद्यदीयाऽसकृद्योगसिद्धिः।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।५।।

यदीयं प्रसादं समासाद्य कश्चित्।
वचोऽनेडमूकोऽध्यगाद्दोषहीनम्।।
विमुक्ताः परे दुश्चिकित्स्यामयेभ्यो।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।६।।

प्रवृत्ताः खलाः केऽपि यस्य च्छलार्थं।
फलं दुष्कृतेः प्राप्य सद्योऽन्वतप्यन्।।
विकर्तुं न तेऽशक्नुवन् यस्य चेतो।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।७।।

रजोध्वंसनं दर्शनं यस्य मूर्तेः।
अघघ्नः प्रणामो यदीयाङ्घ्रिपद्मे।।
फलं संगतेर्धन्यता जन्मभाजो।
यतीन्द्रं भजे तं गुरुं वासुदेवम् ।।८।।

गुरोरष्टकं वासुदेवस्य भक्त्या।
कृतं तत्पदाब्जालिना केशवेन।
सकृच्छ्रद्धया यस्य पाठेन पुंसां।
ध्रुवं जायते वासुदेवेऽनुरागः ।।९।।

स्व. म. म. बापूजी ताह्मण, नागपूर



नर्मदेचे एक विहंगम दृश्य